म. ग्रं. सं.

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक वि. मो. ...जानी

सन १...

पुस्तकाचें नांव

६१

नाटक

# विक्रीस तयार.

हीं सर्व पुस्तकें पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत विकत मिळतील.

| पुस्तकाचें नांव. | किंमत व टपाल हं. | | |
|---|---|---|---|
| | रु० | आ० | आ० |
| The Standard Sanskrit English Dictionary by L. R. Vaidya M. A. L L. B. | | | |
| " Half Leather bound. ... | 4 | 0 | 10 |
| " Cloth bound. ... ... ... | 3 | 8 | 10 |
| The English Sanskrit Dictionary by Prof. V. S. Apte M. A. ... | 4 | 0 | 9 |
| Notes on Heat by Prof. M. S. Gole. M. A. ... ... ... ... | 1 | 8 | 2 |
| Science Notes for U. S. F. by Prof. M. S. Gole M. A. ... ... | 2 | 0 | 4 |
| Selections from English Poets for Standard IV by Prof. M. S. Gole... ... ... ... ... | 0 | 8 | 1 |
| सार्थ वाग्भट भाषा १।२ ( डा० गर्देकृत ) ... | १२ | ०० | ह०१ |
| कादंबरीसार ( मा० शि० आपटे बी. ए. कृत ) | १ | ८ | ४ |
| फुटकळ चुटके ( वा. शा. शास्त्री खरेकृत.) ... | ० | ४ | ०॥ |
| समुद्र ( वासुदेव शास्त्री खरेकृत ) ... ... | ० | ३ | ०॥. |
| संसार कसा करावा ( वि० मा० हेर्लेकर बि. ए. एलएल. बी. कृत ... ... ... | ० | ४ | ०॥, |
| रामजानकीसंवाद ... ... ... ... | १ | ० | २ |
| रामहृदय ... ... ... ... | ० | १ | ०॥. |
| षड्रिपुविवेचन ... ... ... ... | ० | ३ | ०॥. |
| रिचर्ड काब्डेन यांचें चरित्र. ( प्रो. चिं. गं. भानू बि. ए., कृत. ) ... ... ... | ० | १० | १ |
| डिमास्थेनिस यांचें चरित्र ( प्रो. चिं. गं. भानू बी. ए. कृत ). ... ... ... ... | ० | ४॥ | १ |
| सगुणमंजरी एका हतभाग्य स्त्रीचें चरित्र. ( ग. ज. आगाशे बी. ए. कृत )... ... ... | ० | ८ | १ |
| चार्लस ब्राडला यांचें चरित्र... ... ... | ० | ४ | ०॥. |
| विलायतचा प्रवास भाग पहिला... ... ... | ० | ११ | २ |
| अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी ( चिपळूणकर व दामलेकृत )... ... ... | ६ | ० | १२ |

| | | | |
|---|---|---|---|
| अबलोन्नतिलेखमाला लेख पहिला (सी. व्ही. वैद्य एम्. ए. एल् एल्. बी. कृत) ... | ० | ३ | ०॥. |
| ,, ,, लेख दुसरा... ... | ० | २ | ०॥. |
| Social Reform Series No. 1 by C. V. Vaidya M. A. LL. B. ... ... ... | ० | ८ | ०॥. |
| निबंधमाला (कै. वि. कृ. चिपळूणकरकृत). ... | १ | ० | ८ |
| केसरींतील निवडक निबंध भाग १ ला... ... | १ | ० | ३ |
| ,, ,, भाग २ रा ... ... | १ | ० | ३ |
| सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचें चारित्र (दक्षिणाप्राईज कमेटीकडून बक्षिस मिळालेलें). | ० | १२ | २ |
| दुर्गानाटक ( गो. ब. देवलकृत ). ... ... | ० | ९ | ०॥. |
| संगीत सौभद्र (किर्लोसकरकृत ). ... ... | ० | १२ | ०॥. |
| संगीत शाकुंतल (किर्लोसकरकृत )... ... | ० | १२ | ०॥. |
| धर्म आणि शास्त्र यांचा समेट (स्पेन्सर ग्रंथावरून) —एन्. एल् फडके बि. ए. यांचें व्याख्यान. ... | ० | २। | ०॥ |
| तंट्या भिल्ल यांचें चरित्र (केसरी धनुर्धारी रचित ) | ० | ०२॥ | ०॥ |
| दौलतराव नाटक रा॰रा॰शंकर मोरो रानडे बी.ए.कृत:— | ० | १० | १ |
| अधिकारदानविवेचना नाटक ,, ,, ... | ० | ९ | ०॥ |
| पतिशिक्षाप्रहसन ,, ,, ... | ० | ४ | ०॥ |
| अनुतापशमन नाटक ,, ,, ... | ० | १२ | १ |
| अतिपीडचरित नाटक ,, ,, ... | १ | ४ | २ |
| रतिमन्मथ नाटक ,, ,, ... | १ | ० | १ |
| डाक्तर व वैद्यप्रहसन ,, ,, ... | ० | २॥ | ०॥ |
| प्रेमगुटिका नाटक ,, ,, ... | ० | ४ | ०॥ |
| वीरोन्नंस नाटक ,, ,, ... | ० | १२ | १ |
| चंडकौशिक नाटक ,, ,, ... | ० | ६ | ०॥ |
| लटपटाध्यायप्रहसन. ,, ,, ... | ० | २ | ०॥ |
| मोहविलसित नाटक ( Shakspear's Winter's tale ) रा. सा. वि. मो. महाजनी एम्. ए. कृत. | ० | १० | २ |
| बलभानुनय ( All's well that ends well ) रा. सा. वि. मो. महाजनी एम्. ए. कृत .... | ० | १२ | २ |
| रति सुंदरी नाटक रा॰ रा॰ गणेश बळवंत जोशी बी. ए. कृत... ... ... ... | ० | ८ | १ |

ना १६९

# वल्लभानुनय.

हें नाटक

महाकवि शेक्सपियरकृत

" ALL'S WELL THAT ENDS WELL "

याचे आधारें

विष्णु मोरेश्वर महाजनि एम. ए.,

एज्युकेशनल इन्स्पेक्टर, वऱ्हाड,

यांनीं रचिलें

तें

पुणें येथें

" आर्यभूषण " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

१८८७.

( हा ग्रंथ रजिस्टर करून ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क आपले स्वाधीन ठेविले आहेत )

किंमत ०१२ आणे.

विषय
संग्रहालय क्रमांक
205

# उपोद्घात.

"वल्लभानुनय " याचा अर्थ " वल्लभ ह्मणजे प्रिय अर्थात् पति याची समजावणी." पतीनें पत्नीचा त्याग केला असतां तिनें खटपट करून त्याचें मन आपणाकडे ओढून घेणें, याचें नांव अनुनय. शेक्सपीयरनें आपल्या नाटकाला प्रथमतः सरासरी याच अर्थाचें नांव दिलें होतें. "Love's Labowr's Won " याचा शब्दशः अर्थ " प्रेमाचा यत्न सफल झाला." हें नांव " वल्लभानुनय " याहून फारसें दूर नाहीं. कवीनें हा ग्रंथ आपल्या बुद्धीच्या अपरिपक्व दशेंत लिहिला, परंतु पुढें ती बुद्धि परिणत झाल्यावर त्यावरून त्यानें आपली लेखणी फिरविली, त्या वेळीं बऱ्याच स्थळीं फेरफार करून कांहीं नवीन शोध घातले, व ग्रंथाचें मूळचें नांवही बदललें. ह्मणून तो ग्रंथ आतां " All's Well That Ends Well " " परिणामीं गोड तें गोड " या नांवानें प्रसिद्ध आहे. तरी ग्रंथांत ठिकठिकाणीं दोन्ही नामांचा निर्देश केला आहे.

मूळ ग्रंथांत आणि त्याच्या या प्रतिकृतींत क्वचित् फरक कां केला आहे हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. ज्यांनीं "तारा नाटक " किंवा " मोहविलासित " नाटक वाचिलें असेल त्यांना तें ठाऊकच आहे. इतरांनीं त्या नाटकांच्या आरंभीं दिलेली प्रस्तावना वाचिली असतां, त्यांस कळून येईल.

रूपांतर ( Adaptation ) करितांना केवळ नामांतर केलें असा पुष्कळांचा समज झाला आहे. व असाच आमचे परम मित्र कैलासवासी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचाही झाला होता असें दिसतें. परंतु असा आक्षेप घेणारांनीं मूळ व प्रति-

कृति हीं जवळ जवळ ठेऊन पाहिलीं असतीं तर त्या आक्षेपास जागा राहिली नसती. तारा नाटकांत व याही नाटकांत स्थल दाक्षिणात्य कल्पून विजयानगर ऊर्फ विद्यानगर ह्मणून जी हिंदूंची राजधानी होती, त्या वेळच्या स्वरूपाचें चित्र आणण्याचा यत्न केला आहे. तारा नाटकांत " विजयानगर " याचें शब्दांतर करून " विजयपुर " असा शब्द योजिला होता; परंतु " जावळी महाल "—" डोंगर "—इत्यादिकांवरून चाणाक्ष वाचक तो प्रदेश व काळ ओळखून काढितील असें वाटलें होतें. परंतु टीकाकारांना निदान ही ग्रंथकर्त्याची योजना समजून आली नाहीं असें दिसतें. असो. त्याच कालास अनुसरून हाही ग्रंथ रचिला आहे ह्मणून थोडेसें जास्त लिहिलें पाहिजे.

दक्षिण हिंदुस्थानांत मुसलमानी राज्य " ब्राह्मणी " झालें, त्याच राज्यांतील बड्या बड्या सरदारांनीं पांच छोटेखानी राज्यें स्थापिलीं. त्या वेळीं विजयानगर येथें हिंदू राजा होता, व तो पुष्कळ वर्षें आपली गादी संभाळून होता. परंतु शेवटीं मुसलमान राजांनीं आपआपसांत जरी यादवी माजविली होती, तरी या हिंदूचें राज्य मोडण्याकरितां एकी करून तें लयास नेलें. विजयानगरचें राज्य आपल्या वैभवकाळीं लहानसान नव्हतें, दक्षिणेंत तें साम्राज्यच होतें, व त्यांत बरेच " सामंत " [ ऊर्फ सांवत ] होते, कांहीं "सामंत " अर्धे " स्वतंत्र " अर्धे " परतंत्र " असे होते. त्यांतील एक " सामंत " " तारा नाटकांतील " राजा बनविला होता; व दुसरा या नाटकांत " पांडुरंगपुर " ऊर्फ " पंढरपूर " येथील राजा बनविला आहे. " वेणुग्राम " ( ऊर्फ बेळगांव ); " बावधन ", " मुधोळ ", " चंद्रभागा ",

"जनस्थान" इत्यादिकांबद्दल जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं. साम्राज्यांत सामंतचक्र एकछत्र राजाचे चरणीं लीन होत असत, त्यांच्या आज्ञा मान्य करीत, हें तर सांगायाला नकोच. याचा मासला मऱ्हाटेशाईंतही पुढें दिसून आला. यूरोप खंडांत त्याच वेळीं जीं लहान लहान साम्राज्यें होतीं, त्यांतील एकछत्र राजांचा अधिकार बराच मोठा होता, तशा-च प्रकारचा अधिकार इकडेही असावा, अशीं जीं थोडींबहुत प्रमाणें उपलब्ध आहेत त्यांवरून अनुमान करितां येतें. आणि प्रमाणें थोडीं असलीं किंवा मुळींच नसलीं, तर कवीच्या क-ल्पनेस स्वैरविहार करायास सांपडतें, हें सुप्रसिद्धच आहे. ह्मणून विजयानगरच्या महाराजानें शूरसेनास जानकीशीं वि-वाह कर असें ह्मटल्यावर त्याच्यानें ना ह्मणवेना. असें नाट-कांत कवीनें वर्णिलें आहे तें योग्यच वाटेल.*

प्रकृत नाटकांत विजयानगरचें राज्य लोपण्यापूर्वींचा काळ कल्पिला आहे. मुसलमानी राजांचा अंमल चंद्रभागा उतरून दक्षिणेकडे आला नव्हता, तरी तो समय जवळच येऊन ठेपला होता. प्रहारवर्म्यानें शूरसेनाच्या मदतीनें तूर्त मुसल-नांचा लोंढा तह करून थांबवून धरिला होता. या काळाला धरून जमेल तितका भाग घातला आहे. मूळांतला काळ आणि हा काळ सुधारणेच्या मानानें सारखेच होते, ह्मणून प्रकृत ग्रंथकाराला रूपांतर करितांना फारशी अडचण पडली नाहीं, आतां त्या काळाला अनुसरून कितपत हा ग्रंथ आहे हें पाहण्याचें काम इतिहासज्ञांचें आहे.

* हल्लींही पोलिटिकल एजंट यांनीं एखादा संबंध जुळवून आणि-ला असतां आमच्या राजांस ना ह्मणवत नाहीं, हें संस्थानांतील राह-णाऱ्यांस ठाऊक आहेच.

आतां या नाटकांतील मुख्य मुख्य पात्रांच्या संबंधानें कांहीं थोडें लिहितों.

प्रथमच सांगितलें आहे कीं हा ग्रंथ कवीच्या उत्तम ग्रंथांच्या तोडीचा नाहीं, तरी कवीनें पुढें त्यावरून हात फिरविल्यामुळें मधून मधून भावी कल्पनेचे व रसाचे मासले दृष्टीस पडतातच. तरी या नाटकांत बीज नाहीं असें नाहीं. कवि हा ग्रंथ लिहिते वेळीं तरुण होता, तेव्हां तरुणांच्या इच्छा त्याचे मनांत वागत होत्या. कुलमहात्म्यापेक्षां शीलमहात्म्य गुणमहात्म्य व विद्यामहात्म्य हीं मोठीं, असें तरुण पुरुष वेळीअवेळीं प्रतिपादन करितात. तेंच प्रतिपादन कवीनें या नाटकांत केलें आहे. शूरसेन आणि जानकी यांच्या कुलशीलांचा विरोध योजिला आहे. तुल्य गुण वधूवरांचा संबंध जुळविण्याला ब्रह्मदेवास फार पंचाईत पडते असें कविवर्य कालिदासानें ह्मटलें आहे तें खरें. जगांत विषम वयांचीं जोडपीं जरी फारशीं नसतात तरी विषम गुणांचीं, विषम शीलांचीं, व क्वचित् विषम कुलांचींही जोडपीं पुष्कळ आढळांत येतात. अशीं जोडपीं यावज्जीव दुःखांत दिवस घालवितात, अशी कल्पना जगाला वरवर पाहणारे करोत; परंतु ज्यांनीं ह्मणून पुष्कळांचे संसार पाहिले असतील, मग ते संसार सुधारलेल्या यूरोपियन राष्ट्रांतील कन्यांच्या स्वयंवरावर रचलेले असोत, अथवा आपल्या अर्ध सुधारलेल्या हिंदुस्थानांत मातां पित्यांच्या इच्छेवर रचलेले असोत, त्यांना असें आढळून येईल कीं संसारसुख नवऱ्याबायकोच्या परस्पर सहिष्णुतेवर अवलंबून आहे. जोंपर्यंत विवाह झाला नाहीं, तोंपर्यंत कितीही परीक्षा करा, दंपती तुल्यगुण आहेत अशी खातरी करितां येत नाहीं. खरा विवाह झाल्यावर नवऱ्याबायकोस आढळून येतेंच कीं

कांहीं कांहीं विचार एकमेकांचे जुळत नाहींत. भिंत बांधतांना जसे वाकडे तिकडे दगडांच्या अणकुच्या गवंड्याला हातोड्यानें तोडाव्या लागतात, तरच ते दगड बरोबर बसतात. तसेंच संसाराची ही भिंत रचितांना स्त्रीपुरुषांस परस्परांच्या जुळणाऱ्या विचारांस थोडा थोडा छाटा द्यावा लागतो. प्रसंगीं अशीं जोडपीं बनून येतात कीं त्यांमध्यें समसमान गुण दिसायाला मुळींच नसतात. अशांच्या संसारांचें पुष्कळदां मातेरें होतें; परंतु क्वचित् प्रसंगीं प्रभूच्या कृपेकरून दोहोंतून एक ( स्त्री किंवा पुरुष ) थोडा पड घेऊन आपल्या दुसऱ्या अंगाला आपल्या बरोबरीला आणून सोडतो. अशा दैवशाली घराण्याचें चित्र या नाटकांत कवीनें काढण्याचें योजिलें आहे. शूरसेन मोठ्या कुळांतला–जहागीरदार–श्रीमंत–शूर–पदरीं माणसें फार–असा आहे. जानकी गरीब वैद्याची पोर–अनाथ–गरीब–अबला–आणि आश्रित अशी आहे. अशांचा विवाह लावून देण्याच्या खटपटींत साधारण कवि कधीं पडावयाचे नाहींत, परंतु असाच प्रसंग खऱ्या कवित्वाचा निकष होय. खरोखर हें नाटक हल्लीं जें नाटक मुंबईस दोन वर्षें चाललें आहे, त्याच्या उलट आहे. यांत जानकी वादी असून तिनें आपल्या पतीस राजाच्या कोटांत एका अंशानें खरें, पण खरोखर हृदयस्थ जो मुनि प्रकरणांचा निकाल यथान्याय देतो त्याच्या कोटांत, त्याला आणून त्याला जन्मभर कैदीची शिक्षा देवविली ! आणि चमत्कार हा कीं तो शूरसेन शूर असून या “ सव्वामणाच्या बेडीस ” शेवटीं खुष झाला ! याचें नांव न्याय ! आणि येवढ्या सर्व अचाट कृत्याला तिला साह्य कोण होते ? कोणी व्यवहारपटु किंवा नयनिष्णात वावदूक ? अथवा कोणी धनाढ्यसाधु ?

किंवा कोणी दयार्द्रान्तःकरण ह्मणून क्वचित् प्रसंगीं सहज आकृष्यमाण असा एकादा परमपूज्य ऋषि? छे! अशांचें तिला साह्यय नको होतें. तिचे मदतगार ह्मणजे एक तर तिच्यासारख्याच दोन तीन अबला, त्यांतून दोन विधवा आणि त्याही वृद्ध.—आणि दुसरी तिची प्रीति अथवा पाहिजे तर भक्ति असें ह्मणा. ही प्रीति किती "व्यापक" आहे! व तिला किती आधार देत आहे! जातीची स्त्री—लहान कुळांत जन्मलेली, परंतु एके ठिकाणीं राहिल्यानें तिचें प्रेम शूरसेनावर बसलें. शूरसेन दुष्प्राप्य हें तिला ठाऊक. पण तिचा उपाय काय? या प्रेमांतच तिचा अंत झाला तरी तिला पुरवला. अशा स्थितींत त्याला दरबारचें बोलावणें आलें. मग काय विचारतां? तिच्या मनाची चलबिचल झाली. ती आपलें प्रेम दावूं लागली पण दुटप्पी भाषणांनीं (अंक १ प्र. १) तें बाहेर पडूं लागलें. वाचाल येऊन तिच्यापुढें बडबड करायला लागला, आणि अशाच्या संगतीनें आपला वल्लभ विजयानगरास एखाद्या भलतीसच "देवी" "जीवित" "द्वितीय हृदय" ह्मणून फशीं पडेल अशी भीति तिला वाटून त्याच्या मागोमाग जाण्याचा विचार तिच्या मनांत आला. तेव्हां, पूर्वीं नव्हे, तिला आपल्या बापाच्या औषधाची आठवण होऊन राजाला आपल्या हातून गुण येईल असें वाटलें. तिचें देवघरांतलें आपणा स्वतःजवळचें बोलणें कारभाऱ्यानें विनतेच्या कानावर घालतांच, त्या वृद्ध आनुभविक बाईनें तिला पछाडून तिचें हृद्गत पटादिशीं काढून घेतलें. आणि तिनें आपल्या मानलेल्या कन्येला आणि भावी स्नुषेला आपल्या हातून होईल तितकी मदत देण्याचें कबूल केलें. दरबारांत सुव्रतानें इला राजापाशीं नेलें, आणि

रोग दु:साध्य ह्मणून तो कोणाचेंही औषध घेणार नव्हता, तरी तिनें आपल्या चतुर तरी विनययुक्त भाषणानें त्याचें मन वळविलें. आपली वरकामना पूर्ण करून घेण्याची कल्पना तिला या प्रसंगीं प्रथम सुचली असें दिसतें. येथपर्यंत आपण हीन, शूरसेनाच्या बरोबरीचे नाहीं—बरोबर होईन तर मग पुढची आशा—पण बरोबरी कोठून होणार ? "—असे विचार तिचे मनांत घोळत होते. परंतु तिचें औषध खात्रीचें आहे किंवा काय, हें पाहण्याकरितां राजानें जेव्हां तिला ह्मटलें कीं, " दोन दिवसांत तुझ्या ह्मणण्याप्रमाणें या औषधानें मला गुण न आला तर काय हरशील "—तेव्हां तिनें खाड-दिशीं उत्तर दिलें कीं, " माझा आपण जीव घ्यावा "—पण उलट राजापासून मागून घेतलें कीं, " मी जो वर मागेन तो द्यावा "—ह्मटल्याप्रमाणें राजा दोन दिवसांत बरा झाला, व तिची त्यानें वरकामना पूर्ण केली. पण शूरसेनाला ही बलात्काराची प्रीति आवडली नाहीं. व त्यानें राजास आपलें मन स्पष्टपणें सांगितलें, या वेळीं जानकीचा खरा स्त्री-स्वभाव चांगला दिसून येतो. शूरसेनानें असा धिक्कार केला तेव्हां ती गुपचूप उभी राहिली आणि राजास ह्मणाली "आपण दुखण्यांतून उठलां यांतच मला संतोष आहे बाकीचें राहूं द्यावें. " या प्रवेशांत राजानें जी " शीला "ची प्रशंसा केली ती खरी, हें जानकीनें सिद्ध करून दाखविलें. शूरसेनाळा विनतेनें दरबारास जातेवेळीं सदुपदेश केला होता, व आतां राजानें सांगितलें कीं, राजा व रंक यांचे पिंड एकाच रक्ताचे असतात " तरी वेडे आह्मी उगिच करितों भेद नसता—जरेला मृत्यूला वश उभयही-हीच समता "—" अहो शील जरी कशास कुल तें-तें एकटें वंद्य हो "—तरी हा

सर्व उपदेश तरुण उमेदींत आलेल्या शूरसेनास कोठून रु-चणार ? शेवटीं राजानें आपलें क्रोधास्त्रच बाहेर काढिलें, तेव्हां सरदार बायको करण्याला तयार झाला. व जानकीचें व त्याचें लग्न त्याच रात्रीस उरकून घेतलें. पण तिला लागलीच कळलें कीं, शूरसेन पति झाला तो केवळ नांवाला. कारण मन्त्राक्षता पडतात न पडतात तों त्यानें निमित्त काढून त्याच रात्रीं पांडुरंगपुराची वाट धरली. आणि तिला व आपल्या आईला आपल्या जाण्याचें खरें कारण पत्रांनीं कळविलें; व जोंपर्यंत घरीं पत्नी आहे तोंपर्यंत परत यावयाचें नाहीं असाही आपला निश्चय कळविला. जानकीच्या पत्रांत असंभाव्य दोन अटी घालून असें ह्मटलें कीं या अटी घडून येत तों मी तुला पत्नी ह्मणून समजणार नाहीं. या अटी साधारणपणें असंभाव्यच, व त्या मुद्दाम घडवून आणण्याची खटपट जर जानकीनें केली असती तर खऱ्या स्त्रीत्वाला ती मुकती—व तिची आपण गणना राजकारण करण्यामध्यें पटु झालेल्या नयनिष्णात पुरुषांत केली असती. मग त्या कुटिल मतीचें आणि प्रेमळ अंतःकरणाचें कोठून जमलें असतें? जानकी ही स्त्री—कुटिल योजना करण्यांत प्रवीण नव्हे—पण गोष्टी जर अशा घडून येण्याचा रंग दिसून आला कीं आपला कार्यभाग त्यांकडून करवून घेतां येईल, तर तत्क्षणीं प्रेमस्फूर्तीनें म्हणा अथवा बुद्धिविशेषानें म्हणा—आपलें हित करून घेण्यांत चतुर होती, असें कवीनें दर्शविलें आहे—असो. तिला पतीच्या अटी अर्थात् असंभाव्य वाटल्याच. ह्मणून त्यांविषयीं तिनें यावेळीं मुळींच विचार केला नाहीं.

“ माझी पत्नी जिवंत आहे तोंपर्यंत माझे घरीं कांहीं

नाहीं " एवढें मात्र पतीच्या पत्रांतील वाक्य तिनें घेऊन त्यावर आपला पुढचा बेत केला. तो हा कीं ज्या अर्थी " समरा घालविलें मीं पतिला "—" त्याला देशो घडिला लाविलें "—" तो राजीवाक्ष मीं निर्दय शरविषय केला ", तेव्हां त्याला घरीं आणण्याला एकच मार्ग, तो हा कीं— आपण घर सोडून निघून जावें, आणि पुढें बातमी उडवावी कीं ही मेली. तरी तिनें सासुला कळविलें कीं मी घर सोडून जातें तरी " शिष्टांगनाची रीत जुनी सोडीन ती मी न कदापि "—जनस्थानाला जाऊन तेथें तपश्चर्या करावी असा तिनें निश्चय केला. पण भक्ति किंवा प्रेम फार. जातांजातांना एकदां पतीचें दुरून तरी दर्शन घ्यावें ह्मणून ती पांडुरंगपुरास आली. येथें शूरसेन " हाडाचा जरी चांगला ", तरी वाचालाच्या संगतीनें, आणि या बलात्कारानें केलेल्या विवाहाच्या तिटकाऱ्यामुळें छच्छोर व विषयलंपट बनला. कर्मधर्मसंयोगानें ह्मणा किंवा कविकल्पनेनें ह्मणा, ज्या विधवेच्या मुलीच्या पाठीमागें तो येथें घिरट्या घालीत होता, त्या विधवेची व मुलीची व जानकीची चंद्रभागेच्या तटाकीं गांठ पडली. व ती त्यांच्या येथेंच जाऊन उतरली. येथें आपल्या पतीचा समरकृत्यामुळें किती मान व विषयलंपटतेमुळें किती अपमान होत होता हें तिला कळलें. तेव्हां ज्या निसरणीवर तो लागला होता त्या निसरणीवरून त्याला घसरून जाऊं देऊंनये व आपलाही कार्यभाग त्यांतला त्यांत उरकून घ्यावा ह्मणून शेवटली युक्ति तिला सुचली, व त्या विधवेनें व पार्वतीनें तिच्या म्हणण्याप्रमाणें अगदीं निमूटपणें केल्यामुळें तिला वल्लभानुनयरूप यश मिळालें.

आतां वाचक अशी शंका घेतील कीं ज्या शूरसेनानें

तिला झिडकारिलें त्याचें मन फिरून तीवर कसें बसलें ? या शंकेचें निवारण करणें जरूर आहे. तो पांडुरंगपुरास व्यसननिमग्न कसा झाला होता हें आतां आपण पाहिलेंच आहे- ज्या दिवशीं त्याला मोठा यश मिळाला त्याच दिवशीं रात्रीं त्याच्या आईचें पत्र आलें, त्यांत जानकी निघून गेल्याचें लिहिलें होतें. हा मजकूर वाचतांच त्याचें तोंड खालीं उतरलें (पृष्ठ ९७) येथून त्याला तिची खरी योग्यता कळण्याला व त्याच्या अनुतापाला प्रारंभ झाला. त्याच रात्रीं ज्यावर आपण पूर्ण भरंवसा ठेविला होता, त्याचें खरें स्वरूप सुव्रतापासून तों वेड्यापर्यंत शूरसेनाव्यतिरिक्त सर्वांनीं ओळखून सोडिलें होतें, त्या वाचालाचा भ्रमाचा भोंपळा त्याचे समक्ष फुटला. तेव्हां प्रथम त्याला कळून आलें कीं, आपल्या हातून चुका होतात. पुढें घरीं आल्यावर राजाच्या पुढें "आंगठीचें प्रकरण"—"पार्वतीच्या विवाहाचें प्रकरण"—व "जानकीच्या वधाचें प्रकरण"—अशीं तीन प्रकरणें एका मागून एक उभीं राहिलीं. त्याला कैद केलें, सुव्रतानें तूं जावाई होण्याला योग्य नाहींस असें ह्मटलें आणि त्यांतून सुटून जाण्याला एकही मार्ग दिसेना, अशा प्रसंगीं अपमानपरंपरा निरस्त करण्याला व दोषमुक्त करण्याला जानकी येऊन उभी राहिली आणि तीही मी केवळ "नांवाची पत्नी" असें म्हणाली तेव्हां "नांवाची नव्हे, खरोखर आहे. माझी धर्मपत्नी सर्व संकटांतून पार पाडणारी हीच. सर्व अपराध पोटांत घालाव," असें शूरसेन ह्मणाला, या भाषणांत त्याच्या अनुतापाचा कळस झाला, आणि जो पूर्वी तिच्याहून कुळानें मोठा परंतु मनानें लहान होता तो कुळानें लहान पण गुणांनीं मोठ्या अशा तिच्या बरोबरीचा झाला, हें कवीनें दाखविलें आहे- विवाहानंतर तिचा

पहिलाच भाषणप्रसंग पतीशीं झाला त्यांतही हा तिचा विनय दिसून येत आहे. "नरमणि वरिला जो" इ. श्लोक पहा. येणेंप्रमाणें जानकीनें आपण हीन आहों असें समजून आपणाहून खरोखर हीन परंतु मानलेला थोर अशा शूरसेनाचें मन आपणांकडे ओढून घेतलें. त्यांचा संसार सुखाचा झाला असेल हें कांहीं सांगायाला नको. या जानकीचें उदाहरण आमच्या देशभगिनी व आमचे देशबंधूही घेतील तर बरें होणार नाहीं काय? विद्येचा खरा संस्कार मनाला झाला तर आपणाहून जे विद्येनें कमी त्यांविषयीं तिरस्कार उत्पन्न होणार नाहीं, त्यांविषयीं दया उत्पन्न होईल. आणि ती दया जे हीन आहेत, कमी आहेत त्यांना आपल्या बरोबरीचे करण्याच्या खटपटींत पडेल. उंबराच्या फळांतील कीटकाप्रमाणें आपणच सारें जग असें मानून राहणार नाहीं. आमचें हें ह्मणणें केवळ स्त्रीलाच लागू आहे असें नाहीं. कारण जरी दैवदुर्विपाकामुळें हल्लीं एक सुशिक्षित (?) स्त्री विद्येचा खरा संस्कार नव्हे, खोटा संस्कार दाखविण्याला पुढें ठाकली आहे, तरी आधुनिक विद्वानांच्या घरोघरीं उलट प्रकार दिसून येत आहे. बहुतेक पुरुष सुशिक्षित, बहुतेक बायका अशिक्षित अशी आमची घरची स्थिति आहे. तेव्हा स्त्रियांपेक्षां पुरुषांना आमचें ह्मणणें विशेष लागू पडेल. घरचा संसार परस्परांच्या सहिष्णुतेवर अवलंबून आहे. केवळ अहंमन्यतेनें किंवा कार्यसाधू आप्त किंवा शेजारीपाजारी यांच्या नादीं लागून संसाराला तिलांजली द्यावयाला उठणें हें विचाराचें काम नव्हे—सर्व गोष्टींचा शांतपणें विचार केला पाहिजे. तो विचार करण्याला जर प्रकृत नाटकांतील "जानकी" यत्किंचित् मदत करील तर, ग्रंथकर्त्याचें बरेंच सार्थक झालें असें होईल.

नाटकांतील बाकीचीं पात्रें आहेत त्यांविषयीं फारसें लिहिण्याची अवश्यकता नाहीं. "वाचाल" हा नांवाप्रमाणें बहुभाषी–मोठमोठे शब्द योजणारा, बढाईखोर, लबाड, असा आहे. त्याची "पटह" प्रकरणीं झालेली फजिती त्याच्या अपराधास व्रस आहे, आणि त्याची इच्छा कीं, "केवळ जगावें व खावें व प्यावें" ती सुव्रतानें सफळ केली ह्मणून त्याला कोणी नांव ठेवणार नाहीं. कारण बोलूनचालूनच तो "नरपशु". "वेड्या" हें एक पात्र मोठ्या गमतीचें आहे. याची धूर्तता व जगाची माहिती कांहीं विलक्षण आहे. हसून बोलून व्यक्तीचे नव्हे, तर समाजाचे दुर्गुण बाहेर काढून टाकण्याची हातोटी टीकाकारांनीं यापासून घ्यावी. आह्मांस तर अशी शंका आहे कीं, आडिसन कवीनें "स्पेक्टेटर" पत्र सुरू करण्यापूर्वीं त्यांचे लक्षांत हें पात्र फार चांगलें भरलें असावें.

हें नाटक बरींच वर्षें पडून राहिलें होतें; व छापूनही बरेच महिने झाले. मित्र "आर्यभूषण छापखान्याचे" मालक यांनीं हा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला व त्यांपैकीं एका विद्वान् गृहस्थानें कठिण कठिण शब्दांवर भरपूर टीपा दिल्या व प्रुफें तपासलीं त्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे. बालमित्र रा० रा० दामोदर बाळकृष्ण धुळेकर, हल्लीं असिस्टंट मास्तर रत्नागिरी हायस्कूल, यांनीं हा हस्तलिखित ग्रंथ वाचीत असतां मधून मधून बऱ्याच सूचना केल्या त्यांबद्दलही आभार मानणें अवश्य आहे.

अकोलें, वऱ्हाड,<br>
ता० ३ मे, सन १८८७ इसवी. } ग्रंथकर्ता.

## पात्रें.

सोमकांत–विजयानगरचा राजा.

महारवर्मा–पांडुरंगपुरचा राजा.

शूरसेन–वेणुग्रामाचा सरदार.

सुव्रत–सोमकांताच्या पदरचा एक वृद्ध सरदार.

वाचाल–शूरसेनाचा अनुयायी.

तरुण सरदार–शूरसेनाबरोबर पांडुरंगपुरास युद्धाकारितां गेलेले.

कारभारी–शूरसेनाच्या वाड्यांतील.

वेड्या–शूरसेनाच्या वाड्यांतील एक चाकर.

दुसरा एक चाकर.

विनता–शूरसेनाची आई.

जानकी–विनतेच्या घरीं वाढलेली एका वैद्याची कन्या.

वृद्ध विधवा–एक पांडुरंगपुरची.

पार्वती–तिची कन्या.

विजया }
सागरिका } –विधवेच्या शेजारणी.

सरदार, दास, पदाति इ०.

स्थल–दाक्षिणात्य देश.

# वल्लभानुनय.

## अंक १.

### प्रवेश १.—वेणुग्राम-जहागीरदाराच्या वाड्यांतील दिवाणखाना.

[ शूरसेन, विनता, जानकी आणि सुव्रत हीं येतात. ]

**विनता**—नुकतें कोठें मी मागलें दुःख विसरतें आहें तों तुह्मी याला घेऊन जायला आलां! आतां मी कोणाकडे पाहून दिवस कंठूं? सांगा बरें सुव्रत?

**शूरसेन**—आई! बाबाची मलाही आठवण होऊन तुला सोडून जाऊं नये असें एकवेळ वाटतें. पण महाराजांची आज्ञा प्रमाण! ते आतां मला पितृस्थानीं आहेत; तेव्हां गेलेंच पाहिजे.

**सुव्रत**—बाई! इतकी खंत आपण करूं नये. प्रजाजनांचा कोणी जवळचा आप्त मरतो त्याचा विसर आमचे महाराज त्यांस पाडतात. बा शूरसेना! तूं कांहीं काळजी करूं नको. महाराज तुला पुत्रवत् लेखितील. त्यांची काय दया! सर्वांवर त्यांचे प्रेम तें तुजवर असणार नाहीं काय? तुझें हें सौजन्य पाहून पाषाण सुद्धां द्रवेल, मग त्या दयासागर प्रभूची काय गोष्ट सांगावी?

**विनता**—पण महाराजांच्या प्रकृतीचें मान आतां कसें आहे? ईश्वर करो आणि त्यांस लवकर आराम पडो!

**सुव्रत**—महाराजांनीं आजवर पुष्कळ वैद्यांचीं औषधें घे-

तलीं, पण कोणाच्याही हातून काडीइतका देखील गुण आला नाहीं, तेव्हां त्रासून त्यांणीं तीं सर्व सोडून दिलीं आहेत. आतां काय तो प्रभूवर भरंवसा !

**विनता**—या मुलीचा बाप होता—मेलें माझ्या कपाळाला "होता" म्हणायाचें आलें !—तो कितई काय ह्मणून सांगूं ? वैद्य पण वैद्य. धन्वंतऱ्याची त्याच्या पुढें काय पाड? ब्रह्मदेवानें त्याला अमर करायाचें होतें ह्मणजे पुन: पुन: मनुष्यें घडण्याचे श्रम त्याला पडतेना, आणि यमाचे दूत तर काम नसल्यामुळें मग मौज मारीत बसते. आज हे वैद्यराज जिवंत असते, तर महाराजांची प्रकृति हां हां ह्मणतां त्यांनीं बरी केली असती !

**सुव्रत**—या वैद्यराजांना काय म्हणत बरें बाई ?

**विनता**—तुम्हाला नाहीं का माहीत ? आपले ते पुंडरीक बावत्रनकर ! त्यांची केवढी कीर्ति ! आणि उगीच नव्हती म्हटलें.

**सुव्रत**—होय. त्या सत्पुरूषाची कीर्ति मीं ऐकिली आहे. परवां त्यांच्याविषयीं गोष्ट निघाली होती तेव्हां "आपल्या राज्यांतील एक रत्न हारपलें !" असें ह्मणून महाराज फार कष्टी झाले. आणखी असेंही ह्मणाले कीं "नुसत्या ज्ञानानें अमर होतां येतें तर वैद्यराजांस मरणाची भीति नको होती—पण मरण कोणाला सुटलें आहे ?"

**शूरसेन**—महाराजांचें असें दुखणें तरी काय आहे ?

**सुव्रत**—त्यांस व्रणापासून पीडा आहे.

**शूरसेन**—मला हें नव्हतें कळलें.

**सुव्रत**—वा: ! हें तर सर्वांच्या कर्णोपकर्णीं झालें आहे—एकूण ही कन्या त्या वैद्यराजांची !

**विनता**—त्यांचें हें एवढेंच अपत्य बरें का ! जातेवेळीं त्यां-

नीं इला माझ्या ओटींत घातली आणि ह्मणाले "बाई! इचा सर्वपरीं तुह्मी सांभाळ करा बरें. आईबापांच्या ठिकाणीं इला आतां तुह्मीच". पोरही पण तशीच आहे हो. मोठी गुणाची! इला थेट बापाचें वळण! रत्नाला तसेंच कोंदण मिळालें म्हटलें! फार साधी! त्यानें तर तिचे गुण अधिकच खुलतात! असतील मोठे गुण; पण वर्तन चांगलें नसलें, तर ते गुण काय करायाचे आहेत बरें? उलटे दुर्लौकिकच करितील! पण इचे गुण इच्या साध्या वृत्तीला फारच शोभतात! मूळचाच स्वभाव चांगला, आणि हे गुण असे!-नांव ठेवण्याला एवढी सुद्धां जागा नाहीं!

**सुव्रत**—बाई! तें पाहिलें का? तुह्मीं केलेली स्तुति ऐकून तिला रडूं आलें.

**विनता**—लहान मुलींना रडें पण कसें ठेवलेलें! पण हें चांगलें; याच्या योगानें त्यांचा गर्व वाहून जातो! बापाची आठवण झाली ह्मणजे हिचा चेहरा खरकन उतरतो!-नको बेटा! नको रडूं—असें काय करावें बरें जानकी?—उगी, नाहीं तर लोक ह्मणतील सोंग करते ह्मणून.

**जानकी**—उगीच सोंग कां करूं?—[मनांत] खरें आहे, आणि खोटेंही पण आहे.

**सुव्रत**—गेल्यांचा शोक करावा हें खरें. पण त्याला कांहीं मर्यादा आहे ना! शोक करकरून त्यांच्या पाठीमागें तर नाहींना जायाचें!

**जानकी**—सर्व जगच माझा असा धिक्कार करील तर वाचून तरी काय करायाचें आहे?

**सुव्रत**—इचा काय बरें अर्थ असावा?

**शूरसेन**—आई मी येतों आतां!

**विनता**—बाळा शूरसेना ! ईश्वर तुझें कल्याण करो—त्यां-चें आचरण कसें होतें, तें लक्षांत ठेव, आणि त्याप्रमाणें वाग. तूं अझून हूड आहेस, तेव्हां जपून वाग; मोठ्या कुळांत जन्म असला ह्मणजे झालें नाहीं, त्याला अनुरूप असें वर्तन असलें पाहिजे.

[ अंजनीगीत. ]

सर्वांवरती प्रेम करावें,
थोड्यांवरि परि विश्वासावें,
कोणालाही दुःख न द्यावें,
सांगें हितवचन ॥ १ ॥

शत्रूहूनी प्रबल असावें,
परी तयाला नच पीडावें,
मित्ररहस्या नच भेदावें,
प्राण जरी गेले ॥ २ ॥

समजें बरवें मौन धरावें,
अधिक बोलुनी मूर्ख न व्हावें;
नांव कुळाचें तें राखावें,
करुनी सत्कृत्यें ॥ ३ ॥

कृपा प्रभूची तुजवर व्हावी,
सुखें सकल तीं तुज लाभावीं,
ऐशी जगदीशा सद्भावीं,
प्रार्थितसें नित्य ॥ ४ ॥

[ **सुव्रतास** उद्देशून ] यानें कीं नाहीं अझून जग पाहिलें नाहीं, तेव्हां याजवर तुमची नजर असूं द्या, आणि हिताच्या चार गोष्टी याला सांगत जा बरें.

**सुव्रत**—त्याविषयीं तुह्मी कांहीं काळजी करूं नका. माझे हातून होईल, तितकें मी केल्यावांचून राहणार नाहीं.

**विनता**—ईश्वर त्याचें कल्याण करो—शूरसेना ! मीं सांगितलेलें लक्षांत ठेव बरें. [ जाते. ]

**शूरसेन**—[ जानकीस उद्देशून ] मी येतों अं—माझ्या आईला सुख दे—तिनें तुला वाढविलें तेव्हां तिचें कांहीं कमती पडूं देऊं नको हो.

**सुव्रत**—आह्मी येतों आतां ! मुली, तूं आपल्या आईबापांचें नांव राख बरें—काय पण थोर ही—[**शूरसेन** आणि **सुव्रत** जातात. ]

**जानकी**—बाबाचेंच दुःख असतें, तर हरकत नव्हती ? यांना वाटलें, बाबाची आठवण होऊन, माझ्या डोळ्यांला पाणी आलें ! पण बाबा ! मला तुमची कोठें हो आठवण होते ? तुह्मी कसे होतां, हें सुद्धां माझ्या लक्षांत फारसें राहिलें नाहीं—काय करावें ? या माझ्या हृदयांत दोन मूर्ति राहूं सकत नाहींत—आतांशीं एकाच मूर्तीनें तेथें वास केला आहे. देवा ! काय मी करूं ! माझा वल्लभ गेला, आतां मी येथें कसे दिवस कंठूं ? पण मी केवढी वेडी बरें ? चंद्रावर प्रेम ठेवावें, आणि ह्मणावें कीं करीन तर हाच पति करीन, तशीच माझी गत आहे. जहागिरदाराचा मुलगा शूरसेन कोठें ? आणि पुंडरीक वैद्याची मुलगी जानकी कोठें ? हा वेडे जानकी ! हें काय तूं आपल्या पाठीमागें वेड लावून घेतलेंस ? हरिणी सिंहाची कोठें भाज झाली आहे काय ? सिंह पति मिळावा अशी जर तिनें इच्छा धरिली, तर ती कशी सफल

१ बायको; मानानें अति लहान व अति मोठे यांचा समागम होणें कठिण आहे, असा भाव.

होईल ? अशा इच्छेचा परिणाम एकच होणार ! कोणता तर मृत्यु !–आणि माझी ही स्थिति त्या हरिणीप्रमाणेंच झाली आहे. शूरसेनाची पत्नी होणें, याविषयीं तर नांवच नको–पण त्याजवळ राहून दर्शनसुख घ्यायाला काय हरकत आहे? चंद्राचें सौम्य बिंब पाहून कितीक गरीब दुबळे आनंद करून घेतात ! "तुह्मी मजकडे पाहूं नका" असें चंद्र त्यांस कांहीं ह्मणत नाहीं. पहा मीं घटकोघटकीं त्यास पाहून नेत्रोत्सव करून घ्यावा. त्याच्या त्या धनुष्यासारख्या भोंवया, त्याचे ते इंदीवरासारखे डोळे, आणि चंद्रासारखें वदन, हीं सर्व मीं आपल्या हृदयावर लिहिलीं आहेत–त्या सौम्य वदनाची येवढीशी रेखा ह्मणून लिहायाची ठेविली नाहीं. पण माझा वल्लभ आतां येथून गेला, तेव्हां हें नेत्रसुख मला पुनः कोठून मिळणार ? आतां हृदयपटावर लिहिलेलीच मूर्ति पाहून सुख करून घेतलें पाहिजे. पण हा कोण बरें येथें आला ?

[ वाचाल येतो. ]

हं ! हा वल्लभाचा सहचर ! वल्लभाला हा प्रिय ह्मणून मलाही प्रिय असावा ! पण याच्यासारखा लबाड बोलणारा दुसरा कोणी नाहीं, हा भला मूर्ख आहे, आणि भेंकडही तसाच ! पण जगांतला काय चमत्कार पहा, असल्या शठाला मान मिळतो, आणि सत्पुरुषाला कोणी विचारीत नाहीं किती निर्धन सज्जनांस सधन दुर्जनांची सेवा करावी लागते आहे बरें ?

**वाचाल**--कसें काय बाईसाहेब ?

**जानकी**–आणि तुमचें बोवासाहेब ?

**वाचाल**–छेः !

**जानकी**–छेः ! छेः !

**वाचाल**—कांहीं विचारांत आहां वाटतें ?

**जानकी**—होय. तुह्मी आणि तुमचे धनीसाहेब नगरास जाणार. तेव्हां तुमची आतां चैन! विद्यानगर ह्मणजे विलासांचें स्थान. तेथें सर्व कांहीं मिळतें. तेथें माता, भगिनी, जाया, भ्राता, सुहृद्, आप्त, सर्व सांपडतात. 'देवी', 'जीवित', 'द्वितीय हृदय', 'नेत्रवार्तिका', 'कौमुदी', आणि इतर जे कांहीं चाटुवादें[1] रतिरमणें[2] प्रणयिजनांच्या[3] मुखांतून वदवितो, त्या सर्वांचें स्थान तेंच. धनीसाहेबांस तेथेंच—काय ह्मणूं ?—ईश्वर त्यांचें कल्याण करो—राजमंदिर हें अद्वितीय स्थान आहे. सर्वप्रकारें शिक्षण तेथें मिळतें—तेथें ते गेले ह्मणजे मग मी—

**वाचाल**—मग तुह्मी काय करणार ?

**जानकी**—त्यांचें कल्याण चिंतीन. हें पहा—

**वाचाल**—काय पहा ?

**जानकी**—आमच्या सारख्यांच्या हातून कल्याण होण्याजोगतें असतें, तर बरें न का होतें ? पण आह्मी—आपले गरीब; घरच्याघरीं स्वस्थ बसावें—आणि निजबंधूंचें कल्याण चिंतीत असावें, येवढेंच. पण अशानें त्यांचें कल्याण कसें होणार ?

[चाकर येतो.]

**चाकर**—वाचालमहाराज! धनीसाहेब तुह्माला बोलावतात. चला! [चाकर जातो.]

**वाचाल**—जानकीबाई! आह्मी येतों. राजमंदिरांत तुमची आठवण झाल्रीच, तर करूं. झालें !

**जानकी**—तुह्मी चांगल्या नक्षत्रावर जन्मलां, खास !

**वाचाल**—हो हो! ह्यांत काय संशय! मंगळावर माझा जन्म आहे.

---

१ गोडभाषणें; २ मदन; ३ कामी.

**जानकी**–होय. मंगळावरच असला पाहिजे?

**वाचाल**–कां बरें?

**जानकी**– कारण तुह्मी जेथें जातां तेथें सर्व मंगळच!

**वाचाल**–म्हटलें, मंगळ त्यावेळीं उच्चस्थानीं होता.

**जानकी**–होय, असला पाहिजे खचित.

**वाचाल**–कशावरून?

**जानकी**–तुमची पाठ जमिनीला लागली ह्मणजे मंगळ उंचस्थानीं दिसणारच!

**वाचाल**–बरें आहे. आतां बोलत उभें रहायाला वेळ नाहीं. आह्मी जातों, ओळख राहीलच. आह्मी नगराहून पुनः परत येऊं, त्यावेळीं चांगले शहाणे बनून येऊं; आणि मग पाहूं कोण कोणाला हटवितें तें. येतों अं.

**जानकी**–यावें, वाचालराज! [ **वाचाल** जातो. ]

पुष्कळदां कार्यसिद्धि आपल्या हातूनच होण्यासारखी असते. परंतु आपण उगीच दैवावर अवलंबून राहतों. आपणाला हातपाय नाहींत काय? बुद्धि नाहीं काय? त्यांची शक्ति दैवानें कमी केलेली कोठें ऐकिली आहे? आपणच जेव्हां आळशी होऊन बसतों, तेव्हां मात्र दैव त्यांची शक्ति कमी करितें. असल्या दुष्प्राप्य रत्नाविषयीं अभिलाष करण्यास माझ्या मनाला कोणीं बरें सांगितलें? हें रत्न नेत्रांनीं पाहतां येतें; पण हस्तगत होईल काय? कां नाहीं होणार? ती शकुंतला अशी कोण होती? जांबुवती तरी कोण? समसमानांचाच जोडा होतो, असें कोठें आहे? पार्वती गिरिराजाची कन्या. तिनें कैलासनाथ नाहीं आराधिला काय? आणि जरी तिला त्यानें एकदां झिडकारिलें तरी शेवटीं आपल्या तपोबळानें त्यास तिनें वश नाहीं केलें काय? असाध्य असाध्य तें काय

आहे? मनोनिग्रह मात्र पाहिजे, ह्मणजे कांहीं असाध्य नाहीं. पार्वतीनें जसा वल्लभ मिळविला तसा मला कां नाहीं मिळवितां येऊं? खरें जर माझें प्रेम असेल तर वल्लभानुनय[1] होईलच. महाराजांचा आजार—माझा बेत फसेल—फसो—पण माझा जो निश्चय कीं पति करीन तर तोच—तो कधींही बदलावयाचा नाहीं, हें मात्र खास—[ जाते. ]

---

## प्रवेश २.

### स्थळ—विजयानगर. राजमंदिरांतील एक दिवाणखाना.

[राजा आणि सरदार बसले आहेत. जवळच परिवार उभा आहे.]

**राजा**—एकूण पांडुरंगपुरावर यवनांनीं स्वारी केली; एक दोन युद्धें झालीं त्यांत शत्रूचा पांडुरंगपुरकरांनीं बराच मोड केला आहे.

**१ सरदार**—होय; असें मीही ऐकतों.

**राजा**—ऐकीव गोष्ट नव्हे. मला प्रहारवर्म्याकडून पत्रें आलीं आहेत, आणि त्यानें माझें साहाय्य मागितलें आहे. यावेळीं जर त्याला सैन्याची कुमक केली नाहीं, तर यवनांचा जोर होईल. एव्हांच ते प्रबल झाले आहेत. आणि हळूहळू त्यांनीं आपलीं दक्षिणेतील लहानसान संस्थानें ग्रस्त करून टाकिलीं आहेत. तेव्हां या वेळेस पांडुरंगपुरास कांहीं सैन्य पाठविलेंच पाहिजे.

**१ सरदार**—होय; मलाही तसेंच वाटतें. आपल्या सामंत[2] नृपाला योग्यकालीं आपण साहाय्य करूं नये तर कसें होईल?

**राजा**—तर मग एक मोठी सेना तयार करून पाठवावी. ज्या

---

१ प्रियाचें प्रसादन; २ मांडलिक राजाला.

वीरांची युद्धास जाण्याची इच्छा असेल, त्यांनीं खुशाल जावें. मीही गेलों असतों, परंतु या व्याधीमुळें माझें कांहीं चालत नाहीं.

**२ सरदार**–पुष्कळ वीर युद्धास जायास उत्सुक आहेत, त्यांस महाराजांची आज्ञा मात्र पाहिजे होती. युद्धाचें नांव ऐकिलें ह्मणजे वीरांचे बाहु स्फुरण पावतात. प्रभुचरणप्रतापाच्या जोरावर आह्मी समरांत जयश्री मिळवूंच मिळवूं–महाराजांस मात्र लवकर आराम पडावा.

**राजा**–माझ्या प्रकृतीविषयीं इतकी तुह्मी काळजी कां वाहतां? जगदीशाच्या मनांत असेल, तर एका घटकेंत व्याधि दूर होईल; आणि त्याची इच्छा तशीच असेल, तर मी या क्षणास त्याच्या चरणाजवळ जायाला सिद्ध आहें.

**२ सरदार**–महाराजांनीं असें अमंगल भाषण करूं नये.

[ प्रतिहारी येते. ]

**प्रतीहारी**–महाराज! शूरसेन, सुव्रत, आणि वाचाल आले आहेत. महाराजांची आज्ञा होईल तर त्यांस आंत घेऊन येतें.

**राजा**–तर मग त्यांस लवकर आंत घेऊन ये.

[ **शूरसेन**, **सुव्रत**, आणि **वाचाल** येतात. ]

**सुव्रत**–बा शूरसेना! हे महाराज बसले आहेत त्यांस विजय कर.

**शूरसेन**–जयतु जयतु[१] महाराजः[२]!

**सुव्रत**–विजयतां महाराजः[३]!

**वाचाल**–महाराजांचा जयजयकार असो.

---

१ जयजयकार; २ महाराजांचा जय असो; ३ महाराजांचा विजय असो.

**राजा**—वा शूरसेना! असा इकडे ये. तुझें मुख तुझ्या पित्याच्याप्रमाणेंच आहे.

सौंदर्यसारसमुदायें[1] महाप्रयासें
योजी तुला घडवितां विधि साच भासे ।
त्वद्रूप हें जनकतुल्य दिसेच सत्य
तच्छीलतुल्य तव शील असोच नित्य ॥

**शूरसेन**—महाराजांची मजवर कृपा आहेच, तेव्हां मी काय बोलूं?

**राजा**—शूरसेना! तुझ्या ताताचें आणि माझें फार सख्य! आम्हीं शस्त्रास्त्रविद्येचें अध्ययन एका गुरूपाशीं केलें. पहा तो

शस्त्रास्त्रविद्येंत असे प्रवीण.
युद्धांत त्याच्या सम सांग कोण?
नृपालकार्यार्थरतैकचित्तें[2]
अर्पी तनू आणि समग्र वित्त ॥

त्याची गोष्ट काढिली ह्मणजे मला हुशारी वाटते. त्याच्या भाषणांत फार रस असे. तरी

न परिहासकथांतें[3] कदाचन
अनृत उक्ति करी, न च वंचन ।
अभिजनत्वें[4] न तो हरवीतसे,
स्ववचनें मधुरें मधु वीतसे ॥

बरें, पुनः लोकांशीं वागण्यांत आढ्यता? तिचें नांव नको—

मद तया न शिवे, न तिरस्कृति,
परिजनीं ममता करि तो अति ।

---

१ लावण्याच्या तत्वांचा समुदाय. २ राजाच्या कार्याविषयीं तत्पर; ३ थट्टेंत; ४ मोठेपणा.

जरि असे जनि[1] थोर कुलांत ही
विनयशांतिगुणीं[2] रिझवी मही ॥

लहानथोराशीं अगदीं सारखा. कोणाचें मन दुखवायाचें नाहीं, तरी सत्यप्रिय !

**समयीं हितकर जें कां तें कटु भाषण करी, न भी कोणा;**
**परिणामीं पथ्यचि तो, वाटे काढाहि कटु जरी रुग्णा[3] ॥**

त्याचा कित्ता अलीकडील तरुण पुरुष घेतील तर काय न होईल ?

**शूरसेन**—महाराजांनीं बाबाची स्तुति करावी, हें आम्हांस भूषण आहे. महाराजांच्या चरणकृपेनें मी त्यांनीं लावून दिलेल्या मार्गानें चालेन.

**राजा**—हर ! हर ! तो मला सोडून गेला ! असो ईश्वराची मर्जी ! सुखोपभोग त्यास फारसे आवडत नसत. तो असें ह्मणे कीं मनुष्यानें उद्योगीं रत व्हावें, विलासांत काल घालवूं नये. त्याचें भाषण एका कानानें ऐकावें आणि दुसऱ्या कानानें सोडून द्यावें, असें कधींही नसे. तें कसें माझ्या मनांत बिंबलें आहे ! अहाहा ! त्याची आठवण झाली ह्मणजे ती मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते. विलासांत कांहीं काल व्यर्थ गेला ह्मणजे तो असें ह्मणे—

" जीवितप्रदीप हा मदीय शुभ्र जों जळे
राहिजे जगांत तों, विलेपिजे न काजळें ।
बाहुवीर्य तैल त्यास, तें पडें उणें जयीं
मंद होय कीर्तिदीप्ति, मृत्यु गोड तो तयीं ॥"

तरुणजनांनीं आपला परिहास करावा इतकें वृद्ध होणें हें त्यास आवडत नसे; यांविषयीं तो असें ह्मणे—

---

१ जन्म; २ विनय व शांति या गुणांनीं; ३ रोग्याला.

" वाटे जुनें तें तरुणांस निंद्य,
नवीन तैसें गमतेंच वंद्य ।
क्षणांत बुद्धी फिरते तयांची,
सूर्यास्तिची श्रीहि जशी घनांची ॥ "

माझेंही मत आतां त्याच्या प्रमाणेंच होऊं लागलें आहे. तेव्हां ईश्वर केव्हां दया करील ती करो. आह्मी आतां काय कामाचे ?—

मिळवितों न धना नच राखितों,
शिथिल[१]बाहु रिपूस न हाणितों ।
सुचिवलब्धधनावरि[२] गाजतों,
अहह कष्ट ! कशास्तव वाचतों ! ॥

२ सरदार—महाराज ! हें असें काय बोलावें ? प्रजाजनांस आपण फारच प्रिय आहां ! आपलें जीवित तें आमचें जीवित! आमचीं सर्व आयुर्दायें[३] आपणांस असोत.

राजा—दिवस काढतों आहे झालें! दुसरें काय ?—काय रे शूरसेना ! तुमच्या पदरीं एक वैद्य असे त्याचा काल होऊन किती दिवस झाले बरें ? त्याचा नांवलौकिक फार होता.

शूरसेन—त्यांचा अंत होऊन सुमारें सहा महिने झाले असतील महाराज !

राजा--तो आजवर जिवंत असता, तर त्याचेंही औषध घेऊन पाहिलें असतें. बाकीच्यांचीं औषधें घेऊन कंटाळलों. यमाचें आणि शरीराचें भांडण लागलें आहे. पाहूं कोणाला जय मिळतो तो.—या शूरसेना ! आलास बरें झालें—तुजपेक्षां

१. ढिल्या भुजांचे. २ प्रधानानें मिळविलेल्या द्रव्यावर. ३. आयुष्य.

माझ्या पुत्रावरही माझें अधिक प्रेम नाहीं. जरा हात द्या पाहूं–

**शूरसेन**–महाराजांनीं घेतलेंच आहे मला पदरांत–

[जातात.]

---

## प्रवेश ३.

### स्थळ.–वेणुग्राम, जहागीरदाराच्या वाड्यांतील एक खोली.

[विनता, कारभारी, आणि वेड्या येतात.]

**विनता**–आतां मला वेळ आहे. सांगा काय तुम्हाला मुलीविषयीं सांगावयाचें आहे तें.

**कारभारी**–बाईसाहेब! आपल्या मर्जीप्रमाणें काम होण्याला मी किती झटत आहें, हें मी बोलून दाखवावें असें नाहीं, आपल्या अनुभवास आलेंच असेल. आपल्या तोंडानें आपण आपली स्तुति केली, तर आपल्या खऱ्या योग्यतेस तितका कमीपणा येतो आणि विनयाचा[1] लोप होतो.

**विनता**–पण या सोद्याचें येथें काय काम आहे? कशाला रे येथें आलास तूं? चल जा येथून. तुजविषयीं मीं पुष्कळ गाऱ्हाणीं ऐकिलीं आहेत; तीं सर्व खरीं आहेत असें मी मानीत नाहीं. पण मी मनावर घेत नाहीं म्हणून! कारण मला ठाऊक आहेस तूं कांहीं कमी लबाड नाहींस. सर्व लबाड्या करण्यासारखा तूं आहेस!

**वेड्या**–बाईसाब! तुम्हासनी न्हाइ का ठाव मी आपला गरीब हाए म्हूनशान?

---

१ नम्रतेचा.

विनता—होय मग ?

वेड्या—पन तसा गरीब न्हाइ काई. पन बाईसायबाची मर्जी व्हइल तर घर करीन ह्मटलं.

विनता—घर करीन ह्मणजे ?

वेड्या—ह्मनजे दो हाताचे चार हात करीन. तो उखाजी ह्मनतो हाय तुला मी आपली प्वोर नर्मदी देतों ह्मनून ?

विनता—लग्न करून भीक मागायची आहे वाटतें ?

वेड्या—अन् मी भीकच मागायला लागलों तर माझी न्हाइ का बायको माझ्या पाठीमांग झोळी घेऊनशान चालनार ? असलच नशिबीं तर मागूं आम्ही भीक. पन बाईसाहेबांनीं इतकी भीक घालावीच.

विनता—अरे कोणची भीक ?

वेड्या—माझं लगन करून द्यावच.

विनता—कोणाशीं ?

वेड्या—अन् त्या नर्मदीशीं. अन् का म्हंगाल तर लगन केल्याबिगर परिनाम ग्वोड न्हाइ बघा. पोर झालीं ह्मनजे पितर नरकांतून सुटत्यात न्हाइ बरं ? पोराबाळांबिगर अन् घर सोभत व्हय ?

विनता—येवढ्याच करितां का तूं लग्न करणार ?

वेड्या—अन् दुसरी मांयदळ कारन हायतीं.

विनता—आणि तीं कोणतीं रे ?

वेड्या—मी आतां म्होटा न्हाइ झालोया ? आणि आतां म्हतारा न्हाइ होनार ? संव्हा हातपाय चेपायला अन् तांब्याभर पानी द्यायला आपलं घरांत एक मानूस नसावं बरं ?

विनता—हा गुलामा !

वेड्या—अन् दुसरं येक कारन हाय. त्ये ह्ये. माझे सगे

सोयरे कोनी न्हाइ राहिलेती. तऱ्हा लगन केलं म्हनजे बा-यकोचे सग सोयरे त्ये आपलेच सोयरं व्हतील.

**विनता**—अरे पण वेड्या बायकोचे आप्त आपल्या काय कामाचे ?

**वेड्या**—अन् का बर न्हाइत कामाचे ? रिकामटेकडे ब-सून न्हाइत का आयती भाकर खायाचे ? म्होत्या म्होत्या घरान्यांतबी न्हाइका अस बायकोच गोत जमत ? त्ये जसं त्यांच्या कामास येत, तसं माझबी माझ्या कामाला वखताला यईलच यईल.

**विनता**—गुलामा ! तू जन्मभर असाच लोकांची निंदा करीत राहणार का ?

**वेड्या**—न्हाइ बाइसाब ! मी निंदा कुठे करतोया. मी तर खरं बोलतोया.

## गाणें.

अर यक तुजला गोष्ट सांगतों कळून येइल तुला जी जी जी ॥ १ ॥
असल नशीबीं व्हइल लगन तुझ नको खंत करू गुला जी जी जी
चैतर येतां फुटे कसा तो शबुद कोकिळेला जी जी जी ॥ २ ॥

**विनता**—फार चावट आहे. जा या वेळीं, मग एखादे वेळीं बसेन तुझ्याशीं बोलत.

**कारभारी**—बाईसाहेब ! त्याला सांगावें कीं जानकीबाईला पाठवून दे ह्मणून. तिजविषयीं मी आपणाला कांहीं सांगणार आहें.

**विनता**—जारे ! तिला जाऊन सांग कीं मी बोलावलें आहे ह्मणून. जानकीला हो !

**वेड्या**—

## गाणें.

अशोकझाडाखालीं बसली रडत राहिली जानकी ।
वणांत फिरती कष्ट पावती बुडती माझे पति शोकीं ॥
लंकेचा हा राणा म्हंगतो हो तू माझी राणी कीं ।
आतां राखीं लाज माझी देवा करुणा मी भाकीं ॥ १॥

**विनता**–वेडा तर खराच. जानकीचें नांव काढल्याबरोबर लागला गायाला जानकीचें गाणें.–

**वेड्या**–अन् याबी आमच्या जानकीबाइसाव अकशी न्हाइतका मुळू मुळू रडत बसल्यात? आपनास काय ठावं काय म्हनून रडल्याती ? आपनास कोनी पंचाइत सांगितली हाय ?

**विनता**–जा रे, तुला सांगितलें ना कीं जानकीला बोलाव म्हणून? बसला आहे येथें टवाळकी करीत. जा कसा.

**वेड्या**–ये बघा कस हाय ते. बोलल न्हाइ तर म्हंगतात काय ल्येकाचा मुखदुर्बळ ! अन् बोलावं तर म्हंगतात टवाळकी करतोया. मुरडुंगावाणी आपली गत हाय. त्याला दोकडनं बी मार मिळतोया. यंवा इथून जावं ह्येच बरं [जातो.]

**विनता**–आतां सांगा तुम्ही काय म्हणणार होतां तें ?

**कारभारी**–आपण या मुलीवर फार लोभ करितां, हें मला ठाऊक आहे.

**विनता**–लोभ करावा अशीच ती आहे. बापानें तिला माझ्या स्वाधीन केलें, तेव्हां तिच्यावर लोभ केलाच पाहिजे. मा नाहीं केला तर कोण करील? मी करतें हा खरोखर थोडाच आहे.

**कारभारी**–काल सायंकाळच्या सुमारास हिशेब लिहीत मी ओसरीवर बसलों होतों, इतक्यांत देवघरांत कोणी स्फुंदून स्फुंदून रडत आहे, असा मला भास झाला. तेव्हां मी तसाच

उठून देवघराच्या दाराशीं गेलों, आणि पहातों तों दाराला आंतून कडी लाविली आहे. नंतर मी दाराच्या फटींतून आंत पाहूं लागलों तों जानकी हात जोडून अंबाबाईची प्रार्थना करीत आहे, मधून मधून रडत आहे, व आपणाशीं-च बोलत आहे, असें मला दिसलें. तिला आपलें बोलणें कोणी आडून ऐकत आहे, असें मुळींच वाटलें नसावें ह्मणून ती मन मोकळें करून आपणाशींच बोलत असावी असें मला वाटलें. तिच्या त्या बोलण्यावरून मला इतकें कळून आलें कीं तिचें मन आपल्या बाळासाहेबांवर जडलें आहे, आणि तिचा असा निश्चय झाल्यासारखा दिसतो कीं करीन तर शूरसेनच पति करीन. तिनें दैवाचा उपहास[1] करून असें ह्मटलें कीं " आमच्या कुलामध्यें इतकें मोठें अंतर कां ठेविलें? समसमान स्थितींतल्याच जोडप्यांच्या गांठी बांधणाऱ्या ब्रह्मदेवाला तिनें नांवें ठेविलीं. नंतर मदनास दूषण दिलें कीं खरोखरच ज्यांचें प्रेम आहे त्यास जर तूं सहाय न झालास तर तुझें ब्रीद कसें राहील? अशा प्रकारें विलाप करून अंबाबाईची तिनें प्रार्थना केली कीं हे माते जगदंब! माझा कामना पूर्ण करणारी तूंच आहेस. तूंच आपल्या कन्येचें कल्याण करण्यास समर्थ आहेस. तुला माझी करुणा येणार नाहीं तर मग कोणास येईल?"—झालेला मजकूर आपणास कळवावा, हा माझा धर्म समजून मी आपणापाशीं बोललों. यांत आपला संबंध आहे, तेव्हां विचार करून काय करावयाचें असेल तें करावें.

विनता—तुह्मीं ही गोष्ट मला कळविली, हें योग्यच केलें. आतां ही गोष्ट दुसऱ्या कोणाजवळ बोलूं नका. मला पुष्कळ

---

१. निंदा.

कारणांवरून संशय आला होताच. पण तो संशय खरा कीं खोटा याचा निर्णय करवेना. आतां तुम्ही जा. ही गोष्ट कोणाच्या कानावर जाऊं देऊं नका. पुनः मी तिजविषयीं बोलेन. तुम्ही मला प्रथम सांगितलें हें फार चांगलें केलें. आतां जा.

[ कारभारी जातो. ]

## साकी.

**युवतीचें[१] मज गमतें अकृत[२] प्रेम पहा हें साचें ।**
**पीडिति युवतिजनाला बहु हे सायक[३] रतिरमणाचे[४] ॥**
**आला अनुभव हा मजला । कैसें दूषिनें[५] युवतीला ॥ ५.**

ही जानकी आली! इचे नेत्र पहा किती आरक्त[६] झाले आहेत!

[ जानकी येते. ]

**जानकी**—बाई! कशाला मला बोलावलें?

**विनता**--जानकी! मी तुझी आई नाहीं काय?

**जानकी**—तुह्मी माझ्या आई नव्हत, बाई आहां.

**विनता**—आई कां नाहीं? आई ह्मटल्याबरोबर अशी चपापलीस् का? नव्हे, मी आईच बरं, पोटच्या पोराप्रमाणें मी नाहीं का तुला वाढविलें? पोटचेंच तें काय अधिक असतें? आईप्रमाणें मीं तुजवर ममता केली आणि तूंही पोटच्या पोरीप्रमाणें माझा मान ठेविला पण असें काय गडे? मी तुझी आई आहें असें ह्मटलें हें कां नाहीं तुला आवडलें? आणि असें वेड्यासारखें कां बरें डोळ्यांत पाणी

---

१. तरुणस्त्रीचें; २. साहजिक, बुद्ध्या करून न होणारें; ३. बाण; ४. मदनाचे; ५. दोष लावीन; ६. लाल;

आणावें? तुला एवढें कसलें दुःख झालें? तूं माझी मुलगी आहेस ह्मणून?

जानकी–नाहीं बाई! तुझाला "मुली" ह्मणून हाक मारतां येत नाहीं ह्मणून—

विनता–कां नाहीं? मी तुझी आई तेव्हां "मुली" ह्मणून हाक मारण्याला मला काय हरकत आहे?

जानकी–असें कसें होईल? वेणुग्रामाचे सरदारास मी भाऊ कशी ह्मणेन? ते मोठे, मी लहान. त्यांची आणि माझी बरोबरी कशी होईल? ते माझे स्वामी–त्यांची मी दासी, आणि जन्मभर मी त्यांची सेवा करणार. तेव्हां ते माझे भाऊ कसे होतील?

विनता–आणि मीही आई कशी होईन? असें तुझें ह्मणणें?

जानकी–काय बोलावें हें मला सुचत नाहीं बाई! तुह्मीं आईप्रमाणें मला वाढविलें तेव्हां आई खऱ्या, पण असें झालें ह्मणजे आपल्या पोटच्या रत्नाशीं माझें बहिणीचें नातें लागेल. तें कसें जमेल? तेव्हां मी तुह्माला बाई ह्मणूनच हाक मारीन.

विनता–तर मग नुसतें 'बाईच' ह्मणूं नको, "सासूबाई" ह्मणून हाका मार. हेंच तर नव्हतें तुझ्या मनांत? पण अशी एकदम तुझी मुद्रा कां उतरली? एकूण मी सहजगत्या बोललें तेंच खरें. तूं मला सासूबाई ह्मणून हाक मारणार? अग बाई! आतां सर्व कळून आलें–एकीकडे बसणें कां आणि वरचेवर डोळ्यांत पाणी आणणें कां तें? आतां गोष्ट चोरूं नको–तूं माझ्या पुत्राला वरणार! तूं तोंडानें जरी नाहीं ह्मटलें तरी ही बेटी मुद्रा मोठी चहाडखोर आहे! ही आपलें सर्व इद्गत[1] दुसऱ्याला कळविते! तेव्हां खरेंच सांग, पण सांगणार

---

१. रहस्य.

हेंच. हें बघ हें गालांतळें हसें तीच गोष्ट सांगतें ! हे डोळे तरी तुझें सर्व प्रेम उघाडीस आणतात—लबाड काय ती एक जीभ आहे! ती मोठी हट्टी ! खरें बाहेर पडलें तरी तें तिच्यानें बोलून दाखवितां येत नाहीं ! मग सांग, माझा संशय खरा कीं नाहीं ? असला तर मी कांहीं तुजवर रागें भरणार नाहीं! नसला तर तसें सांग. तरी पण खरें सांग. ह्मणजे माझ्या हातून तुझें बरें होईल तितकें करून पाहीन.

**जानकी**—बाई मजवर रागें भरूं नका—

**विनता**—मी रागें भरत नाहीं. पण सांग तुझें प्रेम माझ्या मुलावर आहे कीं नाहीं ?

**जानकी**—क्षमा करा, मी अपराधी आहें.

**विनता**—फिरून तेंच. मी तुला विचारतेंना तुझें प्रेम माझ्या मुलावर आहे कीं नाहीं ह्मणून ?

**जानकी**—तुमचें नाहीं का प्रेम त्याच्यावर ?

**विनता**—अशी लटपट ग कां ? माझें प्रेम निराळें. तें जगजाहीर आहे, आणि त्याला कोणाची आडकाठी नाहीं. चल, चल, कबूल हो. कारण आतां कांहीं बाकी उरली नाहीं.

**जानकी**—तर मग खरें सांगतें. तुमच्या पाया पडतें, मजवर रागावूं नका. माझें प्रेम आपल्या पुत्रावर जडलें. त्याला मी काय करूं ? माझे आईबाप दुबळे पण खरे होते. तशीच गत माझ्या प्रेमाची. तेंही बिचारें दुबळें पण खरें आहे. आपणाला राग येऊं नये कांहीं. माझें प्रेम त्यांजवर आहे, ह्मणून त्यापासून त्यांना कांहीं पीडा व्हावयाची नाहीं. त्यांना ही गोष्ट मुळीं ठाऊक नाहीं. आतां त्यांची योग्यता माझ्यामुळें कमी होत असेल, तर माझा त्यांशीं

विवाह व्हावा असें सुद्धां मी इच्छिणार नाहीं. माझी योग्यता त्यांच्या बरोबरीची होईल तेव्हांच अशी इच्छा धरीन. पण असें कोठून घडून येणार? माझें प्रेम सफल होणार नाहीं. हें दिसतेच. पण तें आवरणें माझ्या कोठें हातीं आहे? न मिळत्या वस्तुचा अभिलाष केला हें माझें वेड खरें. पण या वेडांतच मला सुख आहे. बालक चंद्राची अपेक्षा[1] धरितें, ती चंद्राला काय ठाऊक? आणि तिजपासून चंद्राला काय अपाय[2] होणार? तसें माझ्या प्रेमापासून आपल्या पुत्राला काय पीडा होणार? याकरितां आपल्या प्रियकर पुत्रावर माझें मन जडलें ह्मणून माझा धिक्कार करूं नका. आपणालाही युवतीजनाच्या प्रणयाचा[3] अनुभव आलाच असेल. तो प्रणय कसा व्यापक[4] असतो, आणि युवतींच्या कोमल अंतःकरणास कसा धीर देतो, हें आपणास ठाऊक नसेल असें नाहीं. तेव्हां या कन्येकडे प्रेमदृष्टीनें पहा, आणि अलभ्य विषयावर तिचें मन जडलें आहे ह्मणून तिचा उपहास[5] करूं नका. या प्रणयांतच तिला सुख होत आहे, तेव्हां त्यांतच तिचा अंत झाला तरी तो तिला प्रियच आहे!

**विनता**-तुझा विचार होताना कीं विजयानगरास जावें ह्मणून? खरेंच सांग.

**जानकी**—होता खरा.

**विनता**—कशाकरितां, खरेंच सांग.

**जानकी**—खरेंच सांगतें. आपणाजवळून कांहीं चोरून ठेवीत नाहीं. माझ्या बापानें मजला मरतवेळीं चांगलीं चां-

---

१. इच्छा; २. बाधा; ३. प्रीतीचा; ४. सर्वत्र असणारा; ५. अवमान, थट्टा.

गलीं औषधें दिलीं आणि त्यांची योजना कोणत्या रोगावर कशी करावी हें लिहून ठेविलेली वहीही दिली त्यांनीं मला असें सांगितलें "कीं मुली, हीं औषधें खातरीचीं आहेत बरें. जपून ठेव. हीं केव्हां तरी तुझ्या कामास येतील." हें सर्व आपणाला ठाऊक असेलच. हल्लीं ज्या रोगापासून महाराजांस पीडा होत आहे, व तो असाध्य[1] आहे असें ह्मणतात, त्यावर रामबाण असें एक औषध त्या वहींत सांगितलें आहे.

**विनता**–याकरितांच तर मग तूं विजयानगरास जाणार होतीस?

**जानकी**–बाई–मी खरेंच सांगतें. आपल्या आज्ञेवांचून जाणार तर नव्हतेंच. पण आपले पुत्र विजयानगरास गेले, ह्मणून मला हें औषध आठवलें. ते जर येथें असते तर महाराजांचा रोग, तीं औषधें आणि ती वही, यांची मला आठवणही होतीना.

**विनता**–पण तुला वाटतें का जानकी! तुझें औषध महाराज घेतीलसें? महाराजांची खातरी झाली आहे कीं वैद्यांच्या औषधांपासून कांहीं गुण येत नाहीं आणि वैद्यांनीं-ही हात टेकले आहेत. तेव्हां जेथें मोठमोठ्या नामांकित वैद्यांनीं रोग असाध्य ठरविला तेथें तुजसारख्या अजाण कन्येच्या ह्मणण्यावर त्यांचा विश्वास कसा बसेल?

**जानकी**–माझें मन सांगतें कीं या कामांत ईश्वर मला यश देईल. बाबाची योग्यता आपणाला ठाऊकच आहे, तेव्हां आपण जर परवानगी द्याल तर महाराजांना मी औषध देईन. बाबाच्या औषधावर माझा इतका विश्वास आहे कीं महाराजांनीं ह्मटलें कीं तुझें औषध घेऊन अमुक दिवसांत

---

१. औषधोपचारांनीं बरा न होणारा.

मला गुण न आला तर तुला सुळीं देईन, तरी मी कबूल करीन.

विनता—अशी तुला खातरी आहे काय ?

जानकी—होय सर्वांशीं माझी खातरी आहे अशी !

विनता—तर मग मी तुला जायास परवानगी देतें. उद्यां तूं येथून नीघ तुझी सर्व तयारी करून देण्यास सांगतें. चाकरमाणसें, शिबिका, पैसा तुजबरोबर देतें. विजयानगरांत माझे आप्त आहेत, त्यांस पत्रें देईन तीं नेऊन दे. ह्मणजे ते तुझी तेथें सर्व व्यवस्था ठेवितील. कांहीं मनांत संकोच धरूं नको. माझ्या हातून होण्यासारखें असेल तें सारें करीन. ईश्वर करो आणि या कामांत तुला यश मिळो.

---

१. पूर्णपणें; २. पालखी.

---

अंक १ ला समाप्त.

# अंक २ रा.

—०:*:•—

## प्रवेश १.

स्थळ—विजयानगर. राजमंदिरांतील एक दिवाणखाना.

[भालदार चोबदार पुकारतात—" राजाधिराज सोमकांत महाराज"—तदनंतर राजा, पांडुरंगपुरास युद्धाकरितां जायाला निघालेले दोन सरदार, शूरसेन, वाचाल आणि सेवक येतात.]

राजा—सरदार हो! ही वीर*श्री कमी होऊं देऊं नका. मीं सांगितलेलें उभयतांही लक्षांत ठेवा.

१ सरदार—आह्मी संग्राम[1] करून परत येऊं तेव्हां महाराजांची प्रकृति बरी झालेली पाहूं.

राजा—त्याचें तर नांव बोलूं नका. रोगानें माझें शरीर इतकें ग्रासिलें आहे, तरी माझें धैर्य खचलें असें नाहीं—तरूण सरदार हो! तुह्मांस जयश्री[2] प्राप्त होवो! मजबद्दल कांहीं काळजी वाहूं नका. माझें कांहीं होवो, तुह्मी मात्र विजयानगराच्या नांवाला कळंक लावूं नका. पुन: एकवार लक्षांत ठेवा—

### श्लोक.

स्वकुलनाम[3] तें दूषवूं[4] नका
कीर्ति जोडण्या देहही विका।

---

* लढण्याविषयीं औत्सुक्य; १ लढाई; २ जयरूपी संपत्ति; ३ आपल्या कुळाचें नांव किंवा आपलें कुळ व नांव; ४ दोष लावून घेऊं.

युद्ध तूमचें अरिस[1] नावरो
विजयदेवता[2] झणिं[3] तुह्मां वरो ॥

बरें आहे–आतां या.

**२ सरदार**–आपल्या प्रकृतीला आराम[4] पडो ह्मणजे झालें.

**राजा**–पांडुरंगपुरास जातां आहां. पण सावध असा–तेथील स्त्रियांच्या मोहक लावण्याची[5] आख्या[6] आहे. कामिजनास भुरळ कशी पाडावी ही विद्या त्यांस चांगली माहीत आहे; तेव्हां जपून वागा.

### श्लोक.

वरवे पाश शत्रूचे तरुणीचे न ते परी ।
पहिल्या ये तोडितां धैर्यें दुजातें कोण संहरी ॥

**१ आणि २ सरदार**–आपला उपदेश आह्मी कधींही विसरणार नाहीं.

**राजा**–बरें तर या.–मला या सिंहासनावर बसवत नाहीं. सेवकहो ! मंचकावर[7] पडावेंसे वाटतें– चला. [ राजा सेवकांचा हात धरून मंचकावर जाऊन पडतो. ]

**१ सरदार**–[शूरसेनास उद्देशून] आपण आमच्या बरोबर युद्धास येत नाहीं तर !

**वाचाल**–त्यांच्याकडे कांहीं बोल नाहीं, त्यांची वीरश्री–

**२ सरदार**–युद्धांत काय मजा आहे पण !

**वाचाल**–हो हो ! आहे तर ! यांत काय संशय ? मी पुष्कळ युद्धें पाहिलीं आहेत.

**शूरसेन**—मी काय करूं? मला येथेंच राहण्याची आज्ञा झाली आहे. "अजून लहान आहेस," "इतक्यांत

१ शत्रूला; २ विजयाची देवता; ३ सत्वर; ४ उतार; ५ सौंदर्याची; ६ प्रसिद्धि; ७ पलंगावर.

नाहीं", "पुढच्या वर्षीं" या व इतर अशाच शब्दांनीं माझे कान कोंदून[1] टाकले आहेत.

**वाचाल**—तुमच्या मनांत खरोखरच जायाचें असेल, तर येथून निसटो[2] कसे !

**शूरसेन**—एकूण दुसऱ्यांनीं संमरांत[3] पराक्रम गाजवावा[4] आणि कीर्ति मिळवावी, आणि मीं मात्र घरच्या घरीं बसून माशा मारीत बसावें! ठीक! छेः, हें कांहीं आपल्या हातून व्हायचें नाहीं. मी येथून कसेंही करून आपला पाय काढीनच!

१ **सरदार**–असा पाय काढण्यांत भूषणचें आहे.

**वाचाल**—तर मग तें भूषण मिळीवच शूरसेन!

२ **सरदार**–आपण आमचे मित्र, तेव्हां आपणाला सोडून जायाचें जिवावर येतें.

**शूरसेन**—तुमचा आमचा अंतरात्मा[6] एकच, देह मात्र भिन्न. तेव्हां ताडातोड[7] होतांना क्लेश[8] होतात यांत नवलै[9] तें काय?

१ **सरदार**–नमस्कार हो सेनापति!

२ **सरदार**–नमस्कार वाचालराव!

**वाचाल**—वीरहो! तुमचीं आमचीं खड्गें एकाच ठिकाणीं पॆरंजायाचीं[10]! अहो तेजस्वी[11] प्रतापवान्[12] शूरहो–तुमच्याशीं मला चार शब्द बोलायचे आहेत, तिकडे रणधीरहो[13] लक्ष द्या. तुह्मी पांडुरंगपुरास जात आहां, तेथील सैन्यांत "नसतेराव" नांवाचा एक सेनापति आहे, त्यास त्याच्या गालावरील घाया-

१ भरून; २ सुटका करून घ्या; ३ लढाईमध्यें; ४ दाखवावा; ५ अश्रू; ६ जीव; ७ तुटातूट; ८ दुःख; ९ आश्चर्य; १० धार लावणें; ११–१२ पराक्रमी; १३ लढाईमध्यें नेहमी पुढें.

वरून तुह्मी सहज ओळखाल. तो घाय कोणाच्या तरवारी-चा ह्मणून पुसाल तर या बहादराच्या आणि तें खड्गही हेंच. त्यास माझा निरोप कळवा कीं मी अजून जिवंत आहे, आणि मग तो त्यावर काय उत्तर देतो, तें मला कळवा.

२ सरदार–कळवूं अं सेनापतिराज!

वाचाल—विजयश्री[1] या तुमच्या नवयौवनास[2] भुलून[3] तुम्हावर फिदा[4] होवो! [ सरदार जातात.] मग तूं आतां काय करणार?

शूरसेन—राहणार, दुसरें काय? महाराजांची मर्जी—

वाचाल—पण सरदारांना निरोप देण्याचा हा तुमचा कोरडा प्रकार रे कोठला? पुरते चार शब्द सुद्धां बोलला नाहींस. हे सरदार मोठ्या प्रतिष्ठितांत मोडतात, यांची बोलण्याचालण्याची रीत अगदीं शिष्टजनाची! तेव्हां हे जसे वागतील तसें आपणांस वागलेंच पाहिजे. पुनः जा. उभ्या उभ्या असा निरोप देणें बरोबर नाहीं. अघळपघळ[5] प्रकार चांगला शोभतो समजलास?

शूरसेन—बरें तर मग. तसें कां होईना?

वाचाल—हे वीरांतले वीर; धनुर्धरांत[6] अग्रणी[7] होण्याचा यांचा सुमार दिसतो. [ शूरसेन आणि वाचाल जातात.]

[सुव्रत येतो.]

सुव्रत–[ राजाजवळ जाऊन ] महाराजांचा विजय असो. आपल्या चरणापाशीं या दासाची एक विनंति आहे.

राजा–ती कोणती?

सुव्रत–महाराजांची आज्ञा होईल तर सांगतों.

---

१ जयापासून होणारी कीर्ति; २ नवीन तारुण्यास; ३ लुब्ध होऊन; ४ खुष, राजी; ५ लांब लचक; ६ धनु धारण करणारे; ७ मुख्य.

**राजा**–सुव्रत! इतका उपचार तुह्माला करणें नको. सांगा काय सांगायाचें आहे तें.

**सुव्रत**–महाराज! रोग बरा व्हावा अशी महाराजांची इच्छा आहे काय?

**राजा**–नाहीं.

**सुव्रत**–असें कां बरें? द्राक्षें मिळण्यासारखीं नाहींत, असें आपणांस वाटतें काय? नाहीं महाराज! तीं द्राक्षें हस्तगत करून दिलीं तर मग खाल कीं नाहीं? हें पहा—

## श्लोक.

**असे पाहिली एक वल्ली[1] नृपाळें[2]।**
**मृतां[3] जीव दे जी करी दूर काळें[4]।**
**जरा[5] वारुनीयांहि[6] तारुण्य आणी**
**शिळा[7] ऊठवी साच[8] लावण्यखाणी[9] ॥ १ ॥**

**राजा**–ही लावण्यखाणी कोण?

**सुव्रत**–ती आपली वैद्यकन्या, महाराज! आपल्या दर्शनाकरितां आली आहे,–आपण दर्शन द्याल तर! महाराज! माझें भाषण आपणास कदाचित् थट्टेचें वाटेल. पण तसें नाहीं. खरेंच बोलतों. तिचें वय, तिचें ज्ञान, तिचा संकल्प, तिचें शहाणपण, तिची बुद्धि, हीं सर्व पाहून मी तर बोवा चकित झालों. आपण कदाचित् म्हणाल कीं याला वेड लागलें, पण मला तसें वाटत नाहीं. तिची येवढीच इच्छा आहे कीं आपलें दर्शन घ्यावें. तेवढी आपण पुरवाल काय? येथें येण्यांत तिचा काय उद्देश आहे हें मग आपणा-

१ वेल; २ राजा; ३ मेलेल्यास; ४ मृत्यु; ५ म्हातारपण; ६ दूर करून; ७ दगड; ८ खरोखरींच; ९ सौंदर्याची खाण.

स तिच्या मुखानेंच कळेल. तिची भेट झाल्यावर मग पाहिजे तर मला हसा.

**राजा**–तुमचा हट्ट पुरविलाच पाहिजे बोवा. आणा तर पाहूं या अघटित चमत्कार करणारणीला! मग दोघेही आपण तिला पाहून तोंडांत बोट घालूं, नाहीं तर तुमच्या माथ्यांत हें वेड कसें शिरलें याचें आश्चर्य करीत बसूं

**सुव्रत**–बरें तर. हा मी तिला घेऊन येतों पहा. फार वेळ नको कांहीं—[ जातो.]

**राजा**–पुष्कळदां सुव्रत असली लांब प्रस्तावना करितो आणि यांत कांहीं विशेष आहे. असें ह्मणून यःकश्चित् पदार्थ पुढें करितो! तसा तर प्रकार आतांही नसेल ना ?

[ **सुव्रत जानकीस** घेऊन येतो. ]

**सुव्रत**–जानकी अशी इकडून ये–अशी.

**राजा**–किती लवकर परत आला हा!

**सुव्रत**–अशी इकडून येहो–हे महाराज येथें बसले आहेत. तुला काय ह्मणायाचें आहे तें त्यांजवळ बोल. अशी घाबरूं नको. भिण्याचें कांहीं कारण नाहीं. सर्व तुझा उद्देश कळीव. पाहिजे असल्यास मी असा दूर उभा राहतों.

[ **सुव्रत** दूर उभा राहतो. ]

**राजा**–मुली! माझ्याशीं का तुझें काम आहे ?

**जानकी**–होय महाराज! माझ्या बापाचें नांव "पुंडरीक वावधनकर;" ते वैद्य असत आणि ह्मटल्याप्रमाणें गुण आणून देत.

**राजा**–त्याला मी ओळखतों.

**जानकी**–तर मग माझें अर्धें काम वांचलें. त्यांची[१] स्तुति

१ हेत.

मला आतां नको करायला. कारण त्यांची माहिती असली, ह्मणजे पुरे. मरतेवेळीं बाबांनीं मला पुष्कळ औषधांची याद देऊन त्यांची योजना कशी करावी हें सांगितलें. त्यांत एका औषधाविषयीं तर त्यांनीं मला असें सांगितलें कीं "मुली हें औषध मोठ्या खात्रीचें आहे. हें जपून ठेव हो. याचा गुण पुष्कळदां मीं घेतला आहे, तेव्हां हें तुझ्या कामास पडेल." त्यांच्या आज्ञेप्रमाणें तें औषध मीं जपून ठेविलें आहे. मला जेव्हां कळलें कीं ज्या रोगावर या औषधाचा गुण हटकून येतो असें बाबांनीं सांगितलें होतें, त्याच रोगानें आपण ग्रस्त[1] झालां आहां, तेव्हां मीं असा निश्चय केला कीं आपल्या चरणांचें दर्शन घेऊन हें औषध आपणास द्यावें. आतां महाराजांची आज्ञा मात्र झाली पाहिजे.

**राजा**—मुली! तुझा संकल्प[2] स्तुत्य आहे. पण जेथें मोठ्या वैद्यांनीं हात टेकले, तेथें आतां एखादें वहींत लिहून ठेविलेलें औषध लागू पडेल, असें मला वाटत नाहीं. सर्व वैद्यांना बोलावून आणून त्यांजकडून मी रोगाची परीक्षा करविली. सर्वांचेंही ह्मणणें एकच पडलें कीं हा रोग असाध्य[3] आहे, यावर कोणत्याही वैद्याची मात्रा चालणार नाहीं. तेव्हां असल्या दुर्धर[4] रोगावर येईल त्याच औषध घेऊन मी आमच्या शहाणपणास बट्टा[5] लावूं इच्छित नाहीं. कारण, ह्मटलें आहे कीं "शहाण्याच्या हातून मरावें, पण मूर्खाच्या हातून जगूं नये." ह्मणून पुनः एकदा सांगतों कीं जेथें खरोखर उपाय खुंटले[6] तेथें भलतेसलते उपाय करण्याला माझें मन घेत नाहीं.

**जानकी**—महाराजांच्या मर्जीपुढें माझें कांहीं ह्मणणें नाहीं.

---

१ पीडलेले; २ हेतु; ३ बरा न होणारा; ४ जबर; ५ कलंक; ६ संपला.

माझें औषध घ्याच असा माझा कांहीं आग्रह नाहीं. मी आलें तशी परत जाईन आपली. दुसरें काय? होतें माझ्या मनांतून आपणांस औषध देऊन बरें करावें ह्मणून. परंतु तें सर्व आतां जेथल्या तेथेंच असो!

**राजा**–तुझ्या मनांतून मला बरें करावें असें होतें, त्याबद्दल मी तुझा ऋणी आहें. पण हें ऋण कसें ह्मणून पुसशील तर ज्याचा प्राणोत्क्रमणाचा[1] काल सन्निध[2] येऊन ठेपला अशा वेळीं जवळच्यांनीं त्यास ह्मणावें "अरे बाबा! मरूं नको, कांहीं दिवस तरी आणखी वांचरे," व त्यांच्या त्या ह्मणण्याबद्दल त्यानें ऋणी व्हावें, तसें हें ऋण आहे.

**जानकी**–बरें, आपला रोग जर असाध्यच आहे, तर मग माझें औषध घेण्याला तरी प्रत्यवाय[3] कोणता? माझ्या हातून गुण येणार नाहीं, असें आपणांस वाटतें? पण ईश्वर मोठमोठ्या गोष्टी घडवून आणतो, त्या पुष्कळदां लहानसानांच्या हातून नाहीं का घडवून आणीत? पुष्कळदां आपल्या आढळांत[4] येतें कीं शहाण्यांची जेथें अक्कल गुंग[5] होते, तेथें अज्ञान बालाच्या तोंडचे शब्द खरे होतात. मोठ्या कार्यांना मोठींच कारणें लागतात असा नेम नाहीं. अंगुष्ठचा[6] स्पर्श होतांच यमुनेचें पाणी दुभंग[7] झालें. ज्या शिळा स्वतः बुडतात व दुसऱ्यांना बुडवितात त्या नाममहात्म्यें[8] समुद्रांत तरून कपिसेनांस[9] उतरून जाण्यास सेतुरूप[10] झाल्या. एक कीं दोन–पुराणांतून असले लाखों दाखले देतां येतील. याप्रमाणें आमचे तर्क वरचेवर फसतात, अमूक एक गोष्ट घ-

---

१ प्राण जाण्याचा; २ जवळ; ३ अडथळा; ४ पहाण्यांत; ५ गोंधळते; ६ आंगठ्याचा; ७ दोन ठिकाणीं; ८ नामाच्या महिम्यानें; ९ वानरांच्या सैन्यास; १० पुलादाखल.

डून येईल अशी जिच्याविषयीं खातरी असते, ती घडून येत नाहीं; जिच्या घडण्याचा मुळींच संभव नसतो, ती हटकून घडून येते, असें आह्मी वरचेवर डोळ्यांनीं पहात आहों. तरी आमचे सिद्धांत[१] अबाधित चालतीलच असें सम याला काय ह्मणावें ?

राजा–मुली ! अधिक बोलून काय फळ? तूं जा. मी तुझें औषध घेतनाहीं. तूं इतकेंच आपणाला समाधान मानून घे कीं मी राजांना बरें करूं पहात होतें; पण त्यांनीं औषधच घेतलें नाहीं.

जानकी–महाराज ! माझ्या बोलण्याचा राग येऊं देऊं नये. पण पुष्कळदां याप्रमाणेंच ईश्वरानें पाठविलेल्या उपायांचा आपण आव्हेर[३] करितों. बाह्य[४] स्वरूपावरून आपण अंतरंगांची[५] परीक्षा करितों, तशी ईश्वर करीत नाहीं. त्यास सर्व अंतरंग कळतें. आह्मी मूढ[६] जन स्वतःच्या ज्ञानाच्या घमंडींतच[७] ईश्वरप्रेरित[८] उपायांसही मानवी उपाय असें ह्मणतों. महाराज ! एकवार हें औषध घेऊन पहाच. मी कोण्या झाडाचा पाला ? हें औषध माझें आहे असें समजूं नका. ईश्वरानेंच आपणाला बरें करण्याकारितां मला पाठविलें आहे, असें समजा. या औषधानें हा रोग बरा होईल, ह्मणून माझी योग्यता मोठमोठ्या वैद्यांबरोबर आहे, असें मी मुळींच ह्मणत नाहीं. इतकें मात्र मी सांगतें–अशी तशी सांगत नाहीं–खातरीनें सांगतें, आपला रोग असाध्य नाहीं आणि हें औषध ही निष्फल[९] होणार नाहीं.

राजा–इतकी तुझी खातरी आहे काय ? तर सांग किती दिवसांत तूं मला बरें करशील ?

---

१ ठरीव गोष्टी; २ व्यत्यय न येतां; ३ अनादर; ४ बाहेरील; ५ आंतील अंगांची; ६ मूर्ख; ७ पोकळ गर्वांतच; ८ ईश्वरानें सुचविलेल्या; ९ व्यर्थ.

जानकी–ईश्वराच्या दयेनें—

श्लोक.

रवी[1] दोन फेरे[2] करी जों जगाला[3] ।
विधू[4] दोनदां नाशितो जों तमाला[5]
व्यथेचें[6] नुरे[7] नाम तें या शरीरीं
पुनः ती पहा शक्ति येईल सारी ॥

राजा–पण तुझ्या ह्मणण्याप्रमाणें गुण न आला तर काय करशील ?

जानकी–या औषधाचा गुण नच आला तर:—

श्लोक.

मला हासुनी लोक निंदोत सर्व—
"भलें मोडला हा इचा थोर गर्व ।
निघाली जिंतायास[11] वैद्यांस मढ !
कळे वैद्यकीचें[12] कसें ईस गूढ[13]" ॥

इतक्यावरही त्यांची तृप्ति न झाली तर:—

श्लोक.

ह्मणोत मज देखुनी[14] सकलें[15] "ही ग्वरी वेसवा[16] ।
न लाज इजला कशी ? गिळुनि टाकिली येथवां ॥
इनें फसविलें नृपा; ठक असे; इला द्या सुळीं "—
असेंहि घडलें जरी, मज सुखेंच द्यावें बळी ॥

राजा–काय चमत्कार असेल तो असो !

---

१ सूर्य. २ प्रदक्षिणा. ३ पृथ्वीला. ४ चंद्र. ५ काळोखाला. ६ पीडेचें. ७ न उरे. ८ गमावशील; ९ तुच्छ मानोत: १० चांगला; ११ जिंकण्यास; १२ वैद्याच्या धंद्याचें; १३ मर्म; १४पाहून; १५सर्व; १६ निर्लज्ज बायको.

श्लोक.

वच[1] तुझें हृदया बहु मोहवी[2]
गमतसे[3] मज तें मधु गोड वी[4]।
क्षण गमे तव दुर्घट[5] कार्य[6] तें
सुघट[7] सत्य फिरूनिहि भासतें[8] ॥

मला वाटतें तुझ्या हस्तें ईश्वरच मला औषध देत आहे. कारण जीव कोणाला प्रिय नाहीं असें नाहीं, आणि तो तूं मजकारणें देण्यास सिद्ध झाली आहेस! तेव्हां तुला ईश्वरानेंच पाठविलें हें सत्य!

श्लोक.

कन्ये! जीव तुला असो प्रिय न कां? लावण्य देवें दिलें
धीरा बुद्धि तुझी, किती विनय हा, तारुण्य अंगीं खुलें।
या संसारसुखा[9] तिलांजलि[10] जरी द्यायास तूं ठाकशी[11]
तूझें कौशलें[12] गे अपूर्व[13]! अथवा, झाली निराशा कशी?

याकरितां हे चतुरिके! तुझें मी औषध घेऊन पाहणार. पण गुण न आला तर लक्षांत ठेव! मी एकटाच मरणार नाहीं!

**जानकी**—महाराज! सांगितलेल्या मुदतींत ह्मटला तसा गुण आला नाहीं, तर खुशाल माझा जीव घ्या. मी या देहान्तशिक्षेला[14] कबूल होईन. पण समजा, गुण आला, तर मग मला काय द्याल?

**राजा**—जें मागशील तें.

---

१ भाषण; २ संशयांत घाली; ३ वाटे; ४ उत्पन्न करी; ५ कठिण; ६ काम; ७ सोपें; ८ शोभतें; ९ संसारापासून होणारें सुख; १० पाणी व तीळ यांनीं युक्त अशी हातांची ओंजळ; ११ तयार आहेस; १२ शहाणपण; १३ पूर्वी कधीं न झालेलें; १४ मरण.

**जानकी**—मी जो वर मागेन तो द्याल ?

**राजा**—जो मागशील तो देईन. हें माझें वचन मी कदापि खोटें करणार नाहीं. खोटें करीन तर माझा अधःपात[1] होवो.

**जानकी**—तर मग जो मी वर प्रार्थीन, तो महाराजांनीं मला दिलाच पाहिजे.

**राजा**—खऱ्यांचें भाषण एकच असतें. ह्मटल्याप्रमाणें तूं केलें कीं माझें वचन मीं खरें केलेंच असें समज. तुझें औषध घेणार. तूं इतके दिवस कोठें होतीस, कोणीं तुला वाढविलें, इत्यादि तुझें वृत्त[2] तुझ्या मुखांतून ऐकण्याची इच्छा आहे, ती दुसऱ्या वेळीं पूर्ण करून घेईन. पण तुझें औषध घेणार, यांत कांहीं संशय नाहीं. ईश्वर तुझ्या हाताला यश देवो ! अहो सुव्रत ! [**सुव्रत** जवळ येतो ] इच्या ह्मणण्याला मी राजी झालों. इच्या भाषणांत निःसंशय मोहिनी[3] आहे.

**सुव्रत**—एकूण मज एकट्याच्याच माथ्यांत हें वेड शिरलें नाहीं ! असो, इच्या ह्मणण्याप्रमाणें महाराजांस लवकर आराम पडो ह्मणजे झालें.

**राजा**—प्रभूची काय इच्छा असेल ती खरी. या कन्येनें आपलें वचन खरें केलें कीं मी आपलेंही खरें करीनच. चला, कोण आहेरे तिकडे. मला हात द्या.

( भालदार ललकारतात. सर्व निघून जातात. )

---

१ नरक वास. २ हकीगत; ३ वश करणारा मंत्र.

## प्रवेश २.

### स्थळ–वेणुग्राम. जहागिरदाराच्या वाड्यांतील दिवाणखाना.

[ विनता आणि वेड्या येतात. ]

**विनता**–अरे वेड्या, तुला एक काम सांगतें, पाहीन कसें करतोस तें. मोठ्याच्या पदरीं असलें ह्मणजे अंगीं शहाणपण येतें ह्मणतात, तसें तुला कांहीं आलें आहे काय ?

**वेड्या**–ह्ये काय पुसणें बाईसाब ? ल्हानाचा मोटा हिथ झालोन् शहाना न्हाई कसा व्होनार ! दरबारच्या मानसाकड पाठवनार यवडंचना ?

**विनता**–येवढेंचना ह्मणजे? हें लहानसान काम समजलास वाटतें ? असल्या कामाला येवढेंचना ह्मणतोस, तेव्हां मोठें काम तरी तूं कोणच्याला ह्मणणार ? हं ! येवढेंचना ?

**वेड्या**–बाईसाब, खरंच पुसाल तर दरबारांत फारसं शहानपन न्हाइ लागत बघा लवून मुजरा करतां येत नसल, अन् शहानपनाचा आव घालतां येत नसल, त्यानं बघा कंधी जाऊंच न्हाइ. पन् मला योकच उत्तर ह्माइत हाय, त्ये समद्या परश्नाला लागू पडतया.

**विनता**–हें मोठें गमतीचेंच उत्तर असलें पाहिजे कीं पाहिजे त्या प्रश्नाला लागू पडतें.

**वेड्या**–अवो त्ये काय पुसता ? ही माझी घोंगडी जशी समद्या कामाला येतीया–निजायला बी येती, बसन्याला बी हयेच, बीतशीच वाऱ्या पावसांत लपेटून बी घ्यायला ब्येस. तसच त्ये माझं उत्तर.

**विनता**–आणि तें सर्व प्रश्नांला लागू पडतें काय ?

**वेड्या**–ह्ये काय पुसनं ? बामनाच्या हाताला जशी द-किशना, साडीला जशी चोळी, अन् बोटाला जशी आंगठी, गनपतीला जसा मोदक, अन् बायकोला जसा नवरा–फार कशाला–पुरन् पोळीला जस तूप, तसं माझं उत्तर अवघ्या परश्नांला.

**विनता**–काय गुलाम चावट आहे ! सर्व प्रश्नांस रे कसें लागू पडेल ?

**वेड्या**–यें तुह्मी इचारूंच नका बघा. कोनीका असना–राजा असो, परधान असो का–तुमच देव भल करो–कारकून असो, संमद्यांना येकुच उत्तर.

**विनता**–सर्वांच्या प्रश्नांला लागू पडणारें तेव्हां तें लांबच लांब असलें पाहिजे.

**वेड्या**–असं नव्हं–खरंच पुसाल तर इवलसं हाय. मला इचारा कीं दरबारचा तूं मानुस हयेस का ह्मनून. इचारा तर खरं, भलतं सलतं न्हाइ उत्तर देनार.

**विनता**-मेला चावट आहे ! पण पाहतें काय उत्तर देतो तें. मज ह्मातारीला असा वेळ घालवितां नये. पण असो. तूं दरबारांतला का आहेस ?

**वेड्या**–[ हात जोडून ] जी !

**विनता**–माझें कांहीं काम करशील का ?

**वेड्या**–जी !–हूं ! आनखी कांहीं परश्न इचारा.

**विनता**–तुझं दराबारांत कांहीं वजन नाहीं वाटतं ?

**वेड्या**–जी !

**विनता**–तुला जेरबंदानें मारलें नव्हे ?

**वेड्या**–जी !

**विनता**–सगळ्या प्रश्नांला गुलामाचा "जी" च. मी

वेडी नाहीं का अशी बोलत बसली आहे ती. पुरे रे ही चा-वटागिरी.

**वेड्या**—जी !— पाहिलंना कस ह्ये खासं उत्तर हाय तें.

**विनता**—पुरे रे. हें पत्र घेऊन विजयानगरास जा आणि जानकीबाईस नेऊन दे; आणि तिला सांग कीं याचा जबाब लागलाच मागितला आहे ह्मणून. माझ्या भाऊबंदांस मीं फार फार पुसलें आहे ह्मणून सांग. माझ्या मुलासही भेटून ये, आणि त्यालाही पुसलें आहे ह्मणून सांग. हें काहीं फार नाहीं.

**वेड्या**—बाईसाब ! आतांच ह्मंगाला ना फार फार पुसल हाय म्हून सांग अन् आतां किहो ह्मंगतां फार न्हाइ म्हून. काय समजावं तरी काय ?

**विनता**—हा वेड्या !—हें काम फार नाहीं ह्मणून मीं ह्मटलें. समजलास का ?

**वेड्या**—हं ! आतां शिरलं डोक्शांत. अन् ह्यो बघा चा-ललुंया.

**विनता**—आणि लवकर परत ये अं. फार दिवस लावूं नकोस.

[ दोघे जातात. ]

---

## प्रवेश ३.

### स्थळ—विजयानगर, राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

[ शूरसेन, सुव्रत आणि वाचाल येतात. ]

**सुव्रत**—ह्मणतात साक्षात्कार राहिले नाहींत ह्मणून—पण, कलियुगांत लोक पापी झाले, भाव राहिला नाहीं, ह्मणून साक्षात्कार दिसत नाहीं.

**वाचाल**—खरेंच, या काळांत साक्षात्कार ऐकला पाहिला तो हाच.

**शूरसेन**—साक्षात्कार खराच.

**सुव्रत**—वैद्यांनीं हात टेकावे—

**वाचाल**—गदाधरशार्ङ्गधरासारख्या—

**सुव्रत**—लहानसहान नव्हत—सर्व ग्रंथ पढलेले, आणि अनुभविक—

**वाचाल**—मी तरी तेंच ह्मणणार होतों.

**सुव्रत**—त्यांनीं ह्मणावें हा रोग असाध्य[1]—

**वाचाल**—वाः कसें गोड बोलला!

**सुव्रत**—यावर कोणाची मात्रा चालायाची नाहींच—

**वाचाल**—हो; असेंच;—आणि खातरीनें कोणाचें ही—तुमचें देव भलें करो—

**सुव्रत**—फारा दिसांचा भरंवसा नाहीं; आज नाहीं उद्यां अंत व्हावयाचाच—

**वाचाल**—वाः माझें वाक्य तुह्मीं पुरें केलें—मी असेंच ह्मणणार होतों.

**सुव्रत**—आणि कन्येच्या औषधानें तीन दिवसांत खाडदिशीं उठून बसावें, हा दैविक[2] चमत्कारच—

**वाचाल**—होय, दैविक चमत्कार खास! आणि—

**सुव्रत**—नव्हे, साक्षात्कारच!

**वाचाल**—तुमची समयस्फूर्ति[3] कांहीं विलक्षण बोवा!—आमच्या मनांतल्या मनांत शब्द घुटमळतो पण तोंडाबाहेर येत नाहीं.

**सुव्रत**—किती हुशारी! निःसंशय—

---

१. बरा न होणारा. २. देवानें केलेला. ३. समयसूचकता.

**वाचाल**—चमत्कार तर खराच—केवढा पण चमत्कार! आणि आपणाला तर नाहीं वाटत ब्रह्मदेवानें असा पुतळा निर्मिला असेल कीं त्याला हा चमत्कार—काय ह्मणणार होतों पहा! विसरलों!—

**सुव्रत**—हा ईश्वरी प्रसादच होय.

**वाचाल**—होय प्रसादच.

**सुव्रत**—असल्या अबलेच्या—

**वाचाल**—अंगीं आणि येवढी शक्ति, येवढा प्रभाव! महाराजांना गुण आला, तसा इतरांनाही येईल तेव्हां आपण असें समजूं कीं ही कन्या नव्हे ही देवानें—

**सुव्रत**—हातून गुण यावा!

[ **राजा, जानकी** आणि परिजन येतात. ]

**वाचाल**—मी तरी हेंच ह्मणणार होतों. तुमच्या जिभेवर सरस्वती नाचते यांत कांहीं संशय नाहीं. हे पहा महाराज आले.

**सुव्रत**—पहा आतां महाराजांच्या अंगावर कसें तेज दिसतें तें. कन्येचा आणि हा प्रभाव! यावज्जीवें[1] कन्यकाजन मजला प्रिय राहील. फार काय, आतां महाराजांस कोणीं ह्मटलें कीं **पुष्पकरंडका**पर्यंत जाऊन या, तर येतील, इतका त्यांच्या अंगीं तकवा दिसतो!

**वाचाल**—ओ हो! हीच नव्हे का ती जानकी?

**सुव्रत**—होय, तीच ही.

**राजा**—जारे ग्यान्या, आणि सर्व सरदारमानकरी रंगमहालांत येऊन बसले आहेत कीं नाहींत, ते पाहून ये.

[ एक सेवक जातो. ]

---

१. जन्मभर.

[ जानकीस उत्तर. ]

**श्लोक.**

**गे जीवनौषधि[1] ! वसें मम पार्श्वभागीं[2]**
**जेणें दिलें वचन सत्यच तूजलागीं ।**
**तो व्याधिमुक्त[3] जन तें पुरवीच वेगें**
**शंकूं नको वर अभीष्ट[4] मुखें वदे गे ॥**

तुझा वर सर्वांसमक्ष देऊन मी तुझा उतराई होतों.

[ सेवक येतो. ]

**सेवक**–जी सरकार, समदे मानकरी रंगमहालांत बसले हायती.

**राजा**–कन्यके ! चल मजबरोबर. [ सर्व रंगमहालांत जातात. ] बाले ! या सर्वांसमक्ष वर माग.

**जानकी**–यांच्यापैकींच मी एक वर[5] मागतें.

**राजा**–(आश्चर्यानें) एकूण हा का वर ! एकूणं ही एका राजाला वरणार, असो शहाणी खरी ! बाले !—

**श्लोक.**

**पाहे हें नृपचक्र[6], यौवन खुले यांच्या शरीरीं कसें**
**हे सामंत[7] पहा मदीय वचना नोलंघिती[8] पुत्रसे ।**
**यांमाजी नृप आवडे तव मना तो दाविजे निश्चितीं[9]**
**यत्कंठीं सुमहार[10] घालशि, झणीं देतों तुला तो पती ॥**

**जानकी**–महाराजांची आज्ञा मला प्रमाण आहे. एका-

---

१. माझे प्राण वाचविणारे मुली. २. माझ्या बाजूला. ३. ज्याचा रोग बरा झाला आहे असा. ४. तुला आवडतो तो. ५. हा शब्द द्व्यर्थी आहे; १. (राजानें योजिलेला) इच्छित वस्तु; २. (जानकीनें योजिलेला) पति होण्यास पसंत केलेला. ६. राजांचें मंडळ. ७. मांडलिक राजे. ८. मोडीत नाहींत. ९. निश्चयानें. १०. फुलांची माळ.

वांचून इतर सर्व सामंत नृपांस यथाकाळीं मदनराज सुंदर व गुणमंडित अशा वल्लभा देवो !

**सुव्रत**—आज कोणा सभाग्याच्या गळ्यांत ही माळ घालील कोण जाणें !

**राजा**—अगोदर सर्व पाहून घे, आणि मग कोणास वरायाचें तें वर. या सर्वांचें कुलशील चांगलें आहे.

**जानकी**—महाराज ! त्या जगदीशाच्या कृपेनें आपल्या प्रकृतीस आराम[२] पडला. मज कन्येची कसली शक्ति ! पण प्रभूंनीं मजला वर मागायास सांगितला तेव्हां मी मागतें. महाराज ! आपण मला कन्या म्हटलें, तेव्हां कन्येची वरकामना[३] पुरवावी. मी अजाण आहें; मला कांहीं माहीत नाहीं. शीलें हेंच काय तें माझें धन. अशा प्रसंगीं काय करावें, कसें वागावें, हें मला समजत नाहीं. माझ्या मनांत अशी आतां शंका उत्पन्न झाली कीं मी ज्यास वरीन त्यानें जर माझा धिक्कार केला, तर मी पुढें काय करूं ?

**राजा**—हा वेडे ! असल्या रत्नाचा का कोणी अव्हेर करील ? पण तुझ्या मनांत कांहीं शंका येऊं देऊं नको. जो तुझ्या प्रेमाचा अव्हेर करील तो माझ्या प्रेमाला आंचवला असें समज.

**जानकी**—[ मनांत ] हे मदनराज ! माझी इच्छा तूं परिपूर्ण कर.

[ हातांत माळ घेऊन चालूं लागते. ]

**१ सरदार**—[ मनांत ] काय मी वेडा ! मला वाटलें होतें ही मला वरील ह्मणून !

---

१. स्त्रिया. २. बरें वाटणें. ३ पति मिळण्याविषयींची इच्छा. ४. स्वभाव.

२ सरदार–[ मनांत ] असलें रत्न कोठून आमच्या हातीं लागणार !

३ सरदार–[ मनांत ] मजला कां नाहीं ही वरीत ? इचा मी दास होऊन राहीन.

सुव्रत–[ मनांत ]

### श्लोक.

लज्जेनें खालिं पाहे, चकित गति दिसे,
स्वेदं[1] रोमांच अंगीं
नेत्रीं भालीं[2] विशालीं प्रणयें[3] झळकतो
भाविला अंतरंगीं[4] ।
निर्व्याजानंदें[5] गालीं हसितें[6] हि अधरीं[7]
शोभवी दंतराजी[8]
ऐशी हे सुंदरी ज्या वरिल नरवरा
होय तो का न राजा ॥

पण पहा काय चमत्कार तो ! ही सर्व नृपांस टाकीत चालली आहे. आतां काय तो एकच उरला आहे. तो आपला शूरसेन, त्याला वरणार वाटतें ही ! पण ही तिची निवड मोठी चांगलीशी दिसत नाहीं. त्याला मी चांगलें ओळखतो, त्याला या रत्नाची कोठून पारख होणार !

जानकी–[ शूरसेनाच्या गळ्यांत माळ घालून ] ही आपल्या चरणांची दासी आहे. इचें पाहिजे तें आपण करावें.

राजा–शूरसेना ! तिचा अंगीकार कर बरें. ती तुझी धर्मपत्नी झाली.

---

१. घाम. २. कपाळावर; ३. प्रीति. ४.जी मनामध्यें धरिली आहे. ५. खरा आनंद. ६. हसणें. ७. ओठांमधून. ८. दांतांची ओळ.

**शूरसेन**–प्रभो ! माझी धर्मपत्नी ? माझें मला कांहीं नको का पहायाला ?

**राजा**–शूरसेना ! मजवर तिचा केवढा उपकार आहे, हें तुझ्या लक्षांत आहेना ?

**शूरसेन**–आहे, पण तेवढ्यानें मीं तिजशीं लग्न लावावें, असें होत नाहीं.

**राजा**–पण या दुखण्यांतून तिनें मला उठविलें, हें तर माहीत आहेना तुला ?

**शूरसेन**–आहे, पण यांत माझा आणि तिचा काय संबंध! ती कोण आहे हें महाराजांस ठाऊक आहे. आमच्या पदरीं एक गरीब वैद्य होता, त्याची ही मुलगी. तिच्याशीं आणि मीं लग्न लावावें ! महाराजांनीं क्षमा करावी आणि असल्या भरीं पडूं नये.

**राजा**–ती वैद्याची मुलगी, जहागीरदाराची नाहीं येवढें-चना ? अरे ती माझीच कन्या आहे, असें समज. मग तर कांहीं हरकत नाहीं ? तिचें उणें मी कांहीं पडूं देणार नाहीं. काय पहा आमचा वेडेपणा !

### श्लोक

**नृपाचें जैसें कीं रुधिर असतें रक्त गुरु वा,**
**तसें रंकाचेंही; नच लघु, न तद्वर्ण हिरवा।**
**परी वेडे आम्ही उगिच करितों भेद नसता–**
**जरेला मृत्यूला वश[1] उभय ही, हीच समता[2] ! ॥**

बाळा शूरसेना ! तूं अजून लहान आहेस, म्हणून तुला इची योग्यता कळून येत नाहीं. ती गरिबाची म्हणून का तिचा अव्हेर करितोस ? अरे बाबा ! धन मिळेल, पण

१. दोघांनाही जरामृत्यु हीं येतातच. २. हाच दोघांचा सारखेपणा.

असलें रत्न मिळणार नाहीं. ही मूर्तिमंत सत्क्रिया होय, इचा धिक्कार तूं करूं नकोस. अरे भलत्या ठिकाणीं जरी रत्न पडलें असलें, तरी तें उचलूनच घ्यावें. वस्तुलाभ पं- हावा, स्थानमाहात्म्य नसलें तरी चालेल. पहा !

श्लोक

**नोहे या जगतीतलावरि दुजें शीलापरी भूषण,**
**नोहे शील जरी महत्कुलहि तें वाटे जगीं दूषण।**
**आहे शील जरी कशास कुल तें? तें एकटें वंद्य हो!**
**शीलें हीनें[2] कुलीनही जन पहा लोकीं सदा निंद्य हो॥**

अरे बाळा! ही युवती सुंदर आहे, शहाणी आहे, सुशी- ल आहे, आणखी ते काय पाहिजे? शीलाला मान आहे, मोठ्या कुळाला नाहीं. मोठ्या कुळांत जन्मला, आणि शील नाहीं, तर उलटा उपहास मात्र होतो. मूर्खलोक आपल्या पूर्वजांच्या नांवावर विकतात; पण शहाणे आहेत ते सत्कर्म करून मान पावतात. अधिक काय सांगू? इला जर तूं आपली धर्मपत्नी करिशील, तर इचें उणें मी कांहीं पडूं देणार नाहीं. शील आणि सौंदर्य हीं तिच्याठायीं मूळचींच आहेत. वित्त मी देईन, मग तर झालेंना?

**शूरसेन**–प्रभो! आपण ह्मणतां तें सर्व खरें. पण येथें माझें मन घेतच नाहीं; आणि बळेंच प्रीति कर ह्मणून चालत नाहीं.

**राजा**–अरे! कामधेनु घरांत चालून येत आहे, तिला आडवा हात देऊं नको.

**जानकी**–महाराज! आपण दुखण्यांतून उठलां यांतच मला संतोष आहे. बाकीचें राहूं द्यावें.

---

१. शुद्ध आचरण. २. वाईट स्वभावाचा.

**राजा**—नाहीं, असें कसें होईल? माझें वचन मी खोटें कधीं होऊं देणार नाहीं. काय समजला आहेस तूं? ही घाल तिच्या गळ्यांत माळ. अरे उद्धता पोरा! माझी मर्जी मोडून या रतीचा धिक्कार करितोस, अशा तुला हें सद्रत्न योग्यच नव्हे. तुला ठाऊक नाहीं काय कीं ही आतां माझी कन्या झाली? तेव्हां इची आणि तुझी योग्यता सारखी होईल काय? धन धन तें काय? त्याची प्रतिष्ठा ती किती? तुला आणखी हें ठाऊक नाहीं काय कीं तुझा मान, तुझी संपत्ति सर्व कांहीं माझ्या स्वाधीन आहे ह्मणून? एक्या क्षणांत रावाचा रंक आणि रंकाचा राव करण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहे, हें तूं विसरलास वाटतें. तेव्हां बऱ्या बोलानें लवकर उमज; आणि माझें ऐक. मी तुझ्या बऱ्याचीच गोष्ट सांगत आहें. आमचा अधिकार आणि आपला धर्म स्मर. असा चालूं नकोस. माझें न ऐकशील तर मी फिरून तुझें नांव घेणार नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेव. मग तुझें कांहीं का होईना. यौवनमदांत दुर्जनांच्या संगतीस लागून बिघडलास तरी पण तिकडे ढुंकून पाहणार नाहीं. माझ्या प्रचंड कोपाचें जाळणारें तेज कसें आहे हें लक्षांत आणून काय करायाचें असेल तें कर.

**शूरसेन**—महाराज या अपराधाची क्षमा असावी. आपणाला जी वस्तु प्रियदर्शन ती मलाही प्रियदर्शनच होय. महाराज! आपलें सामर्थ्य केवढें! प्रभूत वित्त, संमान, कुलीनता या सर्वांचा प्रभव आपणांपासून, तेव्हां जिला मी नीचकुलोत्पन्न ह्मणून त्याज्य समजत होतों, तीच आपल्या प्रसादलवें[1]करून कुलीनांत गणिली जाईल.

---

1. थोड्याशा मेहेरबानगीनें.

**राजा**—तर मग धर तिचा कर आणि ह्मण माझी धर्मपत्नी आहे. वित्त आणि संमान यांजबद्दल तूं कांहीं काळजी वाहूं नकोस. तुझ्या घरीं नाहीं इतकी संपत्ति तिजमुळें तुला मिळेल.

**शूरसेन**—हा पहा तिचा मी कर धरिला.

**राजा**—ईश्वराच्या कृपेनें तुह्मा दोघांचें कल्याण होवो. हें कार्य आजच्या सुमुहूर्तावर आह्मी उरकून घेणार. बाकीचे सोहाळे आप्तसोयरे, इष्टमित्र, आल्यावर होतील. तिजवर तुझें प्रेम असलें ह्मणजे मत्सेवाधर्म तुझ्या हातून बरोबर घडला असें समजेन, आणि तिकडे प्रेम कमी केलें तर इकडे अंतरलास असें समज.

(**राजा, शूरसेन, जानकी, सरदार** आणि परिजन जातात.)

**सुव्रत**—तुमच्याशीं चार शब्द बोलायाचे आहेत, इकडे या पाहूं.

**वाचाल**—काय आपली मर्जी आहे ?

**सुव्रत**—तुमच्या धनीसाहेबांनीं मन फिरविलें, हें बरें केलें.

**वाचाल**—मन फिरविलें ? माझ्या धनीसाहेबांनीं ?

**सुव्रत**—होय. मी बोलतों आहें ही भाषा नव्हे का ?

**वाचाल**—भाषा खरी, पण किती उद्धट ! अशी भाषा बोलली ह्मणजे हातघाईवर प्रसंग यावयाचा. माझे धनीसाहेब ह्मणजे ?

**सुव्रत**—शूरसेन तुमचे धनीसाहेब नव्हत तर कोण ? तुमचे स्नेही ?

**वाचाल**—यांत काय संशय ? ते आमचे स्नेही, आह्मी त्यांचे स्नेही !

सुव्रत–स्नेही खरेच ! "जीवश्च कंठश्च" स्नेही ! एकमेकांच्या गळ्यांत हात घालून दोघेही बुडायाचे !

वाचाल–जा! जा! तुह्माला आतां साठी आली आहे, जा ! जा !

सुव्रत–अरे गृहस्था ! साठी येवो कीं कांहीं येवो. मला "नर" हें उपपद लागतें, तें तुला लागत नाहीं. पण तुझें उपपद माझ्या उपपदापेक्षां दुप्पट आहे. तूं नरपशु.

वाचाल–काय करूं हो ! अशी दाखवीन कीं कधीं पाहिली होती कीं नव्हती ! पण तुमचें वय पाहून मागें घ्यावें लागतें !

सुव्रत–अरे बाबा ! या वाता मजशीं कशाला पाहिजेत ? प्रथमत: जेव्हां तुझी गांठ पडली तेव्हां वाटलें होतें कीं चारचौघांप्रमाणें तूंही आहेस; आणि कांहीं जगही पाहिलें असशील. तरी त्यावेळींही हा अस्तन्या सारलेला अंगरखा, हें कंगणीदार पागोटें, हा तंग मांडचोळणा, आणि हा जरतारी शेला येवढ्यावरून संशय उत्पन्न झालाच होता कीं ही मूर्ति बघूनच घ्यावी, हींत कांहीं हंशील नाहीं. आणि तें आज प्रत्ययास आलें. आतां पुन: तुझी गांठ पडावी, अशी कांहीं इच्छा नाहीं. एकदा तुला ओळखून सोडिलें !

वाचाल–वृद्धांना हवें तसें तोंड सोडण्याची मुभा असते, नाहीं तर—

सुव्रत–अहो ! जरा शांत व्हा पण, नाहींतर भलत्या थरावर गोष्ट जाईल ! नाहींतर मग आज शेंदाड शिपायाचीं पुरीं भरलींच समजा. अहो ! अक्कडबाज ! राम ! राम ! आह्मी येतों. तुमच्यासारख्यांना राग नाहीं हो कामाचा !

**वाचाल**—असें तुह्मांला शोभतें का ? माझा तुह्मीं फार अपमान केला.

**सुव्रत**—हो केला, मग ? आणखी सुद्धां करीन. कारण तुला तसेंच पाहिजे.

**वाचाल**—नाहीं हो, मी कांहीं तसा नाहीं.

**सुव्रत**—नाहीं कसा ? मी जितकें बोलेन तितकें थोडेंच आहे.

**वाचाल**—मी शहाणा होईन.

**सुव्रत**—हो, आतां झालास शहाणा ? उगीच फार बोलण्यांत हंशील नाहीं. राम ! राम ! जातों.

**वाचाल**—गुलाम थेरडा ! कशी लवलव चालली होती जीभ ! बरें आहे. पाहून घेईन. वेळ आली ह्मणजे होती कीं नव्हती करून टाकीन. मग वयाकडे बियाकडे नाहीं हे राजश्री बघायचे ! एकदा गांठ तर पडूंदे, ह्मणजे चांगलीच खोड मोडतों या थेरड्यांची

[ **सुव्रत** परत येतो. ]

**सुव्रत**—अहो वाचालबोवा ! तुमच्या धनीसाहेबाचें लग्न लागलें, आणि तुह्मांला आतां एक बाईसाहेब झाल्या !

**वाचाल**—महाराज ! कृपा करा, परंतु असें बोलत जाऊं नका. मी मघाशींच तुह्माला सांगितलेंना मला असें टाकून बोलूं नका ह्मणून. धनीसाहेब ? बाईसाहेब ? ह्मणजे ?

**सुव्रत**—हे तुझे धनी नव्हत, तर तुझे धनी तरी कोण ?

**वाचाल**—माझे धनी कोणी नाहीं, आणि मी कोणाचा सेवक नाहीं.

**सुव्रत**—अरे अशीं नाकानें वांगीं सोलूं नकोस. जो तो

तुझ्या तोंडावर थुंकतो हें कसें तुझ्या लक्षांत येत नाहीं! अगदीं मट्ठ आहेस.

**वाचाल**–हें अति झालें बरें. आतां कांहीं खपायाचें नाहीं.

**सुव्रत**–हं! खपायाचें नाहीं? सर्व खपतें. अरे! तुझीं सर्व कृत्यें मला कळलीं आहेत. चंद्रभागेच्या कांठीं वाळत घातलेलें धोतर घेऊन चाललास, ह्मणून पांडुरंगपूरच्या बडव्यांनीं तुलाचना बडविलें? तेथील एका भटाच्या कन्येवर डोळा ठेवलास, ह्मणून जोड्यांचा मार तूंच ना खालास मोठ्या दिमाखाच्या गोष्टी सांगतोस? पण गुलामा! खरें केव्हांना केव्हां तरी बाहेर पडायाचेंच. मोठ्यांच्या अंगाशीं खेटून बसतोस, सलगीचीं त्यांच्याशीं भाषणें करितोस, ही तुझी योग्यता काय रे! चल मूर्खा! तुझ्याशीं बोलूं नये शहाण्यांनीं. लबाड कोठला! [ जातो. ]

[ शूरसेन येतो. ]

**वाचाल**--एकूण येथें कांहीं आमची डाळ शिजत नाहीं! सवड पाहून येथून पाय काढिला पाहिजे. तूर्त निमूटपणें सर्व सहन केलें पाहिजे.

**शूरसेन**–झाला! माझा घात झाला! ही ब्रिडी पायांत पडली, इच्यांतून कशी सुटका होणार?

**वाचाल**–कां गड्या! झालें तरी काय?

**शूरसेन**–देवद्विजांसमोर मीं जरी शपथ घेतली कीं इला अंतर देणार नाहीं, तरी तिचें मुखावलोकन सुद्धां करणार नाहीं.

**वाचाल**–काय? काय? गड्या?

**शूरसेन**–अरे! त्यांनीं माझें लग्न लावून दिलें.—आपण

येथून उत्तरेकडे जाणार, तिकडे लढाया चालल्या आहेत! तिला पत्नीप्रमाणें नाहींच वागवावयाचें.

**वाचाल**—किती नामी पण तोड काढिली! चल, आपण लढाया मारायाला जाऊं! येथें काय असे माशा मारीत बसण्यांत हंशील! हुं! चल आपण समर पाहूं या.

**शूरसेन**—आईचें पत्र आलें आहे, पण तें अझून वाचलें नाहीं.

**वाचाल**—अं:, वाचशील मग. आधीं समराला जाऊं गड्या! रतिसमरांत प्रियेचा कंठाश्लेष करण्यांत भुजबळ वेंचावें त्यापरीस समरांत शत्रूंचीं शिरकमलें कंठनालापासून उतरावीं, हें मला बरें दिसतें. हें काय कामाचें उंबरांतल्या किड्याप्रमाणें अक्षयी येथेंच राहणें? परदेश पाहून येऊं, लढाया मारूं, चल!

**शूरसेन**—तूं ह्मणतोस, तसेंच. तिची घरीं रवानगी करून देतों; आईला लिहितों कीं ती मला आवडत नाहीं, ह्मणून मीं घरदार सोडिलें. महाराजांना हा मजकूर समक्ष कळवितां येत नाहीं, तेव्हां पत्रानें कळवीन. त्यांनीं लग्नांत मला पुष्कळ दिलें आहे, तेव्हां आपणाला आतां पैशाची कांहीं कमती नाहीं, चला! वीर जेथें दोन देतात दोन घेतात तेथें जाऊं! पहा!

### श्लोक.

ज्या गृहीं पतिस नावडे प्रिया,
लाभतें सुख तिथें कसें तया?
मानसीं नर विषण्ण[1] जो सदा,
युद्धभूमि न तया न तोषदा[2] ॥

१ खिन्न. २ संतोष देणारी.

**वाचाल**—पण तुझी ही लहर शेवटपर्यंत राहील ना?

**शूरसेन**—चल माझ्या खोलींत. तेथें आपण सर्व योजना करूं. तिला घरीं लावून देणार, हें खास. उद्यां आम्ही समरभूमीकडे चालते होणार तरवार गाजवायाला, आणि ती घराकडे पतिविरह अनुभवायाला!

**वाचाल**—वाः! समरभूमींत काय मजा! बाणांचा तो वर्षाव! आणि श्रवणरंध्रें भरून टाकणारा तो महान् रव! छेः! छेः! नववधूसमागमसुख याहून का जास्त आहे? त्याला भुलून येथें नकोच राहूं. मन घट्ट कर काणि तिला घरीं पाठवून दे, आणि चल. महाराजांनीं आणि अशी तुजवर सक्ती करावी! पण हळू हो! भिंतीलासुद्धां कान आहेत.

[ जातात. ]

---

## प्रवेश ४.

### स्थळ—तेंच. राजवाड्यांतील दुसरी एक खोली.

[ जानकी आणि वेड्या येतात. ]

**जानकी**—बाईंनीं प्रेमाचें पत्र मला धाडिलें. त्या बऱ्या आहेतना?

**वेड्या**—अन् त्यांना वाईट कोणीं म्हटलं व्हत का? वाः, वाः हो जानकीबाई! तुम्ही तरी बऱ्याच दिसतया, आमच्या बाईसाहेबांसनी वाईट म्हणतां त्या!

**जानकी**—अरे, तसें नव्हे. अर्थाचा अनर्थ नको करूं. मीं पुसलें त्यांची प्रकृति बरी आहेना?

**वेड्या**—परकर्ती? म्हंजे—ह्ये न्हाइ बा आपणासनी ठावं. तुम्ही काय इचारता?

**जानकी**—गुलाम वळेंच वेड्याचें सोंग घेतो आहे. अरे मी पुसतें त्यांना बरें वाटतेंना ?

**वेड्या**—हं ! आतां कशा वाटेवर आला ! बरं वाटतया अन् न्हाइभी वाटत. काइ आजार बिजार न्हाइ म्हून बर वाटतया, अन् देव डोळे विगिनं झाकित न्हाइ म्हून बरं वाटत न्हाइ.

**जानकी**—मेल्याच्या जिभेला हाड आहे का ?

**वेड्या**—अन् माझ्या तर न्हाइ, खरं. पन तुमच्या तरी हये का ?

[ **वाचाल** येतो. ]

**वाचाल**—कसें काय आहे ? तुमचें नशीब आतां जोरावर आहे !

**जानकी**—त्यांत तुम्हाला संतोषच आहेना ?

**वाचाल**—हें काय पुसावें ? तेंच तर आम्ही अक्षयी देवाजवळ चिंतीत होतों; आणि असेंच पुढें राहो, ह्मणून पुनः चिंतूं ?—कां कसें काय वेड्याजी ? काकूबाईची प्रकृति कशी आहे ?

**वेड्या**—ये कशाला राव इक्त्यांत पुसतां ? डह्या हातीं लागायचं संधान न्हाइ काइ.

**वाचाल**—असें का मीं म्हटलें ?

**वेड्या**—झंगाला न्हाइ ह्यातच तुमचं शहानपन. असं पुस्कळ लोक असत्याती, त्यांचं ह्येच काम; काइ बोलू नये न् काइ करूं नये; कशाकरता म्हून इचाराल तर दुसऱ्यांनीं त्यांना शहान ह्मगावं म्हून. अन् येका एखादा शबुद मुखावाट काडतील, तर त्यांचं भांडवल फुटलयाच समजा. त्यांतलच राव ! तुमीबी येक !

वाचाल-जा गुलामा! ठक कोठला नाहीं तो!

वेड्या—मी न्हाइ ठक, तुमी ठक अन् मी महाठक! खरं बोलावं अक्शी मानसानं.

वाचाल—आहेस ठाऊक दुसऱ्याच्या बोलण्यावर कोटी करणारा तो! पुरे पुरे! जा मी तुळा चांगला ओळखतों!

वेड्या—ह्ये मात्र खर. आपल्यावरन जग वळखावं, असं ह्मंगत्यात, त्यापरमान तुमी मला वळखलं! आपन ठक त्यंव्हा दुसर न्हाइत झाल सार ठक! अन् मीबी तुमाला आपल्या वरनंच वळखतो. मी जसा येडानू अक्कलमंद, तस तुमी बी!

वाचाल—खाऊन माजला आहे गुलाम!—जानकीबाई! तुमचे पतिमहाराज कांहीं निकडीच्या कामाकरितां आज रात्रींच गांवाला जाणार आहेत. घरीं राहून तुमच्या सहवासाचें सुख घ्यावें, अशी त्यांची मोठी इच्छा, पण निरुपाय ह्मणून जावें लागतें. कारण पहा!

श्लोक.

किती नववधू[1] प्रिया! पतिस आवडे फार ती।
समागमसुखीं तिच्या धरितसे किती तो रती[2]॥
विदेशगमनीं[3] कशी मति करील तो मंदधी[4]।
वळेच पारि त्यास ने परसुखा न साहे विधी॥

तुमच्या पतीचा तुह्मांस असा निरोप आहे कीं—

श्लोक.

आजचें सुख दिनावधीवरी[5], टाकिलें द्विगुण[6] होय तें तरी
मानसीं धरुनि नित्य भाव हा, वल्लभे! विरहभार हा वहा॥

१ नवीन स्त्री; २ प्रीति; ३ दुसऱ्या देशास जाण्याची; ४ जडमतीचा; ५ दिवसगतावर; ६ दुप्पट.

**जानकी**—आणखी काय त्यांनीं सांगितलें आहे?

**वाचाल**—आणखी असें सांगितलें कीं मीं तुला सांगितलें आहे, असें कळूं न देतां कांहीं तरी निमित्त करून महाराजांचा या क्षणींच निरोप घे.

**जानकी**—आणखी काय त्यांची आज्ञा आहे?

**वाचाल**—आणि लगेच घरास चालती हो.

**जानकी**—सांगितलें तसें सर्व करितें ह्मणून सांगा.

**वाचाल**—बरें आहे, सांगतों.

**जानकी**—जातें तर मी. चल रे वेड्या!

[ जातात. ]

---

## प्रवेश ५.

### स्थळ—तेंच. राजवाड्यांतील दुसरी एक खोली.

[ **सुव्रत** आणि **शूरसेन** येतात. ]

**सुव्रत**—बरें, तें असो. तो शूर आहे, असें तरी निदान तुला वाटत नसेल.

**शूरसेन**—कां बरें? तो चांगला शूर आहे.

**सुव्रत**—असें त्यानें सांगितलें असेल.

**शूरसेन**—त्याच्या सांगण्यावरच मी जात नाहीं. चांगल्या लोकांनीं त्याबद्दल माझी खातरी केली आहे.

**सुव्रत**—तर मग येथें आमची अटकळ चुकली. एकूण मी पिंकाला[1] काक समजत होतों!

**शूरसेन**—आपणाला मी खातरीनें सांगतों, तो चांगला शहाणा आहे, आणि त्याच मानानें शूरही पण आहे.

**सुव्रत**—एकूण त्याच्या शहाणपणाला आणि शूरपणाला

---

१ कोकिलेला.

मीं उगींच फांटा मारिला. पण काय असेल तें असो बोवा ! अझूनही पण माझी खातरी होत नाहीं. हा आला पहा !

( वाचल येतो. )

**वाचाल**–[शूरसेनास उद्देशून] सांगितल्याप्रमाणें सर्व तयारी केलीच पहा.

**सुव्रत**–तुमचें पागोटें कोण बांधतो हो ?

**वाचाल**–पट्टयाजी !

**सुव्रत**–तर मग आह्माला तसें बांधण्याला शिकवाल का ? आपण होऊं या कामांत तुमचे शिष्ये !

**शूरसेन**–( एकीकडे **वाचालास** )–ती महाराजांचा निरोप घेण्याला गेली का ?

**वाचाल**–होय, गेली.

**शूरसेन**–ती आज रात्रीं निघणार ना ?

**वाचाल**–होय, तुझ्या इच्छेप्रमाणें निघणार.

**शूरसेन**–[ मनांत ] पत्रें लिहायाचीं तीं लिहिलीं, जवाहिराची पेटी भरली, आणि घोडे तयार ठेवण्याला सांगितले. आज रात्रीं नववधूकंठाश्लेष[१] करून विवाहविधि यथासांग पूर्ण करायाचा तो विदेशीं जाऊन निराळ्या रीतीनें पूर्ण करणार !

**सुव्रत**–जगांत जो पुष्कळ फिरला आहे, त्याच्या गोष्टी ऐकाव्याशा वाटतात. पण ज्याच्या बोलण्यांमध्यें शंभरांत एक खरें, त्याचें काय एकायाचें आहे ? हा लबाड एक गोष्ट खरी सांगून तिला जुळण्यासारख्या शंभर गोष्टी पदरच्या जोडतो, आणि दुसऱ्याला फसवितो. अशानें तोंड

---

१ नवीन स्त्रीच्या कंठाचें आलिंगन.

उघडलें ह्मणजे चार लगाविलेच पाहिजेत. तुमचें देव कल्याण करो, सेनापतिराज !

**शूरसेन**—काय ? तुझें यांचे वाकडें आहे काय ?

**वाचाल**—यांची मजवर अवकृपा व्हावयाला मीं काय यांचें घोडें मारिलें कोण जाणे ? हे जेथें तेथें मजवर तोंड टाकतात.

**सुव्रत**—घोडें मारिलें. नाहीं कसें ? याचें बोलणें, चालणें, हसणें, खेळणें, सर्व कांहीं मला तिटकारा आणण्यासारखें आहे.

**शूरसेन**—मला वाटतें आपला हा खोटा ग्रह आहे !

**सुव्रत**—खोटा नव्हे-हा खराखुरा ग्रह ! असा तसा नव्हे; राहुग्रह ! हा तुझ्या पाठीमागें लागला आहे, संभाळ हो ! एकच सांगून ठेवितों—ही मूर्ति बघूनच घ्यावी, हींत कांहीं सत्त्व नाहीं. याचें सर्व लक्ष आपल्या पोषाखाकडे ! वस्त्रप्रावरणें हीं याचीं दैवतें ! असे मीं पुष्कळ लोक पाहिले आहेत, त्यांतीलच हा एक आहे.—रामराम ! वाचालराज ! मीं कमी बोललों हें लक्षांत असूं द्या, पण वाइटाशीं वाईट होण्यांत साधुपणा नाहीं. [जातो.]

**वाचाल**—एककल्ली दिसतो हा ह्मातारा.

**शूरसेन**-असेल.

**वाचाल**—असेल ह्मणजे ? तूं याला चांगला ओळखीत नाहींस काय ?

**शूरसेन**—कां ! चांगला ओळखतों. हा थोर सज्जन आहे, अशी याची कीर्ति आहे. ही आमच्या पायांतली सन्मानाची बेडी आली पहा !

[**जानकी** येते.]

**जानकी**—आपल्या आज्ञेप्रमाणें मीं आजच निघण्याविषयीं

महाराजांचा निरोप घेतला. त्यांनीं एकांतीं गांठ घेण्यास मात्र आपणास सांगून पाठविलें आहे.

**शूरसेन**—घेईन त्यांची गांठ. प्रिये माझी ही लगबग पाहून तुला संशय येऊं देऊं नको. दिसण्यांत ही घाई, आणि अशा वेळीं, चमत्कारिक दिसेल! आणि माझ्यावांचूनच काय खोळंबलें होतें, असेंही कदाचित् तुला वाटेल. पण हें काम फार निकडीचें आहे, एकाएकीं उभें राहिलें, ह्मणून माझी अशी धांदल उडाली आहे. आतांच्या आतां तूं घरीं जायाला नीघ. तुझी सर्व तयारी करून ठेविली आहे. यावेळीं काय काम आहे हें विचारूं नको. फुरसतीअंतीं सर्व सांगेन तुला माहित नाहीं हें किती निकडीचें काम आहे तें. जा, आणि आईस हें पत्र दे. मी चार दिवसांनीं घरीं येईन तोंपर्यंत स्वस्थ ऐस.

**जानकी**—मी काय बोलूं?—आपल्या पायांची दासी आहें.

**शूरसेन**—तें राहूं दे ग.

**जानकी**—आणि आपल्यासारखा थोर पति माझ्या दैवानें मला दिला, पण त्याच्या योग्यतेनुरूप माझे अंगीं गुण दिले नाहींत, ते द्यावे ह्मणून मी मनोभावेंकरून जगदंबेची प्रार्थना करीत राहीन.

**शूरसेन**—तें राहूं दे ह्मटलेंना! माझी घाई मोठी आहे. मी येतों. तूं घरीं जा.

**जानकी**—आज्ञा होइल तर बोलतें.

**शूरसेन**—हुं, आटोप.

**जानकी**—माझी कशी गत झाली आहे ती पहा!—

**श्लोक.**

**नरमणि[१] वरिला जो, त्यास मी योग्य नोहें**

---

१. मनुष्यांमध्यें श्रेष्ठ.

"मम पति" वदनानें बोलवेना मला हें
सदय धनिक सांगे चोरलें घेइं वित्त
तरि धन करिं घेतां लाजतें चौरचित्त ॥

**शूरसेन**—आतां पुढें तुझें ह्मणणें काय!

**जानकी**—दुसरें कांहीं नाहीं! एवढेंच—पण नाहीं, कांहीं नाहीं—या वेळीं नाहीं कांहीं ह्मणायाचें—प्राणवल्लभा!—आपण जातां तर, बरें जा—जायाचें ना—असेंच—बरें—

**शूरसेन**—मीं ह्मटलें ना, अशी घुटमळत येथें राहूं नको ह्मणून. चल, घोडीं तयार आहेत.

**जानकी**—मी कांहीं आपल्या पायांच्या आज्ञेबाहेर नाहीं. सर्व माणसांना सांगितलें आहेना? बरें आहे, मी येतें. [जाते.]

**शूरसेन**—जा! एकट्याच चालल्या व्हा घराला! तरवार हातीं धरण्याचें सामर्थ्य आहे, तोंपर्यंत घराचें कोण तोंड पाहणार आहे? चल, येथून आतां पळ काढूं या.

**वाचाल**—शाबास! गाजी! [जातात.]

---

अंक २ रा समाप्त.

# अंक ३ रा.

—०:※:०—

## प्रवेश १.

### स्थळ—पांडुरंगपुर. प्रहारवर्म्याच्या राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

[प्रहारवर्मा सपरिवार, विजयानगरचे दोन सरदार, आणि इतर येतात.]

**प्रहारवर्मा**—या युद्धाचीं कारणें प्रथमपासून शेवटपर्यंत मीं तुह्माला सांगितलीं. यवनांच्या मनांतून हिंदूंचीं राज्यें ठेवायाचींच नाहींत, तेव्हां अशा प्रसंगीं निकरानें लढलेंच पाहिजे. आजपर्यंत या युद्धांत किती वीर ठार झाले, आणि अजून किती होतील, याचा नेम नाहीं. शेवटीं यश येईल किंवा नाहीं, संशयच!

**१ सरदार** यशाचा हवाला जगदीशावर टाकावा. आपण मात्र आपल्याकडून कांहीं कसूर होऊं देऊं नये या युद्धांत आपला पक्ष सत्याचा, न्यायाचा, आणि धर्माचा आहे. यवनांचा असत्याचा आणि अन्यायाचा आहे. ते धरून आह्माला बाटविणार, मूर्ति फोडून आमचीं देवळें जमीनदोस्त करणार, नाहीं तर त्यांच्याच मशीदी बनविणार! आपल्या जिवांत जीव आहे तों आह्मी निकरानें लढूं.

**प्रहारवर्मा**—असें असूनही महाराजांनीं लहानच सैन्य कसें पाठविलें, याचा मला चमत्कार वाटतो.

**२ सरदार**—सैन्य कांहीं लहानसहान नाहीं. शिवाय त्यावेळीं महाराजांची प्रकृति अस्वस्थ होती. आणि दुसरींही

कांहीं राजकारणें असतील, तीं आह्मांला ठाऊक नाहींत. असें पुष्कळदां झालें, आह्मीं पुष्कळदां कल्पना कराव्या, आणि त्या फसाव्या. तेव्हां या वेळीं तीं कारणें अमुकच असतील, असें ह्मणण्याचें आमच्यानें धाडस करवत नाहीं.

**प्रहारवर्मा**—त्यांची मर्जी झालें !

**२ सरदार**—नाहीं. असें मात्र आपणांला वाटूं नये कीं यवनांला हें राज्य महाराज स्वस्थपणें घेऊं देतील. आपल्या साहाय्याकारितां हें सैन्य पाठविलें आहेच, आणि पुष्कळ मांडलिक नृपांस त्यांनीं आज्ञापत्रें पाठविलीं आहेत कीं आपआपलीं सैन्यें घेऊन पांडुरंगपुरास जावें आणि आपणांस साहाय्य करावें. आजच एक जासूद विजयानगराहून आला, त्यानें असें सांगितलें कीं लवकरच आणखी कांहीं सरदार आपल्या मदतीला इकडे येतील.

**प्रहारवर्मा**—जेवढे येतील तेवढे पाहिजेतच ! माझ्या हातून आपणा सर्वांचा जितका मान ठेवितां येईल, तितका ठेवितच आहें. आपली मुख्य मुख्य स्थानीं योजना केलीच आहे. आमचे वीर पडत चालले, ह्मणजे आपण ते गेले असे आम्हांस वाटूं देणार नाहीं, हें आह्मीं समजतों. बरें आहे. उद्यां लढाई होईल असा रंग दिसतो, तेव्हां तयारीला लागलेंच पाहिजे.

[ ललकारा. जातात. ]

---

## प्रवेश २.

### स्थळ-वेणुग्राम, जहागीरदाराच्या वाड्यांतील खोली.

[विनता आणि वेडथा येतात.]

**विनता**—मला वाटलें होतें तसें सर्व घडून आलें. इतकेंच कीं माझा मुलगा मात्र तिच्या बरोबर आला नाहीं.

**वेड्या**—बाईसाब!—खरंच पुसाल तर आपले बाळासाब काइ बाईसच मला दिसल्यात, जनु त्यांचं मन ठिकानींच नव्हताया.

**विनता**—कशावरून रे तूं असें ह्मणतोस?

**वेड्या**—कशावरून ह्मंजे? एकीकडच बघत बसाव. मधेंच डोक्सच खाजवाव. पायच आपटाव. शीळच वाजवावी. अस कांहीं तऱ्हा तऱ्हा करीत व्हते.

**विनता**—त्याचें पत्र तरं वाचून पाहतें. बघतें केव्हां परत येईन ह्मणतो तें.

(पत्र फोडते.)

**वेड्या**—अन् दरबार पाहुनशानी आल्यापासून नर्मदीशीं लगन करन्याला आपल मन घेतच नाहीं बेटं. अन् काय राव तेथल्या बायका! कशा फाकड्या! एकेक जशी नागीन! आपल नशीबच फुटकं! मी बी एकांदा राजाबिजा झालो असतोया तर का न होत—का न होत पन—

**विनता**—काय लिहितो बरें हा?

**वेड्या**—अन् जे लिवलं हाये त्येच.

[ जातो. ]

**विनता**—[ पत्र वाचते.]

विनंतिविज्ञापना—आई! तुला मीं सून पाठवून दिली आहे. तिनें राजाला वरें केलें, आणि माझा घात केला. तिचें मी मुखावलोकन करणार नाहीं. नाहींच नाहीं, हा कृतसंकल्प. लोक सांगतील त्याच्या पूर्वींच तुला मी कळवितों कीं तुझा पुत्र पळून गेला. पुनः ह्मणून घरीं येणार नाहीं. कळावें लोभ असूं दे हे विज्ञापना.—

"अभागी शूरसेन."

अभागी खराच ! मुला ! काय तुझा हा उच्छृंखल स्व-भाव ! किती रे वेडा ! महाराजांची एवढी कृपादृष्टि, आणि तिचा असा अनादर करावा काय ? आणि कशाकरितां तर मोठमोठ्या राजांसही जी मिळाली असतां त्यांचा भाग्योदय झाला, असें समजावें, अशा साध्वीशीं त्यांनीं तुझें लग्न लावून दिलें ह्मणून ? तिचा तूं धिक्कार केलास तेव्हां महाराजांचा तुजवर कोप होणार नाहीं काय ?

[ वेड्या परत येतो. ]

**वेड्या**–बाईसाब—ब ! ब बाईसाब ! घात ! ब घात !

**विनता**–अरे काय झालें तरी काय ?

**वेड्या**–त्ये बघा दोन शिपायी आल्याती अन् जानकीबाईपाशीं काइबाइसच सांगत्याती ! बाळासाहेब गेले ह्मंगत्यात ! आतां ब कसं !

**विनता**–असा घाबरतो आहेस कां ? त्यानेंच मला पत्र लिहिलें आहे कीं मी गांवाला जातों ह्मणून–आणखी काय ?

**वेड्या**–मी त्यवडच ऐकलं, त्ये बघा ! त्येच इकड आले ती ! त्यानाच इचारा. [ जातो. ]

[ **जानकी** आणि दोन गृहस्थ येतात. ]

**१ गृहस्थ**–बाईसाहेब ! आह्मी शूरसेनमहाराजांकडून आलों !

**जानकी**–बाई ! ते घर सोडून गेले ! पुनः नाहीं परत यावयाचे !

**२ गृहस्थ**–भलतेंच ! असें अभद्र बोलूं नये.

**विनता**–थोडी शांत तर होशील !–बरें बाबांनो–काय झालें तें सांगा, खरें सांगा. या ह्मातारीनें सुखदुःख पुष्कळ पाहिलें आहे; आणि आतां तिला त्याचें फारसें वाटतही ना-

हीं. सुखवार्ता ऐकली ह्मणजे उड्या मारूं लागावें, आणि दुःखवार्ता ऐकली ह्मणजे कंबर मोडून खालीं बसावें अशी कांहीं आतां माझी स्थिति राहिली नाहीं. तेव्हां भिऊं नका. खरेंच सांगा, माझा मुलगा कोठें गेला ?

**२ गृहस्थ**—बाईसाहेब ! ते पांडुरंगपुरच्या राजाच्या साह्याला गेले आहेत. त्यांची आमची वाटेंत गांठ पडली. आमचें कांहीं काम दरबारांत आहे, तें आटोपून पुनः आह्मी तिकडेंच जाणार.

**जानकी**—बाई ! हें पत्र पहा, आणि मी ह्मणतें तें खरें कीं नाहीं तें बघा.

[ वाचते ]

" जी माझ्या बोटांत आंगठी आहे, व जी प्राण गेला तरी मी आपल्या हातांतून जाऊं द्यायाचा नाहीं, ती तूं मजपासून काढून घेशील, आणि मजपासुन तुझ्या पोटीं मूल होईल, तेव्हां मी तुझा पति आहें असें समज. अर्थात् ही गोष्ट कधींहि होणार नाहीं."

हा घात नव्हे काय ?

**विनता**—हें पत्र तुह्मींच आणिलें काय ?

**१ गृहस्थ**—होय, आणिलें खरें. असलें दुःखाचें पत्र आणून दिलें ह्मणून वाईट वाटतें.

**विनता**—हें काय बरें असें करावें जानकी ? कांहीं धीर तर धरिशील ? तुलाच का एकटीला दुःख झालें आहे ? माझा नाहींच का त्यांत अर्धा वांटा ? तो माझा मुलगा होता, तो गेला ! बरें जाऊं दे ! आतां तूंच माझा मुलगा मुलगी ! सारं तूंच ! पांडुरंगपुरास गेला ह्मटलें, नाहीं ?

**२ गृहस्थ**—होय, काकूबाई !

**विनता**–युद्धांत साहाय्य करण्याकरितां, नव्हे ?

**२ गृहस्थ**–होय, त्याकरितांच गेले. तेथील राजा यांचा चांगली मान ठेवील, त्याविषयीं कांहीं काळजी नको; आणि जशी संधी मिळेल, त्याप्रमाणें अग्रस्थानीं त्यांची योजना करील.

**विनता**–आपणाला तिकडे परत जायाचें आहे काय ?

**१ गृहस्थ**–जितकी जलदी करितां येईल तितकी केलीच पाहिजे.

**जानकी**–"माझी पत्नी जिवंत आहे, तोंपर्यंत घरीं माझें कांहीं नाहीं."—काय मीं असें पातक केलें ?

**विनता**—असें पत्रांत का लिहिलें आहे ?

**जानकी**—होय, बाई !

**१ गृहस्थ**—लिहितांना माणूस लिहून जातें, पण त्याप्रमाणें अक्षयी करितें का ?

**विनता**—"माझी पत्नी जिवंत आहे, तोंपर्यंत घरीं माझें कांहीं नाहीं"—शाबास मुला ! शाबास. जें कांहीं घरीं तुझें आहे, तें सर्व मिळण्यासारखें आहे, पण कोठें कां फिरेनास इच्यासारखें रत्न तुला बाबा नाहींच मिळायाचें. साता जन्मीं तप करावें, तेव्हां अशी साध्वी मिळणार ! इची काय तुला योग्यता ठाऊक ! मोठ्या राजाची राणी होण्यासारखें इचें रूप आणि शील ! आणि तसें जर झालें असतें, तर तुझ्यासारखे छप्पन हजार इच्या आज्ञेत राहिले असते !—बरें, त्याजबरोबर दुसरें कोणी होतें का ?

**१ गृहस्थ**–एक नोकर, आणि एक गृहस्थ. त्या गृहस्थाला मीं पूर्वीं पाहिलें होतें.

**विनता**—हं ! तो वाचाल असेल, नव्हे !

१ गृहस्थ–होय, काकूबाई, तोच तो !

विनता—तो मोठा खराब मनुष्य आहे,–अगदीं वाईट चालीचा ! त्याच्याच संगतीनें माझा मुलगा बिघडला ! शूरसेन हाडाचा किती पण चांगला !

१ गृहस्थ–तुह्मी ह्मणतां तसें खरें, पण सभ्यतेची वाण वाच त्याच्या अंगीं पुष्कळ आहे.

विनता—हें आपलेंच घर आहे असें समजा. कशाविषयीं संकोच नका करूं. तुमची आणि माझ्या मुलाची पुनः गांठ पडेल, तेव्हां मी असें ह्मटलें ह्मणून सांगा कीं "आज जो अपयशाचा डाग लावून घेतलास तो तरवार गाजवून कितीही रणांत यश मिळविलेंस, तरी त्याच्यानें नाहींसा होणार नाहीं." आणखी मी एक पत्र अंमळशानें देईन तेवढें कृपाकरून त्याला पोहोंचतें करा.

२ गृहस्थ—आपण सांगाल तें काम आह्मी मोठ्या आनंदानें करूं.

विनता—हे आपले मजवर मोठे उपकार होतील. थोडें तुह्मांला विचारायाचें आहे, इकडे येतां का?–[ विनता आणि दोन गृहस्थ जातात.]

जानकी–" माझी पत्नी जिवंत आहे, तोंपर्यंत घरीं माझें कांहीं नाहीं." मी आहे तोंपर्यंत त्यांचें कांहीं नाहीं. असें काय प्रिया ? तेव्हां मी वांचून तुला दुःखच देणारना ! मी आपली येथून गेलें ह्मणजे मग तर घरीं तुझें सर्व कांहीं आहेना ? किती पण मी पापी ! जन्मास आलें नाहीं तों आईला मारिलें; बापालाही फार दिवस राहूं दिलें नाहीं; आणि लग्न लागलें नाहीं तोंच पतीला देशोधडीला लाविलें. बिचारी माउली सासू ! लहानपणीं मुलीप्रमाणें संगोपन के-

ळें, आणि आतां जरी माझ्यामुळें तिच्या मुलानें घराचा त्याग केला, तरी मला येवढा चकार शब्द तरी बोलते आहे का? उलटें माझेंच समाधान करिते! अग माउली! तुझे कोठें ग उपकार फेडूं! हाय हाय! पांढऱ्या पायाची मी कोठली!

अंजनीगीत.

समरा[1] घालविलें मीं पतिला,
लावियलें त्या देशोधडिला।
गाईपासुनि वत्स तोडिला,
किति मी पापिणी ॥ १ ॥
कोठें कोमल पतिचीं अंगें,
पाहुनि ज्यांतें मन हें रंगें।
विदीर्ण[2] होई तनु यत्संगें,
सायक[3] ते कोठें? ॥ २ ॥
सुंदरवनितानेत्रकटाक्ष[4],
चोराया जो अतीव दक्ष[5]।
केला तो मीं राजीवाक्ष[6],
निर्दयशरविषय[7] ॥ ३ ॥

अहो वायुवेगानें गमन करणारे निशित[8] सायकहो! माझ्या वल्लभाच्या शरीरावर प्रहार करू नका; सूंसणणण करीत त्याच्या जवळून जा, पण त्याच्या एका केसाला देखील धक्का लावूं नका! हाय! हाय! कोणी वीर त्याजवर शस्त्र उचलील, तें माझ्यामुळें! त्याजवर चालून येईल, तें माझ्यामुळें!

---

१ युद्धास. २ फाटलेली. ३ बाण; ४ रूपवती स्त्रियांचें वांकड्या डोळ्यांनीं पहाणें; ५ तयार; ६ कमलासारख्या डोळ्याचा; ७ बाणाचा नेम; ८ तीक्ष्ण.

युद्ध त्यांनीं कधीं पूर्वीं पाहिलें नाहीं, काय होईल बाई कोण जाणे ! मीच या सर्व अनर्थाचें मूळ. हे देवाधिदेवा !

श्लोक.

क्षुत्क्षाम[1] हिंस्र[2] मजला पशुराज[3] फाडो,
पादाहत[4] द्रुत[5] कृतांत फणींद्र[6] तोडो ।
येवो विपत्ति सकला मजलाच साची,
राहो परंतु तनु अक्षत[7] वल्लभाची ॥

वल्लभा ! घरीं परत ये. समरीं विजयश्री मिळते, नाहीं असें नाहीं. पण एखादे वेळीं सर्वच कीं रे जातें ! तेव्हां मीच येथून जाईन कशी. मी येथें आहें ह्मणून वल्लभानें घर सोडिलें ! तेव्हां मी येथें कशी राहूं ?

श्लोक.

सकलहि असती कीं स्वर्गसौख्यें गृहांत
परि पति जरि नोहे काय आहे तयांत ?
विभवपरिजनांचा लोप होवो, न किंतु
युवति पतिस मानी सर्व सौख्यैकहेतु ॥

तेव्हां मी येथून जाणारच. मी गेलें अशी बातमी त्यांच्या कानीं पडतांच वल्लभ घरीं परत येतील, ह्मणजे माझें काम झालें. मग माझें कांहींही होवो ! अरे सूर्या ! अरुणास लवकर वारू[8] हाकायास सांग ! युवतींची प्रिया रजनी[9] प्राप्त झाली कीं, मी नक्तंचरांप्रमाणें[10] गृह सोडून जेथें पाय नेतील तेथें जाईन ! मजकारितां आणि पतीनें इतकें दुःख भोगावें ना ! [ जाते ]

---

१ भुकेलेला; २ क्रूर; ३ सिंह; ४ पायानें डिवचलेला; ५ लौकर; ६ मोठासर्प; ७ जखम झाल्याशिवाय; ८ घोडे; ९ रात्र; १० रात्रीं हिंडणाऱ्याप्रमाणें.

## प्रवेश ३.

### स्थळ—पांडुरंगपुर, राजवाड्याच्या पुढील मैदान.

[ललकारा. प्रहारवर्मा, शूरसेन, सरदार, शिपाई वगैरे येतात.]

**प्रहारवर्मा**—शूरसेन! तुमची अश्वसेनेवर योजना केली आहे. तुमच्यावर आमचा चांगला भरंवसा आहे, तेव्हां त्याप्रमाणें यश मिळवा!

**शूरसेन**—माझी येवढी योग्यता नाहीं, पण आपण मजवर हें काम सोंपलेंच, तेव्हां कांहीं होवो, देहाची परवा न बाळगतां यश मिळविण्याविषयीं झटेन.

**प्रहारवर्मा**—तेव्हां आतां जा. प्रिय [1]वनितेची [2]सपत्नी विजयश्री आज समरांत तुमच्या गळ्यांत माळ घालो!

**शूरसेन**—हे विजयश्रिये! तुझी मी प्रार्थना करीत आहें. तूं मला वश हो. आणि तुझ्या सपत्नीचें स्मरण सुद्धां मला होऊं देऊं नको! [जातात.]

---

## प्रवेश ४.

### वेणुग्राम-जहागिरदाराच्या वाड्यांतील एक खोली.

[विनता आणि कारभारी येतात.]

**विनता**—असें कसें बरें केलं तुम्हीं, कारभारी? पत्र मला द्यायाला तुमच्याजवळ दिलें, तेव्हां तुम्हाला संशय कसा बरें आला नाहीं कीं ही कोठें तरी दुसरीकडे निघून जाईल म्हणून? वाचा बरें पुनः तें पत्र.

**कारभारी**—[वाचतो]

---

१ स्त्रीची; २ सवत.

## ओव्या.

मातुःश्री समान बाई ! तुमची प्रीती मजवर काई ॥
होईन कशी उतराई । फारच फार ऋणी मी ॥ १ ॥
जातें मी गृह सोडुनी । परी संशय यावा न मनीं ॥
शिष्टांगनांची[1] रीत जुनी । सोडीन ती मी न कदापि ॥२
मोठ्या पदीं धरिली आस[2] । वरूं पाहें राजहंस ॥
तेणें कोपलें मानस । मदनराजाचें तत्वतां ॥ ३ ॥
त्याचा शमवाया रोष । जाळाया आपुले दोष ॥
धरिला संयात्रिकांवेष[3] । आतां जातें जनस्थाना ॥ ४ ॥
पतिला धाडिलें समरा । जेथें काळ उभा हावरा ॥
कैशी मी पापिणी घरा । राहोनी सुख उपभोगं ॥ ५ ॥
पत्र धाडावें निजसुताला । "पत्नी गेली यावें गृहाला ॥
साहस मार्ग नाहीं भला । आचरावा तो न कदापि"६
त्यांनीं यावें गृहालागीं । ह्मणुनी जातें मी अभागी ॥
विभूति चर्चूनी आंगीं । दारूण तपा आचरीन ॥ ७ ॥
पतिच्या सेवेला अंतरलें । आपणाला नाहीं सुख दिलें ॥
मनीं माझ्या हें फारच सलं । परंतु येथें निरुपाय ॥८॥
दुःख दिधलें सुताकारणें । अपराध हा पोटीं घालणें ॥
हेंचि शेवटीं मागणें । आपुल्या जानकीचें ॥ ९ ॥

विनता-तिनें आपणालाच दोष लावून घेतला आहे; पण तिचे हे कोमल शब्द माझ्या हृदयांत कसे टोचतात-अहो जीवनराव! तुह्मीं तिला कसें हो जाऊं दिलें ! तिची

---

१ सभ्य बायकांची; २ इच्छा; ३ वाटसराचा वेष.

माझी गांठ पडती, तर माझा शब्द तिला मोडवताना! ह्मणू-नच तिनें तो प्रसंग टाळिला!

**कारभारी**—येथें माझी चुकी झाली खरी. हें पत्र रात्रीं-च्या रात्रींच आपणाला दिलें असतें, तरी बरें झालें असतें! तिला पुनः परत आणितां आलें असतें.

**विनता**—कशी गत होईल या उनाड पोराची? हा कसा येईल शुद्धीवर कोण जाणे? देव तरी कसा करील याचा अ-पराध सहन? अथवा इच्याच पुण्याईनें देवाला कांहीं करुणा आली तर येईल! काय साध्वी त्याला मिळाली होती! न-शीबीं पाहिजे खरें असलें रत्न पचायला. काय करूं? कांहीं सुचत नाहीं. जीवनराव! त्या साध्वीच्या या अल्लड पतीला असें पत्र धाडा कीं, तिच्या गुणांची तुला पारख नाहीं, तुझ्य आईला तूं गेलास आणि तीही गेली ह्मणून फार दुःख झालें आहे; असें लिहा; आणि एखादा चांगला जासूद पाहून त्या-जवरोवर हें पत्र पाठवा. ती गेली असें ऐकल्यावर तो बहु-तकरून घरीं येईल, आणि न जाणो तो घरीं आला हें क-ळल्यावर तीही परत न येईल कशावरून? काय तिचें निष्क-पट प्रेम! काय औदार्य! पतीच्या जीवाकरितां आपला जीव ही इनें संकटांत घातला! माझ्या पोटचा पोर, तेव्हां तो मला आवडतोच. पण ही कांहीं मला कमी नाहीं. बरें पण यांत मला अधिक कोण प्रिय हें सांगवेल? माझें मलाच कळत नाहीं, तेव्हां काय सांगूं?—हा जासूद पाठवाच अं— देवा! आणखी किती दुःखें मला पहायाला लागणार!

[ जातात. ]

## प्रवेश ५.

### स्थळ—पांडुरंगपुर—चंद्रभागेच्या कांठचें एक मैदान.

[ नौबदीचा ध्वनि दूरचा ऐकूं येतो. एक वृद्ध विधवा, पार्वती, विजया, आणि सागरिका आणि इतर बायकापुरुष येतात. ]

**विधवा**—अग ! अशा येथें उभ्या रहा ! नाहीं तर एकदा का स्वारी दिंडीदरवाज्यानें नगरांत शिरली, ह्मणजे मग आपणाला पाहायाला नाहीं सांपडणार !

**पार्वती**—आई ! विजयानगरच्या जहागीरदारानें मोठा जय मिळविला ह्मणतात.

**विधवा**—होय, असें मींही ऐकिलें. यवनांचा एक मोठा वीर त्यानें पकडला, आणि सुलतानाचा एक भाऊ तर, आपल्या हातानें ठार केला. आपणाला वाटलें होतें कीं स्वारी या रस्त्यानें जाईलशी, पण तिकडूनच कोंगे गेली ! आपण येथें उगीच उभ्या राहिलों ?—ऐकलें का तें शिंग ? ते तिकडूनच गेले.

**सागरिका**—स्वारी नाहीं पहायाला सांपडली तर नाहीं. आपल्या शेजारणी सांगतील तर खऱ्या कसा थाट होतो तो ! तेवढ्यावरच आपण समाधान करून घेऊं. अग पण पार्वती ! या विजयानगरच्या जहागीरदाराला ओळखून ठेव हो. आपल्या बायकांचें धन काय ती अब्रू ! ती गेली ह्मणजे मग काय राहिलें बरें ?

**विधवा**—आणि तूंही पण त्याचाच तो अक्कडबाज सोबती त्याला संभाळ हो ! तो तुझ्या पाठीमागें घिरट्या घालीत असतो.

**सागरिका**—हं ! तो मेला लुच्चा ! आहे ठाऊक. मेल्या वाचालाचें निसंतान होवो ! असला लबाड मनुष्य त्या जहागीरदारानें आपल्या जवळ कसा ठेविला कोण जाणे. तोच त्याला बिघडविणारा ! यांना संभाळ हो पार्वती ! यांच्या बोलण्यावर जाऊं नकोस. खुणा करितील, डागिने देतील, शपथा घेतील, आणि दुसरीं हीं कपट -अस्त्रें योजितील. अशांनीं पुष्कळजणी फसल्या आहेत. आणि चमत्कार हा कीं इतक्यांना ठेंचा लागल्या असूनही मागच्या शहाण्या होत नाहींत. काय भुरळ पडते त्यांना कोण जाणे बाई ! तुला सांगावें असें नाहीं. तूं शहाणी आहेस; आणि आजपर्यंत जसें धुतल्या तांदळासारखें तुझें आचरण आहे, तसेंच तूं राहूं देशील यांत कांहीं संशय नाहीं.

**पार्वती**—मजविषयीं नको कांहीं तुला काळजी करायला. माझी मी पक्की आहे.

[ यात्रेकराचा वेष घेतलेली जानकी येते. ]

**विधवा**—अशीच ऐस हो !—अग ! ही पाहिली का यात्रेला चालली आहे; इचा आज येथेंच मुक्काम होईल—कायग बाई ! तुला कोठें जायाचें आहे ?

**जानकी**—जायाचें आहे लांब, जनस्थानाला. यात्रेकरू कोठें उतरतात हें तुह्माला ठाऊक असेल ?

**विधवा**—देवळांत उतरतात.

**जानकी**—हाच का रस्ता देवळाचा ?

**विधवा**—होय, हाच. ऐकलें का ? [ दूर नौबदीचा शब्द होतो ] इकडूनच शेवटीं स्वारी येते वाटतें. ही स्वारी जाईपर्यंत येथें जर तूं उभी राहशील बाई, तर मीच तुजबरोबर येईन. तशांत आमचें घर विठ्ठलमंदिराजवळच आहे.

**जानकी**—मग तर बरेंच झालें. तुमच्याबरोबरच येईन.

**विधवा**—तूं कोठून आलीस बया ?

**जानकी**—दक्षिणदेशांतून.

**विधवा**—विजयानगराहून ?

**जानकी**—थेट तेथून नव्हे, त्याच्या जवळ एक गांव आहे तेथून.

**विधवा**—तुमच्या तिकडच्या एका जहागिरदारानें आमच्या राजाची मोठी कामगिरी बजाविली, तो आतां तुला येथें पहायाला सांपडेल.

**जानकी**—त्याचें नांव काय बरें ?

**पार्वती**—त्याला शूरसेन ह्मणतात. तो पाहिला आहेस का कधीं पूर्वीं ?

**जानकी**—हो. ऐकून आहे ठाऊक. त्याची कीर्ति या कानांनीं पुष्कळ ऐकिली आहे.

**पार्वती**—तो कसाही असो; येथें त्यानें चांगली तरवार गाजविली. असें ह्मणतात कीं विजयानगरच्या राजानें याचें एका स्त्रीशीं बळेंच लग्न लावून दिलें, ती आवडत नव्हती ह्मणून यानें स्वदेशत्याग केला! गोष्ट खरी आहे का ग ही ?

**जानकी**—अगदीं खरी. त्याची बायको माझ्या आहे ओळखीची.

**पार्वती**—त्या जहागीरदाराच्या पदरीं एक गृहस्थ असतो, तो तिजविषयीं चांगलें ह्मणत नाहीं.

**जानकी**—त्याचें नांव काय?

**पार्वती**—त्याला वाचाल ह्मणतात.

**जानकी**—होय. तो ह्मणतो तें खरें. जहागीरदाराला

कांहीं तो योग्य नाहीं. तो स्वभावानें गरीब, एवढाच काय तो तिच्या अंगीं गुण.

**पार्वती**—जन्माच्या या गांठीं, आणि असें असलें ह्मणजे काय करावें बाई त्या बिचारीनें? असल्या आगीशीं नको ग बाई प्रसंग!

**विधवा**—खरेंच. अशा वैसाची गांठ पडली ह्मणजे पोरीच्या साऱ्या जन्माचें मातेरें होतें.—आमच्या मनांत आलें तर या कन्येचें आणि त्याच्या बायकोचें हाडवैर होईल.

**जानकी**—ह्मणजे? जहागीरदारांची येथें वासना उत्पन्न झाली कीं काय?

**विधवा**—होय, असेंच कांहीं—कितीदा तर त्यांनीं माणसें पाठविलीं, आणि तीं तरी कशी पुसशील, तर अगदीं लबाड. बायकांना फसवावें कसें, ही विद्या पाहिजे असेल तर त्यांजपासून कोणी शिकून घ्यावी! पण इथें त्याला आह्मी भल्या पक्क्या भेटलों आहों. अशाला का आह्मी बधतों?

**सागरिका**—असें आहे, ह्मणूनच बरें आहे.

[पटहध्वनि करीत आणि निशाणें फडकवीत पांडुरंगपुरचा सैनिकभाग येतो. त्यांत **शूरसेन** आणि **वाचाळ** येतात.]

**विधवा**—ही पहा स्वारी इकडूनच आली. तो पाहिला का **भुवनसुंदर**, आमच्या राजाचा वडील पुत्र; आणि तो **भीमदेव**.

**जानकी**—विजयानगरचा जहागीरदार तो कोणता?

**पार्वती**—तो! तो! ज्याच्या मंदिलाला शिरपेंच आहे, तो—कसें राजबिंडें शरीर आहे त्याचें. त्यानें कां बरें आपल्या बायकोचा धिक्कार करावा? याचें वर्तन चांगलें असतें

तर हेंच रूप किती खुलतें? रमणीय नाहीं बरें हा पुरुष तुला दिसत?

**जानकी**-खरेंच. याला पाहून कीं नाहीं नेत्र गार होतात.

**पार्वती**-अशांनीं बरें चांगलें न राहावें? पण ते कोठचे स्वस्थ बसायाचे? तो, पाहिला का तो गृहस्थ, तोच गुलाम त्या जहागीरदाराला वाईट फंदांत शिरायाला लावतो. मेल्याचें निसंतान होवा!

**जानकी**-कोणता बरें तो?

**पार्वती**-अग तो रंगेल झोंकदार अंगरख्याचा गृहस्थ! त्याचें तोंड आज उतरल्यासारखें कां बरें दिसतें?

**जानकी**-एखादा बाणबीण लागला असेल युद्धांत.

**वाचाल**-आमचा आणि पटह जावा, ठीक!

**सागरिका**-कांहीं तरी झालें आहे, म्हणून स्वारी इतकी उद्विग्न दिसते आहे. अगबाई! पाहिलें हो त्यानें आपणाला.

**विधवा**-मेल्याची दृष्टि कशी आहे पण?

**सागरिका**-मला गांवभर कुंटणकी करीत फिरतो!

[ **शूरसेन, वाचाल** आणि इतर सैनिक जातात.]

**विधवा**-चला ग, स्वारी गेली, आतां आपण घरींच जाऊं. चल बाई! तुझी उतरायाची सोय करितें. आमच्या येथेंच का उतरसना?

**जानकी**-मजकडून कांहीं ना नाहीं. चला. तुह्मी कीं नाहीं या गांवांत मला चांगल्या भेटलां बरें. ही कन्यका तुमची मला फार आवडते. चला. [ जातात.]

---

## प्रवेश ६.

### स्थळ—पांडुरंगपुरकरांचें शिबिर.

[ शूरसेन आणि विजयानगरचे दोन सरदार येतात ].

**१ सरदार**—येवढें त्याला करायाला आपण लावावेंच. ह्मणतो आहे तर जाऊं द्याना का पण ?

**२ सरदार**—आणि यांत जर त्याचें खरें स्वरूप बाहेर पडलें नाहीं, तर मग माझें नांव बदलून ठेवा.

**१ सरदार**—काय आपणाला वाटत असेल तें असो—पण ही स्वारी अगदीं कवडीच्या मोलाची !

**शूरसेन**—एकूण तुह्मांला असें वाटतें कीं याची योग्यता मला मुळींच कळली नाहीं.

**१ सरदार**—मी आपल्या स्वतःच्या अनुभवावरून सांगतों, माझें त्याचें कांहीं वांकडें नाहीं, आपला झाला ह्मणून काय झालें ? गाढवाचा कांहीं सिंह होत नाहीं. ही स्वारी भेंकडांत भेंकड, लबाडांत लबाड ! यांच्या ह्मणण्यांत एक तरी खरें असावें—रामाचें नांव ! भल्या लंब्याचवड्या वाता मारतील, त्या ऐकून मात्र घ्याव्या; पण कर्तृत्वाच्या नांवानें आवळ्याएवढें पूज्य ! त्याच्या अंगीं एक तरी गुण आहे का कीं त्याच्या योगानें हा आपल्या पदरीं असावा.

**२ सरदार**—त्याचें खरें स्वरूप एकदा आपण ओळखून ठेविलें पाहिजे, कां कीं याजवर उगीच भरंवसा ठेविला तर एखादे प्रसंगीं आपणाला ही स्वारी तोंडघशीं पाडायाची !

**शूरसेन**—त्याची परीक्षा तरी मग कशी करावी?

**२ सरदार**—तो ह्मणतो आहेना आपला पटह युद्धांत

गेला आहे, तो मी घेऊन येतों ह्मणून? जाऊं द्या कसा त्याला तो आणायाला. हीच तोड.

१ सरदार—आणि मग कांहीं शिपाई घेऊन मी एकदम त्यावर तुटून पडेन. यवनांच्या शिपायांचे त्यांस वेष देईन, ह्मणजे ते त्याला ओळखूं येणार नाहींत. मग आह्मी त्याला बांधून टाकूं आणि त्याचे डोळे बांधूं. अशानें आमच्याच शिबिरांत जरी आणिलें तरी यवनांच्या शिबिरांत त्यास नेलें आहे असें वाटेल. आणि मग आह्मी त्याला प्रश्न करूं त्यांचे जबाब ऐकायाला तुह्मीं मात्र असावें. ह्मणजे आपला जीव वांचविण्याकरितां भेकडपणानें तुमच्याविषयीं खराखोटा मजकूर सांगून तुमच्याविषयीं इत्थंभूत माहिती देऊन विश्वासघात करायाला हे गृहस्थ तयार होणार नाहींत, तर मिशी उतरून देईन. तुह्मी पाहिजे ती शपथ द्या कीं खरा मजकूर सांग, पण शपथ घेऊनही हवें तें सांगायाला हा मागेंपुढें पहायाचा नाहीं! शपथ ह्मणजे याला कःपदार्थ!

२ सरदार—पटह त्याला आणूंच द्या. वाः! कशी खाशी गंमत पहायाला सांपडेल! तो ह्मणतो मी युक्ति लढवीन, तर लढवूं द्या त्याला युक्ति. एकदा याचें बिंग बाहेर पडलें, आणि वाघाचें कातडें पांघरलेल्या या गाढवाचें सोंग उघाडकीस आलें, ह्मणजे सपुष्पांजलि त्यास आपण सोट्यांचा प्रसाद देणार नाहीं, तर काय पाहिजेल तें सांगेन. हा पहा तो येथेंच आला.

१ सरदार—त्याच्या ह्मणण्याला व्यत्यय आणूं नकाच, आपणाला भली मोठी मौज पहायाला सांपडेल. त्यास पटह आणूंच द्या, मग कोणतीही का तो युक्ति योजीना.

[ वाचाल येतो. ]

**शूरसेन**—कसें काय सेनापतिराव? हा पटह गेल्यापासून तुह्माला सुचेनासें झालें, हें काय?

**२ सरदार**—जाऊं द्या हो, त्यांत काय आहे? पटह पटहाची ती काय विशाद? दीडदमडीचा माल.

**वाचाल**—दीडदमडीचा माल! पटहाची किंमत अशी का तुह्मी लावणार? मग सरदारी आली कळून. हं:! दीडदमडीचा माल! आपला आणि पटह शत्रूच्या हातीं लागावा हा शूराला कलंक नव्हे काय?—पण काय करावें? आपले वीर आणि यवनांचे वीर एक झाले—कोणी कोणाला ओळखेना, अशा वेळीं एका पटहाकरितां होलपट करवेना. नाहीं तर या स्वारीनें दाखविला असता या भुजांचा पराक्रम.

**२ सरदार**—अशी लहान सहान हानि होतेच आहे. एवढा पराक्रमी अर्जुन ना? आणि त्याचें सारथ्य करणारा प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण परमात्मा; पण त्याला सुद्धां समरांत अक्षयी विजय प्राप्त झालाच असें नाहीं. तेव्हां आमच्यासारख्यांचें काय पुसतां? तुमच्याकडे त्याचा कांहीं दोष नाहीं सेनापतिराव!

**शूरसेन**—एकंदरींत आपणाला जय मिळाला तो लहान सहान नाहीं. आपला पटह शत्रूच्या हातीं लागला, यांत थोडीशी मान खालीं घालावी लागते. पण त्याचें आतां काय? पटह गेला तो गेलाच!

**वाचाल**-गेला तो गेलाच कां? पुनः हस्तगत करून घेतां येईल.

**शूरसेन**—अं: ! घेतां येईल! पुढच्याच गोष्टी कीं नाहीं? आतां तर नाहीं आपल्या हातांत.

**वाचाल**—नाहीं ह्मणून काय झालें? आजच्या आज पा-

हिजे तर हस्तगत करून घेऊं. पण आमच्या सैन्यांत कसा प्रकार आहे तो पहा! समरकृत्य करावें एकानें आणि कीर्ति व्हावी दुसऱ्याची! असें जर नसतें तर या पठ्ठयानें हें काम अंगावर घेतलें असतें आणि ह्मटलें असतें कीं पटह आणीन, नाहीं तर पुनः तोंड दाखवायाला परत यावयाचा नाहीं.

**शूरसेन**—तुमच्या मनांत आलेंच असेल, आणि तुह्माला खातरी असेल कीं आपली युक्ति फत्ते व्हावयाचीच, तर आमचे कडून ना नाहीं. कीर्ति मिळविण्याचा हा प्रसंग आला आहे तो दवडूं देऊं नकाच, राव! तुह्माला या कामांत यश मिळालें तर महाराज तुमची स्तुति करितील आणि तुह्माला मानही देतील याचा जिम्मा मजकडे लागला. मग तर झालें ना?

**वाचाल**—तर मग मीं हें काम पतकरिलेंच, शपथ.

**शूरसेन**—तर मग उठा. उगीच दिरंगाईवर टाकणें कामा नये.

**वाचाल**—मी युक्तीनें तो आणणार हो! युक्तिप्रयुक्तींचा विचार केला पाहिजे. उगीच उतावीळपणा कामाचा नाहीं- तेव्हां अस्तमानीं सर्व तयारी करून अंधार पडला ह्मणजे जाईन. सुमारें मध्यरात्रीचे सुमारास काम फत्ते करून येईन समजा.

**शूरसेन**—तर मग महाराजांच्या कानावर तुमचा हा बेत घालूं काय?

**वाचाल**—मी जातों, पण याचा शेवट कसा होईल हें काय सांगूं? यशाविषयीं कोणीं खातरी करावी? यत्न करून पाहणार, येवढेंच.

**शूरसेन**—नाहीं, असें कसें होईल? तुमचा पराक्रम मला

ठाऊक नाहीं ? यश मिळवून याल यांत तिळमात्र संशय नाहीं. बरें तर आतां जा.

**वाचाल**—मला फारसें बोलणें नाहींच आवडत [ जातो.]

१ **सरदार**—नाहीं खरेंच. बकाला जसे मत्स्य आवडत नाहींत तसेच !—कां आलें कीं नाहीं प्रत्ययास ?—अंगांत तर धमक नाहीं, खातरी आहे कीं आपले हातून काम व्हावयाचें नाहीं, तरी अंगावर घेतलें, मजा आहे कीं नाहीं ! मेलों तरीं बेहेत्तर पण हें काम करीन असें ह्मणतो ; आणि जीव तर माटमूट करतो आहे आणि ह्मणतो आहे "गड्या, भलत्याच कसल्या कामांत पडला आहेस ? उद्यांचें मरण आजच कां आणून घेतोस." कशी आहे गंमत ?

२ **सरदार**—जहागीरदारसाहेब,—त्याला आपण अझून चांगले ओळखीत नाहीं. हें खरें कीं प्रथमत: लोक त्याच्या बातांनीं फसतात, पण कांहीं दिवसांनीं खरें कळल्यावर ते त्याला पुढें उभा सुद्धां राहूं देत नाहींत.

**शूरसेन**—एकूण तुह्माला असें वाटतें काय कीं जो येवढें बोलून गेला, तो कांहींच करणार नाहीं, गेला तसाच परत येईल ?

१ **सरदार**—यांत काय संशय ? हात हालवीत परत स्वारी यायाचीच ! आणि साजतील अशा एकदोन बनावट गोष्टी द्यायाची झोंकून. पण आमच्या येथें त्याची आतां डाळ शिजायाची नाहीं. आज रात्रीं त्याची कशी फटफजिती उडेल, ती आपण पहालच. खरेंच सांगतो, आपली येथें नजर चकली.

२ **सरदार**—मांजरानें उंदीर धरिला ह्मणजे मारायाचे पूर्वीं आपल्या पिलांजवळ आणून तें त्याला खेळवितें, त्याप्र-

माणें सांपळ्यांत अडकविण्यापूर्वीं कांहीं वेळ या कोल्ह्याला आह्मी खेळवूं. या शिकारीचा सुगावा आपले वृद्ध सुव्रत यांस प्रथमतः लागला; ती आज आह्मी साधणारच! वेष हिरावून घेतल्यावर हे राजश्री कसे दिसतील ते आपण पहालच.

१ सरदार—आह्मांला ही शिकार साधायाची, तेव्हां आमिषाची वगैरे तजवीज ठेवायाला गेलें पाहिजे. आज या कोल्ह्याला सांपळ्यांत पकडायाचें, खास.

शूरसेन—तुह्मी जातां तर जा; पण तुमचे बंधु मजबरोबरच असतील.

१ सरदार—बरें आहे. आपली मर्जी! [ जातो. ]

शूरसेन—चला, आपण मंदिरांत जाऊं; परवां ज्या सुंदरीविषयीं मीं गोष्ट काढली होती, तिचें तुह्मांस दर्शन करून देतों, चला.

२ सरदार—पण ती अशीतशी नाहीं, असें आपण ह्मणालांना!

शूरसेन—येवढ्यानेंच तर सर्व बिघडलें. तिची माझी काय ती एकदाच गांठ पडली, आणि त्यावेळेस तिनें कसें मला झिडकारिलें, ह्मणतां? अब्ब! काय तिचा कोप—पण आह्मी कोठें अशाला भिणार—आपण ज्याच्या विषयीं नुक्तेंच बोलत होतों, त्याच्या द्वारें लेखादि प्रणयाचीं चिन्हें आह्मीं पाठविलीं; पण तीं जशींच्या तशींच परत आलीं! येथपर्यंत कायती मजल हा वेळ पावेतों पोंचली आहे. पुढें सूत जमतें कीं नाहीं कोण जाणे! सुंदरी पण सुंदरी! एकदा डोळे निववायाचे आहेत काय?

२ सरदार—हें हो काय पुसतां? अमृताचें ताट लाथेनें कोणी झुगारून देईल काय? चला! [ जातात. ]

## प्रवेश ७.

### स्थळ—पांडुरंगपुर. विधवेच्या घरांतील एक खोली.

[ जानकी आणि विधवा येतात. ]

**जानकी**—अझूनही तुमची खातरी होत नाहीं, तेव्हां येथें माझा उपाय खुंटला. तुमच्या रुकारावर मी पुढची इमारत रचणार होतें ! झालें-पायाच सांपडत नाहीं, तेव्हां नशीब माझें ह्मणायाचें.

**विधवा**—तूं ह्मणतेस तें सर्व खरें. पण बाई हें बघ. घरची गरीबी खरी, पण असलीं कर्मं आमच्या कुळांत कोणीं केलीं नाहींत. तेव्हां तुझ्या ह्मणण्याला रुकार देऊन मी आपल्या कुळाला डाग कशी लावून घेऊं ?

**जानकी**—माझा पण तसा भाव नाहीं. तुह्मी माझें चांगलें समजून घ्या. मी भलतेंच तुह्माला करायाला नाहीं सांगायाची बरें. या जहागीरदाराची मी पत्नी; तुह्माला संशय कसला तो येऊं देऊं नका. दुसरीकडे कोठें बोलणार नाहीं असें वचन घेऊन तुह्मांला जें आपलें वृत्त सांगितलें त्यांत काडी इतका सुद्धां फरक नाहीं बरें. मग मी जें तुमचें साहाय्य मागतें, तें देण्याला तुमचें काय जातें बरें ?

**विधवा**—असें का ? तर मग गोष्ट निराळी. तूं खरी आहेस, तुजवर ठेवावा भरंवसा, असें आतां वाटतें. आणखी तूं जें मला आपणाजवळचें धन दाखविलेंस, त्यावरून तूं कोणी मोठ्याची बायको असावीस असें वाटलें होतेंच. तें आणि हें आतां जुळतें.

**जानकी**—ही फूल नाहीं फुलाची पाकळी घ्या, आणि येवढें माझें ऐकाच. माझें कार्य झालें ह्मणजे मग याच्या श-

तगुणित तुह्मांस देईन. आतां पहा—जहागीरदार तुमच्या घ-राभोंवतीं घिरट्या घालतो आहे; तुमच्या आणि तुमच्या सुं-दर कन्येच्या पाठीं लागला आहे कीं येवढी गोष्ट कबूल क-राच आणि लग्न होऊं द्या. तुमचा त्याच्या ह्मणण्यावर विश्वास नाहीं बसत, आणि तें ही बरोबरच आहे. एकीला टाकलें तसें दुसरीला कसा नाहीं टाकणार असें तुह्माला वाटतें हें ठीकच आहे. पण यांत माझें काम होण्यासारखें आहे. तें कसें ? तुह्मी आपल्या कन्येला हो तर ह्मणायाला सांगा, ह्मणजे मग पुढें कसें काय करायाचें तें मी सांगेन. युवती रु-कार देण्यापूर्वीं जें कांहीं मागेल तें देण्याला उल्लू पुरुष तयार होतात, हें तुह्माला ठाऊक असेलच—तेव्हां जहागिरदाराच्या कुळांत पिढ्यानपिढीची जी एक बहु मोलाची आंगठी आहे, व जी हल्लीं माझ्या पतीच्या बोटांत आहे, ती तुमच्या कन्ये-नें त्याजवळ मागितली तर त्याच्यानें 'नाहीं' नाहीं ह्मणवणार. पुढें आपणाला पस्तावा होईल याचें भा ' त्यावेळीं पुरुषाला नाहीं राहत.

**विधवा**—आतां समजलें तुझी हिकमत ! बऱ्या कीं ग आ-तांच्या पोरींना पतीचें मन वश करून घेण्याच्या युक्ति सुचतात !

**जानकी**—आतां झालीना बाई तुमची खातरी कीं मी भलतें सलतें काम तुह्माला किंवा तुमच्या कन्येला नाहीं सां-गत अशी ? तुमच्या कन्येला सांगायाचें ह्मणून येवढेंच. वश झाल्यासारखें दाखविण्यापूर्वीं तिनें ही आंगठी मागावी, मग संकेत करावा, आणि आपले जागीं मला पाठवून आपण अलिप्त तें अलिप्तच राहावें. हें माझें कार्य झालें ह्मणजे ति-च्या लग्नास जो काय खर्च लागेल तो मी आणखी देईन. यांत तर कांहीं वावगें नाहींना ?

**विधवा**—झाली, तुझी गोष्ट मला मानवली. माझ्या वयेला काय बोलायाचें कसें बोलायाचें, केव्हां त्याला यायाला सांगायाचें, तें सर्व शिकीव. ह्मणजे मग तुझा बेत फसायाचा नाहीं. येथें तो अक्षयीं येत असतो, जसा कांहीं जपणीसच लागला आहे. त्याला मीं पुष्कळदां ह्मटलें कीं येथें येत जाऊं नका ह्मणून. पण माझें कोठें कोण ऐकतो? त्याचें येणें आपलें कायमच.

**जानकी**—तर मग आजच हा प्रयोग सिद्ध करण्याच्या योजनेला लागूं. सिद्धि झाली तर कपट करून फसविलें, आणि फसविलें तरी निंद्यकर्म केलें नाहीं, असें होणार. खऱ्यांत खोटें, खोट्यांत खरें, अशा सांगडी जुळणार. पण त्याच्या तयारीला तर लागूंद्या—चला. [ जातात. ]

---

अंक ३ रा समाप्त.

# अंक ४ था.

—•:※:•—

## प्रवेश १.

**स्थळ–पांडुरंगपुर. शिबिरांच्या मधील मैदान.**

**[ पहिला सरदार आणि पांचसहा शिपाई छपून बसलेले असे येतात. ]**

**१ सरदार**–याच शेरींतून त्याला गेलें पाहिजे. तर तुह्मी त्याजवर तुटून पडाल तेंव्हां जें तोंडास येईल तें बोला. त्यांत अर्थ असो वा नसो. त्याचें बोलणें आपणाला समजतें असें दाखवितां कामा नये. कारण आपल्यापैकींच एखाद्याला दुभाष्या बनविलें पाहिजे, आणि त्याच्या द्वारेंच याचें ह्मणणें आपणाला कळतें असें दाखविलें पाहिजे.

**१ शिपाई**–महाराज, मी दुभाष्या होतों.

**१ सरदार**–तो तुला ओळखीत नाहीं काय ? तुझा शब्द नाहीं त्याच्या ऐकण्यांत ?

**१ शिपाई**–नाहीं, सरकार.

**१ सरदार**–पण आमच्याशीं बोलतांना कोणती हेंदाडी भाषा तूं बोलशील ?

**१ शिपाई**–जी आपण बोलाल तीच.

**१ सरदार**–त्याला वाटावें कीं आपण कोणी यवनांना साहाय्य करण्याकरितां उत्तरेकडून आलों आहों. यवनांची भाषा आपण बोलतां कामा नये, कारण ती थोडीबहुत त्याला येते. तेंव्हां आपण तोंडास येतील ते वर्ण वदावे, अ-

र्थ त्यांत नसावाच, पण असें मात्र दाखवावें कीं एकमेकांचें ह्मणणें एकमेकाला लगेच कळतें. तोंडांतल्या तोंडांत बोलावें; कांहीं तरी अक्षरें काढावीं आणि वेळ मारून न्यावी. आतां तूं दुभाष्याचें काम करणार, तेव्हां तुला सभ्य झालें पाहिजे. पण चीप ! हा आला पहा ! स्वारी येथें चारपांच घटका झोंप ताणणार आणि मग मन मानेल तशा बाता ठोकणार !

[ वाचाल येतो. ]

**वाचाल**—प्रहररात्र झाली आणखी एका प्रहरानें परत जायाला हरकत नाहीं. काय केलें ह्मणून सांगावें पण? अशी एखादी लोणकढी मारिली पाहिजे कीं सर्वांस खरी वाटावीच. आमचें भांडवल फुटूं पहात आहे, आणि अलीकडे आमची फजितीही वरचेवर होऊं लागली आहे. आमची जीभही आतांशा फार लबलब करायाला लागली आहे, बेटी नाहीं त्या लचांडांत आह्मांला ढकलते, आणि आमचें शौर्य पुसाल तर बायकोच्या नथेंतून तीर मारण्यापुरतें.

**१ सरदार**—[ एकीकडे ]—राजश्रींनीं खरें बोलण्याचें पातक हें प्रथमतःच केलें असें दिसतें.

**वाचाल**—कोणी होऊन सांगितलें होतें बरें हा पटह परत आणण्याच्या भानगडींत पडायाला ! आमची ताकद का आह्मांला ठाऊक नाहीं ? का आमचा हिय्या ठाऊक नाहीं ? होतें कोणा लेंकाच्या मनांत खरोखरीं जायाचें ? तेव्हां आतां कांहीं तरी शक्कल काढिली पाहिजे. आपल्या हातानेंच आपल्या अंगावर कांहीं वार करावे, आणि ह्मणावें शत्रूंनीं केलें असें. लहानसहान क-

रून जुळायाचें नाहीं. ते ह्मणतील " येवढ्याशाला का भिऊन पळून आलास ? " आणि मोठे तर करण्याची आपली छाती होत नाहीं. ही कोठली नसती व्याध मीं घेतली आपल्या पाठीमागें लावून ? रांडे जिभे ! फिरून तर अशी बोल, ह्मणजे कापूनच टाकतों तुला.

१ सरदार-[एकीकडे] आपली किंमत जाणूनही असा आव घाळतो, तेव्हां चमत्कार नव्हे काय ?

वाचाल-हे माझे कपडे फाडून अगर ही माझी रूमशामची तलवार मोडून जुळतें, तर बरें होतें.

१ सरदार-अशानें कांहीं खरें नाहीं वाटायाचें, बावाजी ! [एकीकडे]

वाचाल-बरें या आमच्या झोंकदार मिशा छाटल्या आणि ह्मटलें वेष पालटला तर ?

१ सरदार-अं हंः ! हें ही चालायाचें नाहीं. [एकीकडे].

वाचाल-किंवा हे सर्व कपडे डोहांत बुडविले आणि ह्मटलें मला त्यांनीं नागविलें तर ?

१ सरदार-तेंही खरें नाहीं वाटणार. (एकीकडे)

वाचाल-मीं ह्मटलें खंदकावरून उडी मारिली—

१ सरदार-शपथ घेऊन सांगितलें तरी खरें वाटणार नाहीं—[एकीकडे]

वाचाल-एखादा पटह येथेंच कोठें पडलेला सांपडता, तर मीं ह्मटलें असतें शत्रूच्या सैन्यांतून घेऊन आलों ह्मणून.

१ सरदार-सांपडायाचें तर नांव नको—पण एक तूं आतां ऐकशील मात्र. (एकीकडे)

वाचाल-एक पटह मिळता तर ! [आंत पटह ध्वनि होतो].

१सरदार-चरम बराजा, भजरा भजरा भजरा !

सर्व–भजरा ! भजरा ! भजरा ! इपगो नावें डोगे ! भजरा ! भजरा !

**वाचाल**–अरे बाबानों ! काय पाहिजेल तें मागा ! पण माझे डोळे बांधूं नका.

[ ते त्याला धरून त्याचे डोळे बांधतात. ]

१ **शिपाई**–बारको आमदल्लो बारको !

**वाचाल**–हं: ! हे त्या अल्लीमर्दानखांच्या सैन्यांतले वाटतें. काय करावें मला यांची भाषा समजत नाहीं ! नाहक माझा जीव घेणार ! अरे यांत कोणाला मलयाळम, द्राविडी कर्नाटकी, तेलगु, किंवा यवनी कोणतीही भाषा येत असेल तरीं बोला, मी अशी माहिती देईन कीं तिच्यायोगानें दोन दिवसांत पांडुरंगपुर तुमच्या हस्तगत होईल. पण माझा जीव घेऊं नका.

१ **शिपाई**–बारको वलादी !—अरे तुझी भाषा मला समजते आणि बोलतांही येते. करीलिबाने कारे !—अरे बाबा ! कुलदेवतेचें स्मरण कर. हे दहा वीर तुझ्या पोटांत तरवारी खुपसायला उभे आहेत !

**वाचाल**–अरे बाबा ! बाबा !

१ **शिपाई**–अरे देवाचें स्मरण कर. काणिक रबल्लिका कुरखाना !

१ **सरदार**–करल हक्किरल मुभरक !

१ **शिपाई**–आमचे सरदार एव्हांच तुला ठार मारीत नाहींत. असा डोळे बांधलेलाच तुला आपल्या सैन्यांत घेऊन जात आहेत, आणि तुजकडून काय माहिती निघेल ती काढणार आहेत. चांगली माहिती दिली तर तुला जीवें सोडून देतील.

**वाचाल**--अहो ! माझा जीव नका हो घेऊं--नका ! आमच्या तळाची सर्व माहिती, आमचें बल, आमचे बेत, हें सर्व कांहीं तुह्माला सांगेन. पण माझा जीव घेऊं नका ! अशी माहिती देईन कीं तुह्माला आनंदच वाटावा--पण मला वाचवा !

१ **शिपाई**--पण खरी माहिती देशील काय ?

**वाचाल**--न दिली तर मरे मरे तों मारा !

**शिपाई**--करंदाविलिंदावे--चल, तुला मुबड दिली आहे, चल.

[ वाचालाला बांधलेला असा घेऊन जातो. ]

१ **सरदार**--जा, शूरसेनमहाराजाला आणि माझ्या बंधूला जाऊन सांग कीं डोमकावळ्याला आह्मीं धरिलें आहे, आणि त्यांचा निरोप येईपावेतों आह्मी त्यास पिंजऱ्यांतच अडकवून ठेविलें आहे.

२ **शिपाई**--जी, सरकार !

१ **सरदार**--आमची बातमी आमच्यापाशींच फोडायाला तयार झाला आहे, ह्मणून सांग.

२ **शिपाई**--हो सांगतो सरकार !

**सरदार**--तोंपर्यंत याला अंधारकोठडींतच कोंडून ठेविलें पाहिजे.

[ जातात. ]

---

## प्रवेश २.

### स्थळ--पांडुरंगपूर विधवेच्या घरांतील एक खोली.

[ **शूरसेन** आणि **पार्वती** येतात. ]

**शूरसेन**--तुझें नांव मोहना आहे नव्हे ?

**पार्वती**–नाहीं, मला पार्वती ह्मणतात.

**शूरसेन**–खरेंच, पार्वतीचेंच रूप! शिवानें जसें त्या पार्वतीला अर्धांगी केलें, तसें मीही तुला करीन. पण हे मनमोहिनी! तुला माझी कांहींच करुणा येत नाहीं काय?

**श्लोक.**

**नीलोत्पलापरि[1] दिसे तव दृष्टि साची**
**चापकळी सरळ साजत नासिकेची[2]।**
**ओष्ठीं[3] तुझ्या विकचविद्रुमकांति[4] पाहें**
**पाषाणतुल्य[5] तव चित्त परी कसें हें?**

प्रिये! असें करूं नको. कांहीं दया येऊं दे.

**पार्वती**–आम्ही सदयच असतों! पण पुरुष किती निर्दय पहा! आपल्या धर्मपत्नीचा त्याग करितात, तसा बायकांनीं आपल्या पतींचा केलेला ऐकिला आहे काय?

**शूरसेन**–असे आडून मला बाण नको मारूं! कर ह्मटल्यानें प्रेम करवत नाहीं. म्हणून बलात्कारें जिच्याशीं माझा विवाह लाविला, तिजवर माझें प्रेम जडलें नाहीं, म्हणून मीं तिचा त्याग केला, तर मजकडे काय दोष? तुजवर माझें खरोखर प्रेम आहे. आणि तें एकनिष्ठ आहे, असें समज.

**श्लोक.**

**प्रथम नयनावाटें जो का शिरे हृदयांतरीं[6]**
**अनुदिन[7] हि जो वाढे शुक्लीं[8] जसा विधु[9] अंबरीं[10]।**

१ निळ्याकमळाप्रमाणें. २ नाक. ३ ओंठावर. ४ फुटलेल्या पोंवळ्याचें तेज. ५ दगडासारखें. ६ हृदयांत. ७ दिवसेंदिवस. ८ शुद्धपक्षांत. ९ चंद्र. १० आकाशांत.

**प्रणय[1] मम तो नोहे खोटा, न संशय ग धरीं**
**मदन छळितो भारी आतां, प्रसाद सखे करीं ॥**

**पार्वती**–पुरे तें ! जंवर स्त्रिया वश होत नाहींत तंवरच! त्या एकदां हातीं आल्या ह्मणजे पुरुष मागचें सर्व विसरतात. दुष्यंतराजा येवढा खराना, पण त्यानें शकुंतलेला कसें फसविलें तें. बरें तर बरें, आकाशवाणी नसती झाली तर तिची काय गत झाली असती ? तेव्हां पुरुषांवर भरंवसा बायकांनीं कध्धीं कध्धीं ठेवूं नये.

**शूरसेन**–पण मी वचन देतोंना ?

**पार्वती**–वचनावरती तरी काय भरंवसा ? कितीकांनीं वचन दिलें आहे, आणि पुढें तें मोडलें आहे ? वचनांत खरेंपण नाहीं. अगोदर सर्व कबूल केलें आणि पुढें कानावर हात ठेविले ह्मणजे झालें ! असल्या पुरुषाचें बायकांनीं मग काय घ्यावें ? तेव्हां नुसत्या वचनावर निदान माझा तरी विश्वास बसत नाहीं.

**शूरसेन**–असें करूं नको प्रिये !

**आर्या** (गीति)

**अढळ प्रेम असे हें खोटें इतरांपरी नसेच पहा ।**
**निष्ठुर कां गे ऐशी–सायक[2] मारी अनंग[3] निष्कृप[4] हा ॥**

मजवर विश्वास ठेव. मला काय पीडा होत आहे ती पहा, आणि कांहीं तरी दया कर. हा दास तुझ्या चरणीं अक्षयीं रत आहे, याची जर तूं आतां उपेक्षा केलीस तर मरतोच पहा ! हाय ! हाय !

---

१ प्रीति. २ बाण. ३ काम. ४ निर्दय.

### श्लोक.

बाणांहीं मदन करी प्रहार[1] भारी
त्याचा हा अतिशय ताप तूं निवारीं
कंठीं या निजभुजहार[2] गार घालीं
सेवूं दे अमृत-जीववीं[3] च कालीं ॥

**पार्वती**–हें पाहिलें ना? पुरुष बायकांना कसे मोहवितात तें! पण मी अशा वचनांवर नाहीं भरंवसा ठेवायाची! विश्वास पटेल, असें कांहीं मला पाहिजे. ही द्या पाहूं आपल्या हातांतली आंगठी.

**शूरसेन**–हा माझ्या कर्मा! मला देतां येत नाहीं तीच तूं मागितलीस, आतां काय ह्मणावें?

**पार्वती**–कां बरें देतां येत नाहीं?

**शूरसेन**–पिढयान् पिढीची आहे, ती घरांतून जाऊं देत येत नाहीं.

**पार्वती**–घरांतून जाऊं द्यायाची नाहीं! समजलें! मला दिली ह्मणजे घरांतून बाहेर गेली! झालें, येवढा वेळ खरें प्रेम खरें प्रेम ह्मणून ह्मटलं तें हेंच. गांधर्वविवाहाची साक्ष ह्मणून मागितली! मी नको असेन तर नका देऊं.

**शूरसेन**–एकूण सर्व या आंगठीवर येऊन बसलें तर. असा हट्ट करूं नको.

**पार्वती**–आतां पहा कसा चमत्कार तो! माझें तनमन सर्व मागणार, आणि येथें एक हातांतली आंगठी सुद्धां देववत नाहीं. आपणच मला शिकविलें. आपणाला आंग-

---

१ घाय. २ आहळे भुज हाच हार. ३ वाचीव.

ठी देववत नाहीं, आणि मला आपलें मन देववत नाहीं. झालें तर! पुढें आतां कांहीं उरलें नाहीं.

**शूरसेन**—काय करावें? बायका हट्ट घेऊन बसल्या ह्मणजे पुरुषांचें कांहीं चालत नाहीं. हे सुंदरी,

### श्लोक.

घे आंगठी—घे तनु आणि चित्त।
वाहीं तुला मी गृह—सर्व वित्त!॥
हा दास सेवी तव पादपद्मा[1]।
मातें वरीं विष्णुसि जेंवि पद्मा[2]॥

**विधवा**—[आंतून] अगे बये, अझून गे काय खोलींत करिते आहेस?

**पार्वती**—अगबाई! आई इकडेच आली! तिला अझून मीं सांगितलें नाहीं.—आतां यावेळीं जा, आणि मध्यरात्रींच्या सुमारास फिरून या, आणि या खिडकीवर थाप मारा; ह्मणजे मी आंत तुह्माला येऊं देईन. त्यावेळीं गांधर्वविवाह होईल, पण घटकेवर येथें राहूं नका, आणि कांहीं बोलूं नका, याचें कारण आज मी सांगत नाहीं, तेव्हां आपण हा विवाह प्रसिद्ध कराल तेव्हां ही आंगठी आपली आपणाला परत देतेवेळीं तें मी आपणाला सांगेन. ही आपली मजजवळ खूण राहिली. रात्रीं मीही आपल्या बोटांत एक आंगठी घालीन ती माझी आपणाला आठवण करील. यावेळचें वचन दिलेलें आणि हा पाणिग्रह लक्षांत ठेवा बरें. नाहींतर आपलें काम झालें ह्मणजे मग सर्व विसराल. आतां जा.

**शूरसेन**—हे प्रिये!

---

[1] पाय हेंच कमल त्यास. [2] लक्ष्मी.

आर्या [ गीति ]

करगत[1] तुजला करुनी भोगी मी सौख्यसार[2] नाकींचें[3] ।
स्त्रीसुख सार गमे मज जगतीं सारें असार बाकीचें ॥

[ जातो. ]

**पार्वती**—पहा चमत्कार काय तो ! स्वर्गींचें सुख हातीं आलें असून त्याचा त्याग करावा, आणि दुसरेंच स्वर्गसुख मानावें. पण स्वर्गींचेंच सुख मी त्याला देणार. देवा, या माझ्या कपटाची क्षमा कर. माझा हेतु मनीं आण, ह्मणजे झालें ! असो आईनें जसें होईल ह्मणून सांगितलें होतें, तसें सर्व झालें. कामिपुरुषाची कृति एकूण ऐथून तेथून सारखीच. माझ्याशीं विवाह करीन ह्मणून म्हणाला, पण मी कोठें त्याच्याशीं विवाह करणार ! एकीचे धिंगाडे झाले, तसे माझे होणार ! नको ग बाई ! देवा अशाशीं माझी गांठ नको घालूं. आज मीं हें कपट केलें, खोटें बोललें, याचें मला किती वाईट वाटतें बरें ? पण याच्या योगानें बिचारीचा संसार एकदाचा थाराला लागो ह्मणजे झालें. किती पण पुरुष लबाड बरें ? [जाते.]

---

## प्रवेश ३.

### स्थळ.—पांडुरंगपुरकरांचें शिबिर.

**विजया नगरचे दोन सरदार आणि दोन तीन शिपाई येतात.**

**१ सरदार**—त्यांच्या आईचें पत्र आलें होतें तें त्यांना दिलें काय ?

---

१ हस्तगत. २ सुखाचें सार. ३ स्वर्गातलें.

**२ सरदार**–हो, दोन घटका झाल्या, दिलें. तें पत्र वाचून ह्यांचें मुख खरदिशीं उतरलें. मग आंत मजकूर काय होता कोण जाणे?

**१ सरदार**–असली चांगली बायको टाकली, ह्मणून आईनें त्याला फार बोल लावला आहे.

**२ सरदार**–शूरसेन म्हणजे महाराजांना पोटच्या पोराप्रमाणें. त्याचें कल्याण करण्याला कधीं मागेंपुढें पाहणार नाहींत, अशाचा त्यांनीं आपणांवर कोप ओढवून घेतला! हा कधीं कमी होईल काय?–मी दुसरी एक गोष्ट तुम्हाल सांगतों, पण ती तिसऱ्याच्या कानावर जातां कामा नये हो.

**१ सरदार**–त्याविषयीं अगदीं संशय नको. या कानानें जी गोष्ट ऐकिली ती या तोंडावाटें कधीं निघायाची नाहीं.

**२ सरदार**–त्यानें येथील एका तरुण कन्येस चांग फसविलें. तिला नाहीं नाहीं त्या थापा देऊन आज तिचें सत्व हरायाला गेला आहे! स्वारींनीं आपली पिढ्यान् पिढीची आंगठी देऊन टाकिली!

**१ सरदार**–काय म्हणावें तरी काय याला? देव तरी असें कसें सहन करितो? आम्ही असे पातकी, आम्हांस जाळून कसा नाहीं टाकीत त्या क्षणींच?

**२ सरदार**–लोकांना वाटतें देव निजला आहे, पण तो निजला नाहीं. जेव्हां एकदाच उटें काढतो, तेव्हां समजून येतें. आपल्याच तोंडानें त्यानें मला हें आपलें कर्म सांगितलें.

**१ सरदार**–आणि सांगतांना लाज नाहीं कशी वाटली? तर मग आज रात्रीं त्याची आमची गांठ नाहीं पडायाची?

**२ सरदार**–तसें नाहीं कांहीं. मध्यरात्र उलटून गेल्यावर दोन घटिकांनीं तो परत येईल.

१. **सरदार**–आला ह्मणजे बरें होईल. कारण आपल्या पदरीं त्यानें मनुष्य बाळगिला आहे, त्याच्या भ्रमाचा आज भोपळा फुटणार आहे, तेव्हां **शूरसेन** जवळ असला म्हणजे बरें पडेल. त्याचा त्यासच चमत्कार वाटेल, असला कवडीमोलाचा मनुष्य आपल्या मर्जींत कसा उतरला.

२ **सरदार**–तेव्हां तो येईपर्यंत, आपण याचें नांवच घेऊं नये कसें. तो असल्यानें गंमत अधिक होईल.

१. **सरदार**–बरें तें असो. या लढाईचा शेवट काय होणार, हें तुम्हाला कळलें काय?

२ **सरदार**–मी ऐकिलें कीं यवनांनीं तहाचें बोलणें लावलें आहे.

१. **सरदार**–लाविलेंचसें काय, तह झाला!

२. **सरदार**–मग आतां शूरसेन काय करणार? परत जाणार, किंवा दुसरीकडे कोणीकडे जाणार?

१. **सरदार**–एकूण तुमचें आणि त्याचें फारसें रहस्य नाहीं?

२ **सरदार**–देव करो आणि न होवो! कारण मग त्याची आमची सर्वच गोष्टींत सांगड व्हावयाची.

१. **सरदार**–त्याची पत्नी दोन महिने झाले जनस्थानास जातें म्हणून घरून निघाली. तेथें तिनें कडकडीत तपश्चर्या चालविली, पण तिचें शरीर नाजूक आणि मनामध्यें ही व्यथा तेव्हां तिचा लवकरच अंत झाला!

२ **सरदार**–हें खरें कशावरून?

१ **सरदार**–पहिला भाग तर तिच्या पत्रांवरूनच कळला. मरणाचा वृत्तांत मात्र तेथील एका गोसाव्यानें कळविला.

२ **सरदार**–हा सर्व मजकूर जहागीरदारास कळला आहे काय?

**१ सरदार**—नाहीं, अझून कळविला नाहीं. भलत्याच वेळीं कळवूं नये.

**२ सरदार**—कां बरें? हा मजकूर ऐकून त्यांना आनंदच होईल.

**१ सरदार**—कितीकवेळ बरें आपलें खरोखर नुकसान होतें, परंतु आपण यांतच समाधान मानूं.

**२ सरदार**—आणि उलटही प्रकार पुष्कळदा आढळतो. डोळ्याळा पाहिजे तितकें पाणी आणि मनांत तर आनंद कीं आज आपणाला डल्ला सांपडला. तो आसवांनीं तरि पचविला पाहिजे.—असो, येथें त्यांनीं चांगली कीर्ति मिळविली, पण घरीं दुष्कीर्ति त्याची वाट पहात बसली आहे. त्याची बायको सुटली बिचारी!

**१ सरदार**—प्रत्येकाचा आचरणपट बहुत करून काळ्या पांढऱ्या धाग्यांनीं विणला असतो. शुद्ध पांढऱ्या धाग्यांनीं असा थोड्यांचाच! असें आहे ह्मणूनच कांहीं बरें आहे. कारण धागे सर्वच पांढरे असते तर मनुष्य किती गर्विष्ट झाला असता, व सर्वच काळे असते तर मग कांहींच थारा राहिला नसता.

[ सेवक येतो. ]

कायरे कसें काय? तुझे धनी कोठें आहेत?

**सेवक**—त्यांची आणि राजाची आतांच गांठ पडली. शूरसेन महाराजांनीं त्यांचा निरोप घेतला. महाराजांनींही त्यांजबरोबर विजयानगरच्या महाराजाना पत्र दिलें आहे.

**२ सरदार**—खुशाल खुशालीचें केवळ नसलें तर त्याची आज जरुरी आहेच. कारण तेथें ताट वाढून ठेवलें आहे.

[ **शूरसेन** येतो. ]

१ **सरदार**–असें खरेंच. महाराजांचा कोप शांत होईल हा संशयच! हे आले पहा, कसें काय शूरसेन महाराज? मध्यरात्र उलटून गेली, नव्हे? येवढा वेळ कोणीकडे होता?

**शूरसेन**–आज मला सत्रा कामें होतीं, तीं सारीं उरकून हा इकडेच आलों. महाराजांची गांठ घेतली; त्यांच्या आप्त सोयऱ्यांस भेटून आलों; गांवच्या संभावित लोकांच्याही गांठी घेतल्या; पत्रें लिहायाचीं होतीं तीं लिहिलीं, आणि दुसरीं ही पुष्कळ कामें केलीं—बरें तें एक काम आटोपून टाकूं द्या.—त्या मूर्खाला आणवा, आणि त्याचें आणि ह्या शिपायांचें भाषण ऐकूं द्या. गुलामानें मला चांगलें फसविलें.

२ **सरदार**–जारे! आणा त्याला. [ शिपाई जातत. ] आज स्वारीला रात्रभर खोड्यांतच अडकविलें आहे.

**शूरसेन**–कांहीं हरकत नाहीं. फार दिवस तोंडा अडकविला होता, तेव्हां त्याचें प्रायश्चितच हें! कांहीं त्याची गुर्मी जिरली कीं नाहीं.?

१ **सरदार**–जिरली ह्मणजे काय पुसतां? अगदीं जिरली. एखाद्या सासरीं जाणाऱ्या मुलीप्रमाणें मुळमुळ एकसारखा रडतो आहे. आठवणीपासून तें खोड्यांत पडेपर्यंत आपल्या आयुष्याचा त्यानें सर्व पाडा मार्तंडरावाजवळ वाचून दाखविला. काय काय त्यानें सांगितलें, तें पुसूंच नका.

**शूरसेन**–मजविषयीं तर नाहीं ना कांहीं सांगितलें?

२ **सरदार**–तो जें जें ह्मणाला तें तें मार्तंडरावांनीं उतरून ठेविलें आहे. त्याची जबानी त्याला आपल्या समक्ष वाचून दाखविणार आहेत. आपलें ही तींत नांव गोंविलें आहे. मुकाट्यानें सर्व ऐकून घेतलें पाहिजे.

[ शिपाई वाचालाला घेऊन येतात. ]

**शूरसेन**–लबाड नाहीं तर ! याचे डोळे बांधले आहेत. माझें काय बरें हे सांगणार !

**१ सरदार**–हे राजे आले !—नेटा चापाकारा गे !

**१ शिपाई**–आमचे सेनापति ह्मणतात तुला चाप लाविले पाहिजेत, आणि मरे मरे तों मार दिला पाहिजे, तेव्हां तूं सर्व सांगशील. तर बऱ्या बोलानें अगोदर सांगतोस कीं नांहीं का कणीक तिंबली पाहिजे, बोल.

**वाचाल**–सांगतों बाबा, सर्व सांगतों. पण मारूंबिरूं नका. कणीक तिंबायाला लागाल तर माझें तोंड बंद झालेंच ह्मणून समजा.

**१ शिपाई**–कारको चिमरका !–

**२ सरदार**–जयरना हापडह्ला रावे टारगे !

**१ शिपाई**–आमचे सेनापति दयाळू खरे. ते ह्मणतात मी या कागदांत लिहिलेले तुला प्रश्न केले ह्मणजे त्यांचीं तूं उत्तरें दे.

**वाचाल**–देतों, सारीं देतों, पण मला मारूं मात्र नका.

**१ शिपाई**–“ राजाजवळ घोडेस्वार किती आहेत ? ” सांग पाहूं याचें उत्तर.

**वाचाल**–असतील पांचसहा हजार. पण त्यांत अर्थ काय आहे ? कांहीं कामाचे नाहींत. त्याच्यावरचे सेनापति आहेत ते तरी झाडून सारे लबाड, एकमेकांत फाटाफूट. ही बातमी खरी आहे. आतां सोडतांना मला ?

**१ शिपाई**–तुझें उत्तर असेंच ठेऊं ना लिहून ?

**वाचाल**–होय होय. मी का भिणारा आहें ? हवी ती शपथ घेतों पाहिजे तर.

**शूरसेन**–[ एकीकडे ] गुलामाला शपथ घेणें न घेणें सारखेंच आहे. कमाल केली बोवा !

**१ सरदार**–[ एकीकडे ] छेः ! छे ! असें ह्मणूं नका. हे वाचालराज ! सर्व शस्त्रास्त्रांचें ज्ञान ह्मणजे यांच्या हाताचा मळ. असले वीर, आणि त्यांना असें ह्मणायाचें. ठीक !

**२ सरदार**–( एकीकडे ) स्वारीची तरवार कशी लख-लखीत ! आणि वस्त्रें कशीं व्यवस्थित; माझी सुद्धां नजर पहिल्यानें चकली !

**१ शिपाई**–हें लिहिलें उत्तर.

**वाचाल**–पांचसहा हजार ह्मणून मी ह्मटलें वरें.–खरें सांग-तों–सुमारें पांचसहा हजार असें लिहा बरें-खरें सांगितलें पाहिजे.

**१ सरदार**–(एकीकडे) त्याचा अजमास बरोबर आहे अं ! पण—

**शूरसेन**–[ एकीकडे ] अंः, त्यांत काय आहे ?

**वाचाल**–ते सारे लबाड आहेत, असें लिहा अं !

**१ शिपाई**–हो, लिहिलें.

**वाचाल**–खरें तें खरें. खोटें कशाला सांगावें ? लबाड कोठले !

**१ शिपाई**–" त्यांचें पायदळ एकंदर किती आहे, आणि प्रत्येक पथकांत किती किती आहे."

**वाचाल**-थोडा विचार करूं द्या. खरें सांगितलें पाहिजे– नाहींतर तुह्मी प्राण द्याल एखादा. थोडे दम धरा हं ! त्या नसतेरावाच्या पथकांत दीडशें, सदाशिवराव भाऊच्या पथकांत तितके, चिंतामणिरावाच्याजवळ तितके, जनोबा-च्या तितके; नाकरे, घाडगे, घोलप यांच्याजवळ प्रत्येकीं अडीचशें; तसेंच माझ्या पथकांत, चिदंबर, सुब्रह्मण्य, कामे-

श्वर यांच्या पथकांत प्रत्येकीं तीनशें; तेव्हां सर्व मिळून आणि बाजारबुणगें धरून दहाबारा हजारांची येईल बेरीज. पण इतके अंगांत पाणी कीं तोंडावरची माशी उडायाची नाहीं.

**शूरसेन**–( एकीकडे ) आतां पुढें याचें काय करायाचें.

**१ सरदार**–(एकीकडे) काय करायाचें? सोडून द्यायाचें. ( हळूच शिपायास ) त्याला मजविषयीं माहिती विचार आणि माझें राजाजवळ वजन किती आहे तेंही विचार.

**१ शिपाई**–बरें, हें लिहिलें. आतां हा प्रश्न ऐक–"दौलतराव म्हणून विजयानगरचा एक सरदार आला आहे तो यांत आहे काय? त्याचें वजन राजाशीं कितपत आहे? त्याचें शौर्य, युद्धकौशल, आणि खरेपणा यांविषयीं तुला काय माहीत आहे? त्याला लांच देऊं केली तर तो राजापासून फुटेल कीं नाहीं?"–सांग, प्रत्येकाचें उत्तर दे.

**वाचाल**–एकदम सर्व प्रश्नांचें कसें उत्तर देतां येईल? एक एक विचारा म्हणजे सांगतों.

**१ शिपाई**-दौलतरावाला तूं ओळखतोस काय?

**वाचाल**–होय, ओळख आहे तर! हा संग्रामपुरास कुंभाराच्या येथें चाकरीला राहून गाढवें वळीत होता. तेथें जवळच एका पाटलाची नवरा मेलेली पोर राहत होती. तिला यानें फुस लावलें, आणि मग जेव्हां तिला कांहीं दिवस राहिले तेव्हां स्वारी तेथून जी पळाली ती विजयनगरास आली.

**१ सरदार**–**दौलतराव**–त्याला मारायाला हात उचलतो.

**शूरसेन**–( एकीकडे ) हं हं! हें काय? त्याच्या जिभेला हाड नाहीं हें खरें, तरी पण!–

**१ शिपाई**–बरें, हा दौलतराव पांडुरंगपुरकरांच्या सैन्यांत आहे काय?

**वाचाल**–होय आहे, आणि फार आळशी.

**१ सरदार**–(एकीकडे) मजकडेच कां पाहतां? आपली ही पाळी याावयाची आहे.

**१ शिपाई**–त्याचें वजन राजापाशीं कितपत आहे?

**वाचाल**–त्याचें हो कसलें वजन? माझ्या हाताखालचा म्हणून तर राजाला माहीतच आहे. राजानें परवां मला लिहिलें होतें कीं त्याला हाकून द्या म्हणून. तें पत्र माझ्या खिशांत असेल सुद्धां.

**१ शिपाई**–बरें तर पाहूं तुझ्या खिशांत आहे कीं नाहीं तें?

**वाचाल**–खरेंच पुसाल तर आठवण नाहीं. खिशांत असेल, नाहींतर शिबिरांत दप्तर राहिलें आहे, त्यांत राजाचीं दुसरीं पत्रें ठेविलीं त्यांत असेल, किंवा न जाणों खिशांतून गळून सुद्धां पडलें असेल.

**१ शिपाई**–हें पहा, तेंच हें पत्र. वाचून दाखवूं तुला?

**वाचाल**–मला ठाऊक नाहीं, तेंच तें कीं नाहीं तें.

**शूरसेन**–(एकीकडे) आपला दुभाष्या काम चांगलें चालवितो, अं!

**१ सरदार**–(एकीकडे) चांगलें पण किती ह्मणून सांगूं?

**१ शिपाई**–[ वाचतो ]

ग पार्वती ! हा सरदार भोळा,
पैकेकरी तूं करिं अर्थ गोळा।

**वाचाल**–अहो हें नव्हे राजाचें पत्र. हें पांडुरंगपुरच्या एका स्त्रीला मीं पत्र लिहिलें आहे. त्यांत तिला असें सांगण्याचा माझा हेतु होता कीं शूरसेन ह्मणून एक लुच्चा तरूण सरदार आहे, त्याच्या तूं नादीं लागूं नकास. तें पत्र जेथल्या तेथें ठेवा बरें.

१. शिपाई—नाहीं, तें मी वाचतोंच.

वाचाल—भलतासलता त्याचा अर्थ नका करूं अं. मी भोळ्या भावानें तिला जागी करणार होतों. तो कसला लबाड शूरसेन! चांगली कोणी बायको पाहिली कीं नाहींच तिला राहूं द्यायचा. तो साध्वींचा केवळ काळ! म्हणून त्याच्या बोलण्यावर जाऊं नको असें मी तिला सांगणार होतों.

शूरसेन—[ एकीकडे ] गुलाम! सर्वांच्या डोक्यावरून हात फिरविणार!

१ शिपाई—[ वाचतो ]

गे पार्वती! हा सरदार भोळा,
पैकेकरी तूं करिं अर्थ गोळा ॥
वाहील आणा, धन माग तेव्हां,
दे ना कपर्दी, वश होशि जेव्हां ॥ १ ॥
अर्धीच होई वश तूं तया गे,
होतां पुरी, काय मिळेल सांगें?
जें पाहिजे माग तयास आधीं,
मागून दे ना तव कार्य साधीं ॥ २ ॥
त्याला असें सांग "अरे निसंगा!
लावूं नको हात मदीय अंगा."
भोळा असे, घे पिळुनी तयाला,
वाचाल ऐसें विनवी प्रियेला ॥ ३ ॥

शूरसेन—[ एकीकडे ] कोरडे पाठीवर मारून याला या लष्करांतून हाकून दिलें पाहिजे. काय गुलाम हरामखोर! [ स्वतःशीं ] याची प्रिया अं!

२ सरदार—[ एकीकडे ] छेः! छेः! असें कसें होई-

ल ? हे वीरांतले वीर ! दहा हजारांना भारी; ह्यांना असें ह्मणावें काय ?

**शूरसेन**—[ एकीकडे ] मला सर्व कांहीं खपेल, पण असला निमकहरामपणा नाहीं खपायाचा. मात्रागमनी कोठला ? [ स्वत:शीं ] पार्वतीला असें पत्र लिहिलें !

**१ शिपाई**—आमच्या सेनापतीच्या चेहऱ्यावरून तर असा रंग दिसतो कीं तुला कांहीं ते वाचवीत नाहींत.

**वाचाल**—नाहीं, कसेंही करा, पण मला वाचवा. मला मरणाचें फारसें वाटत नाहीं, पण आजपर्यंतचे सर्व दिवस संसारांतच गेले. हरिभजन कांहींच झालें नाहीं. तेव्हां राहिलेसाहिले दिवस त्यांत घालवावे, असा मानस आहे. तेव्हां कृपा करा आणि येवढें मला जीवदान द्या. मग पाहिजे तेथें जरी ठेविलें तरी हरकत नाहीं, अंधारकोठडींत ठेवा, पायांत अक्षयी खोडा ठेवा, मजकडून ना नाहीं. वाचवा मात्र.

**१ शिपाई**—पाहूं याचा मग विचार; पण आधीं सर्व इत्थंभूत माहिती सांगितली पाहिजे. या दौलतरावाविषयीं आणखीं कांहीं प्रश्न विचारतों, त्यांचीं उत्तरें दे. त्याचें वजन राजापाशीं किती आहे, आणि त्याचें शौर्य कितपत आहे, हें तूं सांगितलें. आतां त्याच्या खरेपणाविषयीं तुला काय माहिती आहे ?

**वाचाल**—खरेपणा ? जळला त्याचा खरेपणा ! देवापुढें ठेवलेले पैसे चोरायाला कमी करणार नाहीं, मग आणखीं तें काय सांगूं ? कटिशूळाची व्यथा किती ती कांहीं पुसूंच नका. आपपर याचा कांहीं विचारच नाहीं. खरें आणि खोटें यांत तर त्याला भेदच दिसत नाहीं. बरें इतकें अ-

सूनही सुरेचे तर भक्त केवढे ह्मणून पुसूंच नका. एकदां झोंकली ह्मणजे ब्रह्मानंदीं लागे टाळी, मग देहाची कोणाला शुद्धि आहे? अशा स्थितींत त्यांना आत्मा आणि जग भिन्न नाहींच दिसत. आणखी कांहीं बाकी उरली आहे?

१ **सरदार**–[एकीकडे] एकूण यानें तर आज बहार उडवून दिली बोवा!

**शूरसेन**–[एकीकडे] आग लागो त्याच्या बाहरीला! माझ्या दृष्टीसमोर नको हा लबाड. कोणत्या नक्षत्रावर जन्मला होता कोणाला ठाऊक?

१ **शिपाई**–बरें, युद्धांत त्याची प्रवीणता कितपत आहे

**वाचाल**–प्रवीणता? हो–नाहीं ह्मटलें तर तमाशांत डफ वाजविला आहे तेव्हां त्यावरून पटह, भेरी वगैरेंची माहिती किती असेल, त्याचा करून घ्या अदमास. आपणाला खोटें कधीं सांगायाचें नाहीं. खोटें सांगून कोणीं घ्यावें पाप माथीं मारून?–दुसरें, आमच्या शहरांत नाटक झालें होतें त्यावेळीं यांना दिलें होतें एकदां राक्षसाचें सोंग. त्यावेळीं यांनीं आपल्या "अलल"नीं आणि "प्रधानजी"नीं सर्व रंगभूमि दणाणून टाकली होती—इतकी यांची युद्धांत प्रवीणता.

१ **सरदार**—[एकीकडे] आजपर्यंत पुष्कळ व्यक्ति पाहिल्या, पण त्या सर्वांत यांची कोटी विशेष! खरेंच या पृथ्वीच्या पाठीवर कोणकोणतीं रत्नें आहेत हें कोणाला माहीत? ही ब्रह्मदेवाची अपूर्व सृष्टि पाहण्यांत आली हें आमचें भाग्यच!

**शूरसेन**—[एकीकडे] काय गुलामाची जीभ आहे?

**शिपाई**—त्यांच्या गुणांची इतकी तूं तारीफ केलीस,

तेव्हां आतां पुसायालाच नको तो लांचेनें वश होईल कीं नाहीं तें.

**वाचाल**--अहो तें काय सागूं?—एका छदामाच्या आशेनें मागाल तें देईल! मग देव नाहीं आणि धर्म नाहीं.

**१ शिपाई**—बरें त्याजविषयीं पुरे. त्याचा बंधु जनको. जीराव त्याजविषयीं आहे तुला कांहीं माहिती?

**२ सरदार**—मजविषयीं कां बरें यानें विचारिलें?

**१ शिपाई**—तो कोण आहे, हें आहे तुला ठाऊक

**वाचाल**—अहा एक्याच माळेंतले मणि! कांहीं उजवा डावा असा प्रकार असलाच तर वाईटांत वडील बंधूवर यांची ताण! भेकडपणांत ही तसेच! लढाईंतून पळ काढायाचा असला तर स्वारी एका पायावर तयार, आणि शत्रूवर हल्ला करायाचा असला, तर घेतलीच लोळण!

**१ शिपाई**—तुझा जीव वाचविला तर पांडुरंगच्या राजाला करशील आमच्या स्वाधीन?

**वाचाल**—हो! हो! आणि पाहिजे तर घोडेस्वारांचा सेनाधिपति शूरसेन त्यालाही हस्तगत करून देईन.

**१ शिपाई**—मी एकीकडे विचारतों तर आमच्या सेनापतीला, आणि त्यांची काय मर्जी होईल ती कळवितों.

**वाचाल**—[एकीकडे] झालें! आज कानाला खडा लावला! पुनः पटह बिटह आणायाला जाईन तर शपथ. जळोत ते सारे पटह, आणि त्या भेरी! नसतें अंगीं शौर्य दाखविण्याकारितां, आणि त्या उल्लू पोराच्या चिथावणीवरून मीं हा आपल्या पायावर धोंडा मारून घेतला. पण जेथें यांनीं मला कैद केलें, ती दग्याची जागा आहे असें कोणाला तरी वाटलें असतें काय?

१ शिपाई—माझा उपाय हरला बोवा! सेनाधिपति कांहीं ऐकतना. ते ह्मणतात आज तूं आपल्या सेनेला दगा देणार, उद्यां आम्हाला कां नाहींस देणार! चांगल्या चांगल्या लोकांची तूं अब्रू घेणार! तेव्हां तुला या जगांत नाहीं राहूं देतां येत. चल, कर तयारी. घे देवाचें नांव! हं, काय पाहतोस मांगा, उडीव याचें डोकें.

वाचाल—अहो वाचवा! हो वाचवा! निदान उघड्या डोळ्यांनीं तरी माझा प्राण जाऊं द्या.

१ शिपाई—त्याला कांहीं हरकत नाहीं! हे तुझे डोळे मोकळे केले! चल, घे शेवटचा निरोप आपल्या—मित्रांचा! [ डोळे मोकळे करितो.] बघ! आहेत का कोणी येथें तुझ्या ओळखीचे?

शूरसेन—राम राम! सेनापतिराव!

२ सरदार—ठीक आहेना, वाचालराज!

१ सरदार—कसें काय? सेनापतिसाहेब? आज खूप बहार मारिली!

२ सरदार—सुव्रताला कांहीं निरोपविरोप? आम्ही एकदोन दिवसांत जाणार विजयानगराला.

१ सरदार—कायहो वाचालराज! आमच्या शूरसेन. महाराजांच्या तर्फे पार्वतीला आपण कविता पाठविल्या, त्यांची नक्कल द्याल का आह्माला? आह्मी भेकड पडलों ह्मणून. नाहीं तर गुद्दे मारून घेतली असती! बरें आहे. आम्ही घेतों आपला निरोप. [ शूरसेन, सरदार वगैरे जातात.]

१ शिपाई—आज तुमचें सर्व भांडवल फुटलें! पण ऐट नाहींहो टाकतां कामाची!

**वाचाल**—असा कट केला तर कोणाची नाहीं फजिती उडणार?

**१ शिपाई**—अरे गृहस्था! इतकी फजिती उडाली तरी जीव ठेवलास, तेव्हां काय ह्मणावें? बायका रे सुद्धां तुझ्या तोंडावर थुंकतील. जा—कर काळें कोठें तरी. आम्हीहीं विजयनगरास जाणार, तेथें पटहाची ही गोष्ट सांगू सर्वांना. येतों, राम राम! [जातो.]

**वाचाल**—आहे तें ठीक आहे जर का आमचें मन मोठें असतें तर ही फजिती पाहवतीचना. केव्हांच दिला असता प्राण! सेनापतिसेनापति आतां सर्व सोडून दिलें पाहिजे! पण खाणें, पिणें, निजणें यांत तर कांहीं कमी नाहीं? जिवंत आहे हें काय कमी आहे? वाचूं तर खरें. बढाईखोरानें हें अक्षयी लक्षांत ठेवावें, आज नाहीं उद्यां, केव्हां तरी आपली टर उडायाचीच! ही तरवार, ही ढाल या सर्वांना आह्मी आतां करितों राम राम. बाबा वाचाला! वाचलास हें काय थोडें झालें, फजिती झाली येवढेंचना? अं:, त्यांत काय आहे? आजपर्यंत वेडेचार केलस, फसलास! त्याची खंत नको बाळगूं. देवानें कुडींत प्राण घातला आहे तेव्हां अन्न आणि वस्त्र याची कोठें तरी योजना करून ठेविलीच असेल! आपण यांच्या मागोमाग जावें हेंच बरें. करतील तर तेच कांहीं तजवीज करतील! [जातो.]

---

## प्रवेश ४.

### स्थल—पांडुरंगपुर-विधवेच्या घरांतील एक खोली.

[ जानकी, विधवा, आणि पार्वती येतात. ]

**जानकी**—मी तुह्माला फशीं पाडिलें नाहीं याबद्दल

पाहिजे तर आमच्या महाराजांची हमी देईन. माझें कार्य यथासांग व्हावयाला त्यांचें दर्शन घेतलें पाहिजे, आणि तुह्मीही मजबरोबर आलें पाहिजे. एकदा त्यांची माझ्या हातून थोडीशी सेवा घडली, ह्मणून त्यांनीं मला आपली कन्या म्हटलें आहे. महाराजांची स्वारी हल्लीं मुधोळास आहे ह्मणून मला कळतें आणि आपणालाही तेथें जाण्याला चांगली सोबत मिळाली. मी मेलें असा सर्वांचा समज झाला हें आहेच तुह्माला माहीत. तह झाला, तेव्हां जिकडचे तिकडे लोक जातीलच; त्यांत माझा पतिही जाईल, आणि मी मेलें असें त्याला कळलें आहे तेव्हां घरींच जाईल. देवाच्या दयेनें आणि महाराजांच्या कृपेनें परिणामीं सर्व गोड होईल. भाव मात्र धरिला पाहिजे.

विधवा—बाई! तूं जें जें कांहीं आम्हाला सांगशील तें तें करण्याला आम्ही राजी आहों बरें. असे सेवक पाहूं गेलीस तरी मिळणार नाहींत.

जानकी—सेवक कसले? तुह्मीं मजवर मोठे उपकार केले, यांची फेड मला करितां येईल कीं नाहीं कोण जाणे! तुमच्या कन्येनें मला पति द्यावा, आणि मींही तिला द्यावा असा ईश्वराच्या घरचा नेमानेम असावा, असें मला दिसतें तुह्मी इच्या लग्नाविषयीं कांहीं काळजी करूं नका. इला योग्य असा पति मी देववीन. पण पुरुषांचा हा चमत्कार नव्हे काय! कीं फसलें असतां त्यांस कळूं नये. पण त्यांचा हा चमत्कार नव्हे. कारण हे दयाळे—

श्लोक.

देते जी बहु ताप भर्तृ[1]नयनां काडी जशी, कामि[2]नी

१ पतीच्या डोळ्यांना. २ स्त्री.

ती कैशी सुखेंदा पतीस गमते? ही त्वत्कृती यौमिनी।
कामें जो चकला असे नर तया मोहांत तूं घालिशी
घेऊं सर्प ह्मणे तया अँहिमिषें हारास देशी कशी॥

अगे पार्वती! एकदां तू मजकरितां लबाडी केलीस, आणखीं एकदां तुला करावी लागेल.

पार्वती—तूं सांगशील, तसें करीन. मग कांहींही होवो. झालेंना?

जानकी—सांगेन काय करायाचें तें. दम असला पाहिजे,

श्लोक.

वसंत येईल फुटेल पालवी,
कळ्याफुलें येतिल तापतां रवी।
फळें धरूनी लवतील हे तॅरू,
मनःपिका? खंत नको नको करूं॥

चला, आपलीं घोडीं तयार आहेत. चला. अखेर साधली ह्मणजे झालें. परिणामीं गोड तें गोड! चला.

[ जातात. ]

---

## प्रवेश ५.

### स्थळ—वेणुग्राम—जहागीरदाराच्या वाड्यांतील एक खोली.

[ विनता, सुव्रत आणि वेश्या येतात. ]

सुव्रत—छेः! छेः! तसें कांहीं नाहीं! सर्व खेळ त्या रंगीबेरंगी वाचालाचे! जिकडे तिकडे गुलामाचा झकझकाट! ऐट काय पण! या गुलामानें सर्व बिघडविलें, नाहीं तर

१ सुख देणारी. २ तुझी कांति. ३ हे रात्रि. ४ सर्पाच्या मिषानें. ५ सूर्य. ६ वृक्ष. ७ हे मनरूपी कोकिला.

तुमची सून आज जिवंत असती, आणि तुमचा मुलगा घरीं असून त्यावर महाराजांची कृपादृष्टि असती! पण आतां काय त्याचें!

विनता—कुठला मेल्याचा पाय माझ्या घराला लागला! घराचें सर्व वाटोळें केलें! असली नक्षत्रासारखी आणि गुणाची पोर ती मारिली! पोटचीच्याबद्दल देखील हो मला इतकें दुःख झालें नसतें!

सुव्रत—खरेंच, पोर पण पोर! किती गोड तिचें आचरण!

वेड्या—व्हय! व्हय! गुळावाणी अकूशी! लई गुळचाट!

सुव्रत—हा गुलामा! आंबा आहे वाटतें?

वेड्या—अन् मला व काय ठावं? तुम्ही म्हंगाला ग्वोड, त्यंवा मला वाटलया काइ लाडूबिडू असतील म्हनुनशानी.

सुव्रत—काय रे तूं खरोखर तूं आहेस का मुद्दाम सोंग घेतलें आहेस वेड्याचें!

वेड्या—संमद्यांचीं स्वोंगंच हायतीं! दिसताती तसे का संमदे हायती कोनी शान्या मानसाचं सोंग घेतो, अन् असतो येडा; कोनी मिशाला पीळ देतो अन् ह्मगतो मला शिपाई ह्मना, अन् असतो तर ह्यपुसलिंगा; कोनी ह्मगतो माझी जातकुळी मोठी, मला ह्मना मोटा; अन् असतो कसा ह्मगाल तर करंटा, ल्हाना पक्शी ल्हान. संमद्यांनीं स्वोंगं घेतलीं तसं येड्याचं स्वोंग घेतलं हाये.

सुव्रत—हा मोठा धूर्त आहे बरें का?

वेड्या—अन् तुमच्याच पायाच्या पुन्याइन.

सुव्रत—घे हें तुला इनाम. पण मी कांहीं येथून तुला काढूं इच्छीत नाहीं हो. आजपर्यंत जेथें चाकरी केली तेथेंच अक्षयीं कर.

**वेड्या**–अकूशी कशी येईल करता.

**सुव्रत**–कां रे! यांची चाकरी सोडून जाणार आहेस वाटतें कोठें तरी? का हेच तुला सोडणार?

**वेड्या**–माझ्या कुटें हाये मनांतून जायचें? अन् ह्ये मला कस स्वोडतील?–पन् गेलंच पाहिजे.

**सुव्रत**–कां, तुला कोणी जबरदस्तीनें नेणार आहेत?

**वेड्या**–व्हय, तसाच कांहीं परकार. यमाचे चाकर येतील अन् ह्मंगतील चल बिगी बिगी, त्यंवा कोनाची न्हाइ पुन्हाई त्यांना न्हाइ ह्मंगायाची. त्यंव्हा तर जानं लागल.

**सुव्रत**–आतां पुरें कर. आमच्या घोड्यांच्या दाणापाण्याची सोय लाव जा. तेथें कांहीं खोडी करूं नको हो.

**वेड्या**–अन् मी कशाला स्वोड लावायला जाऊं? त्यांना जन्माच्याच असत्याती स्वोडी! [जातो.]

**सुव्रत**–फार धूर्त! लबाड, पण गमतीचा!

**विनता**–आहे खरा! त्याच्या मर्जीतला फार असे; यामुळें त्याला फूस सांपडली. अजून तरी त्याचें तोंड कांहीं कमी नाहीं, पण मोठा इमानी आहे. तेव्हां चालवून घ्यावें लागतें.

**सुव्रत**–नाहीं, अशीं माणसें एकदा गेलीं ह्मणजे मिळत नाहींत.—बरें तें असो. तुमची सून निवर्तली तेव्हां ह्मणणार होतों माझी मुलगी कराल का? शूरसेन आतां लवकरच परत येईल, तेव्हां याचा विचार झाला पाहिजे. महाराजांच्या मनांतून पूर्वींपासूनच हा जोडा जमवून आणायाचा होता, इतक्यांत जानकीबाईनें वर मागून शूरसेनास पति करून घेतलें. आतां आपली जानकीबाई गत झाली, तेव्हां ही गोष्ट आपण कबूल करावीच. महाराजांनीं मला

असें म्हटलें आहे कीं तुमच्या मुलीशीं शूरसेनानें लग्न लाविलें तर मागलें सर्व मी विसरेन. व याबद्दल ते आपणाजवळ गोष्टही काढणार आहेत. तेव्हां आपलें यावर काय ह्मणणें आहे ?

विनता–मजकडून कांहीं ना नाहीं. महाराजांना आवडलें तेव्हां मलाही आवडलें.

सुव्रत–महाराजांची स्वारी मुधोळाकडे आली आहे, तेथून येथें बहुतकरून उद्यां येईल. त्यांची आतां तरतरी अगदीं भरज्वानींतल्याप्रमाणें दिसून येते. हा प्रभाव पुंडरीक वैद्यराजांच्या औषधाचा ! अथवा असें कां ह्मणाना आपल्या जानकीबाईचा !

विनता–वरचेवर तिची आठवण होऊन मनाला फार वाईट वाटतें. असो ! ईश्वराची मर्जी ! महाराजांचे पाय आमच्या घराला या निमित्तानें तरी लागणार. मरायाचे अगोदर मला त्यांचें दर्शन होणार, हें आमचें पुण्यच समजायाचें. शूरसेनाकडून आजच जासूद आला होता, त्याच्या सांगण्यावरून तो बहुतकरून आज रात्रींच यावा. तेव्हां अशा प्रसंगीं आपण येथें रहावेंच.

सुव्रत–बरें तर. रहतों

[ वेड्या येतो. ]

वेड्या–बाईसाब ! बाईसाब ! त्ये आलतना–आपले बाळासाब ! अन् त्यांच्या मुसकटावर वार दिसतोया. पन् अजारी बिजारी न्हाइ काइ दिसत्यातां.

सुव्रत–मुखावर वार असणें हें वीरांना भूषण होय. त्यानें मोठें समरकृत्य केलें ह्मणून ऐकलें, तेव्हां त्याला केव्हां कडकडून भेटेन असें मला झालें आहे.

विनता—जारे वेड्या—गहिनीस सांग कीं निंबलोण त्या-जवरून उतरून टाक.

वेड्या—अन् संमद्यावरूनच उतरूनशनी टाकायला सांगूं का. त्येंच्याबरोबर लई शिपाई आलती, कन् संमदे कंसे पन येकापकशी येक फाकडे. [ जातात. ]

---

## अंक ४ था समाप्त.

# अंक ५ वा.

—•:※:•—

## प्रवेश १.

### स्थळ—मुधोळ. एक रथ्या.

[ जानकी, विधवा, पार्वती आणि दोन चाकर येतात. ]

**जानकी**—आपण दिवसरात्र कांहीं पाहत नाहीं. एकसारखें आपले चालत आहों ; यामुळें तुह्मी बाई अगदीं थकून गेलां असाल. पण येथें कांहीं इलाज नाहीं. मजकारितां तुह्मी इतके कष्ट घेतां, हे तुमचे उपकार कोठें फेडूं ? देव तसा दिवस दाखवील तर—

[ महाराजाचा एक वृद्ध सेनापति येतो. ]

या गृहस्थाच्या मनांत आलें आणि त्यानें आपलें वजन खर्च केलें, तर महाराजांची भेट व्हावयाला कांहीं अडचण पडणार नाहीं. कसें काय सेनापति ? आपलें बरें चाललें आहेना ?

**सेनापति**—हं ठीक आहे. पण मी तुला नाहीं ओळखलें.

**जानकी**—पण मी आपणाला दोनचारदां विजयानगरास महाराजांच्या वाड्यांत पाहिलें आहे.

**सेनापति**—असेल पाहिलें. मी येऊन जाऊन तेथें असतोंच.

**जानकी**—आपण सदय आहां आणि दुसऱ्याच्या कामीं चांगले पडतां अशी आपली कीर्ति या कानांनीं मी पुष्कळदां ऐकली आहे. मी अशी एकदम आपल्याकडे आलें याचा चमत्कार वाटूं नये. आपलें हें वय आणि ही सौम्यवृत्ति पा-

हून मीं मनाचा धडा केला कीं माझें कार्य कोणाच्या हातून होईल तर आपल्याच. तर आपण येवढें कराल काय? केलें तर मी आपले उपकार जन्मोजन्मीं नाहीं विसरायची.

**सेनापति**—तुझें असें काय काम आहे?

**जानकी**—काम कांहीं फार मोठें नाहीं. येवढा हा अर्ज महाराजांपाशीं गुजरून त्यांची भेट करून द्यावयाची.

**सेनापति**—पण महाराज येथें नाहींत.

**जानकी**—येथें नाहींत?

**सेनापति**—नाहींत. कालच रात्रीं येथून त्यांची स्वारी लगबगीनें गेली.

**विधवा**—हा कपाळा! नशीब कसें हात धुवून आमच्या पाठीमागें लागलें आहे पहा! मेले इतके श्रम सर्व फुकट गेले.

**जानकी**—फुकट गेले असें नका ह्मणूं अझून. परिणामीं गोड, तें गोडच समजलें पाहिजे. काळ प्रतिकूळ दिसो, साधनेंही अनुकूल नसोत, भरंवसा ठेवावा, दम धरावा, ह्मणजे सर्व कांहीं होतें.—बरें महाराजांची स्वारी कोणीकडे गेली, हें असेल आपणाला माहीत?

**सेनापति**—वेणुग्रामाकडे बहुतकरून गेली असावी. मलाही तिकडेच जायाचें आहे.

**जानकी**—आपण तेथें माझ्या अगोदर जाऊन पोहोंचाल तेव्हां येवढा हा अर्ज त्यांच्या हातीं कृपाकरून द्यावा. याकरितां आपणावर महाराजांची अवकृपा व्हावयाची नाहीं, झाली तर कृपाच होईल. जितकी जलदी करवेल तितकी करून आह्मी आपल्या मागोमाग आलोंच समजा.

**सेनापति**-करीन येवढें तुझें काम बरें.

जानकी—आपलें देव कल्याण करो.—चला पुनः आपणाला घोड्यांवर बसून निघालें पाहिजे. चला! चला! [जातात.]

---

## प्रवेश २.

### स्थळ.—वेणुग्राम जहागीरदाराच्या वाड्यांतील चौक.

[ वेड्या आणि वाचाल येतात. ]

**वाचाल**—अरे बाबा लक्ष्मणा! येवढें माझें पत्र सुव्रत महाराजांस नेऊन देशील का? माझी स्थिति बरी होती, अंगावर चांगलीं चांगलीं वस्त्रें फाडीत होतों, तेव्हांपासून तुझी आमची गडी आहे. आतांशीक मात्र आमचें नशीब फिरलें व त्याची आमच्यावर मोठी करडी नजर झाली आहे.

**वेड्या**—कायर! तूं लइ ग्यानी झालासा दिसतोस. अर तुझी ऐटर कुठ हाये, अन् तुझे ते झोंकदार कपडे!

**वाचाल**—काय पुसतोस? एकदा का वारें फिरलें, ह्मणजे रावाचा रंक आणि रंकाचा राव! तेव्हां आह्मी तर कोण्या झाडाचा पाला?

**वेड्या**—काय तुला झाडाचा पाला खावासा वाटतोया? जनावर तर लइ दिसांपासून व्हतास पन् पाला नव्हता बा आजपर्यंत खायला कधीं मागितलास? अन् अता त्योबी मागायला लागलास, तंव्हा झाला निवळ पसूरे पसू!

**वाचाल**—अरे बाबा माझा तसा अर्थ नव्हता. मी अलंकार योजला होता.

**वेड्या**—अलंकार म्हंजे डागिने नव्ह? अर मर्दा! बायका डागिने घालत्याती. पुरसांनीं कुठे घातले हायेती?

**वाचाल**—फिरून आपलेंच.—अरे बाबा! येवढें पत्र देशील का?

**वेश्या**–पत्तर द्यायच ? अन् कुणाला ? सुवर्त महाराजाला ? अन् तुझें ? अर ! अस हाये तरी कोनच काम ? न्हाइबा, आपुन न्हाइ पत्तर बित्तर देनार, अन् रागावले आपनावर तर ! ये बघ त्येच हिकड येत्याती. त्येना तूंच दे कस.

[ सुव्रत येतो. ]

यो बघा आलाया, म्हनतोया नशीब माझं फिरलंया, अन् त्याची नजर कवडी झालीया, वारं फिरलं म्हंजे रावाचा रंक होतोया, रंकाचा राव होतोया, झाडाचा पाला खायाला मांगतोया, अन् बायकावानी डागिने म्हंगतो आंगावर घालीन म्हून. अन् पत्तरभी आनलंया, इचारा याला काय हाये तें. आपनाला न्हाइ बा काइ याचं समजत. मला तर ह्यो गरीबावानी दिसतोया पन् लइ लबाड ! आपनाला खायला प्यायला संमदं हाये, त्येन्हा याची आपनाला कीव येती, इक्तच !

[ जातो ]

**वाचाल**–महाराज ! दैवाची मजवर आतांशीक वक्र दृष्टि झाली आहे.

**सुव्रत**–तर मग मी काय करूं ? आतां कांहीं सरळ करितां येत नाहीं. तूं असें काय केलें दैवाची वक्रदृष्टि तुजवर व्हावयाला ? पण दैवाची मर्जी फार दिवस आणि तशांतून तुजसारख्या लुच्चांवर असतच नाहीं. घे हा होन आणि पुनः तोंड दाखवूं नको. मला काम आहे. जा.

**वाचाल**–माझे दोन शब्द तर ऐकून घ्या.

**सुव्रत**–पाहिजेत तर दोन आणखी होन देतों पण तुझे हे दोन शब्द नकोत.

**वाचाल**–मला वाचाल म्हणतात, हें असेलच ठाऊक आपणाला.

**सुव्रत**—हे दोन शब्द नव्हत. त्याच्या चौपट आहेत! हं, तुझी वाचालराज नव्हे? राम राम! पटहाची काय वार्ता आहे?

**वाचाल**—महाराज आतां कृपा करा. आपली आणि माझी पहिली गांठ——

**सुव्रत**—आणि तीच शेवटली!

**वाचाल**—माझें आतां येवढेंच ह्मणणें आहे कीं मला तारणार आणि मारणार आतां आपणच आहां!

**सुव्रत**—हा मूर्खा! मला केशव आणि शिव एकदम करणारा तूं! तारणारा केशव आणि मारणारा शिव!—[शिंग वाजतें] अरे! महाराजांची स्वारी आली. मला आतां बोलत नाहीं येत राहतां. उद्यां भेट. काल रात्रीं तुझ्याच गोष्टी निघाल्या होत्या, तूं लबाड आहेस—पक्का बेरड—पण तुझ्या पोटाला मिळेल भाकर, झालेंना?——चल—

**वाचाल**—ईश्वर आपलें कल्याण करो! [जातात.]

---

## प्रवेश ३.

### स्थळ.—वेणुग्राम. जहागीरदाराच्या वाड्यांतील दिवाणखाना.

[ललकारा.] [राजा, विनता सुव्रत, सरदार, गृहस्थ, पाहरेकरी, शिपाई वगैरे येतात.]

**राजा**—प्रियजनविरह फारच दुःखद होतो. छेः! असें रत्न पुनः कधीं मिळायाचें नाहीं. पण आपल्या चिरंजीवास तिची योग्यता कळूं नये, हें केवढें बरें आश्चर्य!

**विनता**—झालें, गेलें; त्याचें आतां काय? तारुण्यांत मनोविकाराग्नि फारच प्रबल असतो, त्याला शमवायाला त्यावेळीं

विवेक समर्थ नसतो, हें जाणून प्रभूंनीं त्याचा अपराध सहन करावा.

**राजा**—त्याबद्दल मी कांहीं आतां ह्मणत नाहीं. तें सर्व विसरलों. आणि त्याबद्दल क्षमाही केली! त्यावेळीं माझा कोपाग्नि फारच भडकला होता, आणि काय करूं आणि काय न करूं असें मला झालें होतें.

**सुव्रत**—महाराजांची आज्ञा होईल तर बोलतों.

**राजा**—हूं, बोला! तुम्हाला पाहिजे तें बोलायाला हरकत नाहीं.

**सुव्रत**—आमच्या तरूण जहागिरदारांचा हा अपराध मोठा खरा; कारण यानें

### आर्या [ गीति ]

उल्लंघिली[1] नृपाज्ञा[2] मातेचें वचन मोडिलें सत्य ॥
झाला त्या साध्वीचा[3] घात अहा काय घोर हें कृत्य॥

पण त्या कृत्यापासून त्याचेंच मोठें अहित झालें. कसें?

### श्लोक.

नयनें[1] रिझेवी[2] मूर्ती जीची जणों विधुची[3] कला ॥
श्रवणं[4] सुखवी भारी वाणी जिची जणु कोकिला ॥
गुणनिधि[5] जिचा गर्विष्ठांच्या मनास वशीकर[6] ॥
गमवुनि अशा तन्वङ्गी[7] हा अधन्य किती नर! ॥

**राजा**—नष्ट प्रियजनाचें स्मरण हृदयाला फारच ताप देतें. असो, त्याला इकडे बोलवा; आमचा कोपाग्नि शांत झाला आहे. झालें तें झालें. दुःखावर डाग देणें उचित

---

१ मोडली. २ राजाची आज्ञा. ३ पतिव्रतेचा. ४ नेत्र. २ आनंदवी. ३ चंद्राची. ४ कान. ५ गुणसमुदाय. ६ वश करणारा. ७ कोमलांगी.

नाहीं. आह्मी अपराधच विसरलों, तेव्हां क्षमेला जागाच नाहीं. सापराधजन जसा शंकित येतो, तसें त्यानें येऊं नये. त्यानें कशाचेंही आतां भय मनीं न आणावें, अशी आमची आज्ञा आहे ह्मणून सांग.

**सेवक**—जी सरकार. [ जातो. ]

**राजा**—तुमची कन्या त्याच्या मनास येते का ? विचारिलें त्याला ?

**सुव्रत**—आपल्या कांहीं तो आज्ञेबाहेर नाहीं.

**राजा**—तर मग हा योग चांगला आहे. मजला पांडुरंगपुरच्या राजांचें पत्र आलें आहे, त्यांत त्यांनीं याची फार स्तुति केली आहे.

[ शूरसेन येतो. ]

**सुव्रत**—विजयानें हा फार शोभतो.

**शूरसेन**—[ मनांत ] मला जरी महाराजांचें अभय वचन आहे, तरी मनांतून भीति जात नाहीं. वर्षाकाळांतील दिवसाप्रमाणेंच राजा असतो—कसा ?

**श्लोक.**

नीतीचें गृह सोडिती जन तयां कोपें जळें झोडितो,
शब्दें मेघरवेंचि कर्णविवरा दावावया लावितो,
डोळे दीपवितो पहा तनुगतें तेजें कसा वैद्युतें,
राजा दुर्दिन सत्य; दंडकरकाघातें वधी शत्रुतें ॥

**राजा**—

**श्लोक.**

ये, ये मुला ! मजासि दे परिरंभणातें,
शंका करी तव मनीं पद कासया तें ?

**कोपाग्नि जो खवळला, शमला सुकालीं,**
**पाहूनि आज तुजला मम दृष्टि धाली ॥**

**शूरसेन**—नाहीं तसे अपराध माझे हातून घडले, त्यांचा आतां मला पश्चात्ताप फार झाला आहे. तेव्हां महाराजांनीं क्षमा करावी.

**राजा**—एकदा सांगितलेंना, मागलें सर्व विसरलों ह्मणून. आतां त्याचें नांव काढूं नको.

### श्लोक.

**गेल्याचा करिती न शोक बुध ते; गेला न ये मागुता,**
**जातो तो क्षण आपुला समजती; आयुः पळे तत्त्वतां;**
**होई चिंतित कार्यसिद्धि न पुढें ऐसें मनीं आणुनी,**
**घेती साधुनि कार्य सत्वर कसे. ही रीति आहे जुनी ॥**

या वृद्ध सरदाराची कन्या तं पाहिली आहेसना? कशी काय तुला आवडते ती?

**शूरसेन**—किती पण आवडते ह्मणून सांगूं? पूर्वीपासूनच तिजवर माझें प्रेम जडलें होतें. पण तें तोंडानें वदण्याचें माझें धैर्य होईना. तेंच दृढबद्ध[1] प्रेम माझ्या अपराधाचें, आणि तद्द्वारा आपल्या कोपाचें आणि माझ्याही पण शोकाचें कारण झालें. जी आपणा सर्वांना प्रियदर्शना[2] होती ती गेल्यावर तिचे गुण आठवून आतां मला अनुताप[3] झाला आहे. पण त्यापूर्वी

### श्लोक.

**प्रणय[4] जडला पूर्वी दृष्टी मदीय विलोचना[5]—**

त्याच्या योगानें झालें काय? तर

१ पक्कें जडलेलें. २ प्रिय आहे दर्शन जिचें. ३ पश्चात्ताप. ४ प्रीति. ५ डोळ्याला.

प्रकृतिसुभगा अन्या वाटे कुरूपचि अंगना
ललित असती जीं कां अंगें सुरेख न भासती–
म्हणुनि नयनीं वामाङ्गी ती वधू सलली सती ॥

राजा–हें कारण तुझ्या अपराधाचें होतें हें आह्मांस नव्हतें ठाऊक. आतां समजलें तेव्हां अपराधाचें महत्व बरेंच कमी झालें. पण बाबारे आतां तिचे गुण घेऊन काय उपयोग? वेळ निघून गेली, म्हणजे पश्चात्तापास कारण होतें. पहा!

### श्लोक.

असे करीं जोंवरि वस्तु तोंवरी
गुणीं न त्याच्या रति चित्त हें धरी
विनाश होतां, प्रणयास तें वरी!
अशी अनर्थावह मूढता नरीं ॥

या मूढतेच्या योगानें किती अनर्थ झाले आहेत!

### आर्या (गीति.)

परुषाक्षरवचनांहीं हारविले मित्र आप्तजन कितिक
होतां विवेक पश्चात्तापें हा दग्ध चित्त निर्गतिक ॥

पण पश्चात्ताप काय कामाचा? असो, आतां पुनः जानकीचें नांव नको काढूं, आणि आठवणही तिची नको करूं. ती गेली, झालें सारें. आतां या मदयन्तिकेवर प्रेम ठेव, तिजशींच तुझा विवाह लावायाचा. सर्व गोष्टींचा ठराव झालाच आहे, तेव्हां विधुर झालेल्या आमच्या सुतप्राय जहागिरदाराचा द्वितीय संबंध उरकूं आणि मग येथून कूच करूं. कसें काय? आपल्या हें मनास येतें ना?

१ स्वभावतः सुंदर २ स्त्री. ३ सुंदर. ४ सुंदरी. ५ प्रीति. ६ अनर्थकारक. ७ कठोरभाषणांनीं. ८ आश्रयरहित.

विनता--महाराजांच्या ह्मणण्याबाहेर आह्मी नाहीं. पण मी येवढेंच हात जोडून ह्मणतें "देवा नारायणा! या विवाहाचा तरी परिणाम गोड होवो. नाहीं तर पूर्वीच माझे डोळे झांक करे."

सुव्रत—चला! तुह्मी आमचे जामात झाला. आमच्या कन्येला स्त्रीधन काय देतां, बोला पाहूं. हीच का बाना हातांतली आंगठी—अहो पण! साध्वी जानकी-तिच्या बोटांत मीं ही आंगठी—विवाहानंतर घरीं जायाला निघाली तेव्हां—पाहिली होती.

शूरसेन—ही नव्हे तिची आंगठी.

राजा—ती इकडे ध्या पाहूं. बोलत असतां मी एकसारखा तिजकडे पाहत होतों. ही आंगठी मूळची माझी. ही मीं जानकीला दिली त्यावेळीं तिला असें ह्मटलें कीं तुजला कांहीं अडचण पडली तर ही पाठवून दे मजकडे, ह्मणजे ती दूर करीन. अशी तिच्या कामीं पडणारी आंगठी तूं तिजपासून हिरावून घ्यावीस काय?

शूरसेन—महाराजांना काय वाटत असेल तें वाटो, पण ही आंगठी तिची नव्हतीच.

विनता—बाळा! खोटें बोलूं नको. मीं ही तिच्या हातांत पाहिली होती; आणि हिला ती जीवापलीकडे लेखीत होती.

सुव्रत—मीं तिच्या हातांत पाहिली होती, यांत कांहीं संशय नाहीं.

शूरसेन—छेः! आपली येथें नजर चकली. ही आंगठी तिनें जन्मांत कधीं पाहिली नव्हती. पांडुरंगपुरास एका सुंदर स्त्रीनें ही डबींत घालून मजकडे पाठवून दिली. ती

स्त्री चांगली देखणी होती आणि तिला वाटलें होतें कीं मी तिच्या मोहास वश होईन. तिनें आपली सखी मजकडे पाठविली, तिला मीं सांगितलें कीं मी अशांतला नाहीं; ही आंगठी घेऊन जा. त्यावेळीं तिला मीं पुष्कळ आग्रह केला कीं ही आंगठी घेऊन जा, पण ती ह्मणाली "दासीला जेवढें काम सांगितलें तेवढें तिनें करावें, अधिक करूं नये. मला आंगठी नेऊन द्यायाला सांगितली, परत घेऊन यायाला सांगितली नाहीं." असें ह्मणून ती निघून गेली, आणि आंगठी मजजवळ तशीच राहिली!

**राजा**—जो **रत्नाकर** प्रत्येक वर्षास लाखों रत्नें निर्माण करितो, व ज्याला रंगावरून व पाण्यावरून प्रत्येक रत्न ओळखतां येईल, तो सुद्धां फसेल, पण मी फसणार नाहीं. तूं कांहीं ह्मण, आणि तुजजवळ कशीही येवो, पण ही आंगठी मूळची माझी आणि जानकीला दिली तीच. तेव्हां खरें बोल, तिजजवळून तूं कशी घेतलीस ती. तिनें मला असें ह्मटलें होतें कीं देईन तर ही मी आपल्या पतीला देईन—आणि तो तर प्रसंग घडून आला नाहींच—"नाहीं तर अडचणीच्या वेळीं महाराजांकडे पाठवीन."

**शूरसेन**—तिनें या जन्मीं ही पाहिलीच नव्हती.

**राजा**—तूं अनृत बोलतोस, खास. कांहीं तरी सांगून वेळ मारून न्यावी, असें तुझ्या मनांत. पण या गमजा मजपुढें नाहींत चालायाच्या. इतकें का तुझें अमानुष वर्तन आहे? असें नसेल—पण काय सांगावें? ती तुझ्या डोळ्यासमोर नकोशी होती, आणि ती मेली—तिचा घात खास त्वां केला; नाहीं तर ही आंगठी तुझ्या हातांत कशी आली? हर! हर! अशी तिची गत व्हावी ना!—हा अधमा!—ष-

लारे याला कैद करा-[पाहरेकरी शूरसेनास धरतात] पहा इतकीं प्रत्यंतरें असतां, माझ्या मनांत पूर्वींच ही कल्पना कशी आली नाहीं, याचा मला चमत्कार वाटतो. घेऊन जारे याला-या प्रकरणाची चांगली चौकशी केली पाहिजे.

**शूरसेन**-महाराज ! ही आंगठी तिची होती असें सिद्ध झालें तर तिची आणि माझी गांठ पांडुरंगपुरास पडली असें होईल. पण ती तर पांडुरंगपुरास कधींच गेली नव्हती.

**विनता**-देवा ! हें पहायाला मी कशाला आज जगलें!

[ **शूरसेनास** कैद करून नेतात. ]

[ सेनापति येतो. ]

**राजा**-नाहीं नाहीं त्या कल्पना माझ्या मनांत येतात !

**सेनापति**-महाराज ! आपण मला या कामाबद्दल कदाचित् दोष लावाल. हा अर्ज एका पांडुरंगपुरच्या कन्येनें मजजवळ आपणाला देण्याकरितां दिला. तो तीच आपल्या चरणांजवळ आणून देणार होती,पण थोडी चुकामूक पडली. ती मुखोळास आली आणि आपली स्वारी तेथून निघाली ! त्या सुंदर कन्येनें माझी विनवणी केली, तेव्हां माझ्यानें तिला ना ह्मणवेना. ती मागोमाग येणार होती, आणि आतांपर्यंत येथें आलीही असेल. तिचें काम तिच्या मुद्रेवरून मोठें निकडीचें असावें, असें वाटलें. आणि तिनें मधुरवाणीनें असें सांगितलें कीं हें काम खुद्द महाराजांपाशींच आहे.

**राजा**-[ वाचतो ] वेणुग्रामाच्या जहागीरदारानें मला अभिवचन दिलें कीं गांधर्वविवाहानें तुझें पाणिग्रहण केलें, तुला मी अंतर देणार नाहीं. तेव्हां मी त्यांच्या ह्मणण्याला कबूल झालें, हें सांगण्याला मला लाज वाटते. पण मला न विचारतांच ते तेथून निघून आले, आणि मला आपल्या बरो-

वर नेण्याची कांहींच तजवीज केली नाहीं. तेंव्हां माझीही गत त्यांच्या पहिल्याच बायका प्रमाणें होणार, ती न व्हावी ह्मणून मी हा अर्ज महाराजांच्या चरणांपाशीं केला आहे. न्याय करण्यास ते समर्थ आहेत. मला न्याय न मिळाला तर मीं अनाथानें काय करावें? सुष्टांचे पालनकर्ते आणि दुष्टांचे शासनकर्ते आपण आहां,हें जाणून आपल्या चरणांजवळ आलें आहे. रोष न होय. हा अर्ज. **पार्वती.**

**सुव्रत**–महाराज! मला शीलवान् जामात पाहिजे. असला नको आहे.

**राजा**–हें देवानें बरेंच केलें समजा,सुव्रत! नाहीं तर तुह्मी आज फसलां होतां. जा अर्जदार कोण आहे त्यास लवकर घेऊन या. आणि शूरसेनासही आणा. [ **सेनापति** आणि सेवक जातात.] बाई! मला तर संशय आला आहे कीं आपल्या जानकीचा वध झाला असावा.

**विनता**–न्याय करण्यास आपण समर्थच आहां! पण असें कर्म माझ्या मुलाच्या हातून घडलें नसावें. खरें पडेलच बाहेर.

[ शूरसेन पाहारेकऱ्यांच्या ताब्यांत असलेला येतो. ]

**राजा**–कसें काय जहागीरदार साहेब! तुमच्या डोळ्यांत बायका अशा सलतात कीं लग्न झाल्याबरोबर त्यांच्या हातून केव्हां सुटूं असें तुह्माला होतें. तरी फिरून लग्न करण्याची हौस आहेचना?–ही कोण?

[ **सेनापति, पार्वती आणि विधवा** येतात.]

**पार्वती**–[ मनांत ] देवा! या सोंगाची बतावणी करण्यापुरतें माझे अंगीं धैर्य दे. [ उघड ] महाराज! मी ती संग्रामपुरची अभागी पार्वती, शिर्क्यांच्या नांवाजलेल्या कुळांत

माझा जन्म. माझा अर्ज आपण नुक्ताच वाचला, ह्मणून कळतें, तेव्हां अधिक काय बोलूं ? आपण मजवर दया करा येवढेंच.

**विधवा**–महाराज ! मी इची आई. आह्मांस न्याय न मिळाला तर आमच्या कुळाला बट्टा लागेल. मज ह्मातारीकडे बघा, आणि न्याय करा.

**राजा**–इकडे असे या जहागीरदार ! या बाया तुह्मी ओळखतां ?

**शूरसेन**–खोटें बोलत नाहीं, ओळखतों. मजवर यांचा कांहीं आरोप आहे काय ?

**पार्वती**–आर्यपुत्रा ! अशी धिक्काराची दृष्टि मजवर कां बरें ?

**शूरसेन**–कोण गे तुझा आर्यपुत्र ! अर्थाअर्थीं तुझामाझा कांहीं संबंध नाहीं.

**पार्वती**–आतां दुसरी कोण ह्मणते आर्यपुत्र ती पाहीन-ना ! त्यावेळीं असें गोड गोड भाषण करून शेवटीं असें फसवावेंना ? पुरुषांनाच हें शोभतें. अहो ! कांहीं तरी सत्याला जागा. असा अनाथ साध्वीचा छळ करून कांहींहो नाहीं मिळायाचें. फिरून ह्मणतें, हें बरें नव्हे बरें.

**सुव्रत**–अहो शूरसेनराव ! तुमची योग्यता फार मोठी ! आह्माला तुमची बरोबरी नाहीं करितां येत. आमची कन्या दुसऱ्या एखाद्याला वरील.

**शूरसेन**–महाराज ! ही जघनचपला आहे. नाहीं ह्मणत नाहीं; इच्या घरीं बसलों आहें, बोललों आहें, चाललों आहें, हसलों आहें, खेळलों आहें, पण मी इतका वेडा होईन कीं इजशीं विवाह करीन, असें आपणाला वाटतें काय ?

**राजा**—मला काय वाटतें हें विचारूंच नको. तूं काय करशील आणि काय करणार नाहींस याची कोणीं खातरी द्यावी ? मला वाटतोस तसा तूं नसावास ह्मणजे झालें !

**पार्वती**—महाराजांनीं यांना शपथेवर विचारावें बरें कीं वचन देण्यापूर्वीं मी यांस वश झालें का ?

**शूरसेन**—महाराज ! ही अगदीं लबाड आहे. पांडुरंगपुरच्या स्त्रियांची आख्या ऐकून माहीतच असेल. हिचें काय मनावर घेतां ? ही सर्वसाधारणा होती.

**पार्वती**—हर ! हर ! मजविषयीं अशी उक्ति यांनीं करावी काय ? देवाला डोळे आहेत, बरें पण यांनाच विचारा. हे ह्मणतात तशी जर मी असतें तर मी सहज वश झालें असतें. याचें कांहीं खरें मानूं नका. ही पहा आंगठी ! किती मौल्यवान ! इच्यासारखी दुसरी सांपडणें कठीण. अशी आंगठी सर्वसाधारण युवतीस हे देतील असें आपणास वाटतें ?

**विनता**—अरे कर्मा ! त्याचें तोंड खरोदिशीं उतरलें. तेंच खरें. सातांपिढ्यांची ही आंगठी, बापापासून मुलाला अशी आलेली. या कन्येशीं यानें विवाह लाविला, खास ! हीच त्या विवाहाची साक्ष. याहून मोठें प्रमाण कोणतें पाहिजे आहे ?

**राजा**—या तुझ्या ह्मणण्याला दुसरे कोणी साक्षी येथें तुला दिसताहेत ?

**पार्वती**—हो एक आहे. त्याला मीं आतांच येथें पाहिलें. पण त्याची साक्ष देण्याला मी खुषी नाहीं. इतका तो लबाड आहे. त्याला वाचाल ह्मणतात.

**सुव्रत**–होय. मींही या मनुष्याला आज सकाळीं पाहिलें. पण याला मनुष्य कसें ह्मणतां येईल ?

**राजा**–पहा कोठें आहे तो, आणि घेऊन या त्याला.

**शूरसेन**–त्याला विचारून काय फायदा ? त्याच्यासारखा लुच्चा या दुनियेंत मिळणार नाहीं. त्याच्या अंगीं सर्व कांहीं गुण भरले आहेत, खरें बोललें ह्मणजे त्याचा जीव जातो–पाहिजे तें बकणार; यानें मी असा आहे असें म्हटलें तर मी तसाच होतों काय ?

**राजा**–पण तिजजवळ तुझी आंगठी तर आहे ?

**शूरसेन**–आहे, खरी. पण तिची माझी गांठ पडली येवढ्यावरून सर्व झालें काय ? ही चव्हाट्यावर बसणारी; मी श्रीमंत ह्मणून कळतांच इनें आपलीं जाळीं पसरलीं. मीही वेडेपणानें त्यांत सांपडलों. मी अगदीं मुठींत यावा, ह्मणून प्रथमतः बरेच आढेवढे घेतले. पदार्थ जितका दुष्प्राप्य तितकी तो प्राप्त करून घेण्याची कामिजनाची इच्छा जास्त ! तेव्हां तिच्या त्या वेश्याजनसाधारण मुरकण्यास आणि गोड गोड भाषणांस भुलून मीं तिचें ह्मणणें कबूल केलें आणि ही आंगठी दिली; आणि तिनें मला दीडदमडीची बाजारांत पाहिजे त्या वेळीं मिळण्यासारखी अशी एक आंगठी दिली.

**पार्वती**–माझी आंगठी दीडदमडीची झाली ना ? बरें, तसें का होईना. ती आणावी आपण आणि महाराजच पाहतील कीं दीडदमडीची आहे कीं केवढ्याची आहे ती. देवारे देवा ! कसें यांचें काळीज ! एकीची तशी वाट लाविली, दुसरीची अशी लावणार ! आणा पाहूं कोठें आहे ती आंगठी.

**शूरसेन**–ती नाहीं आतां मजजवळ.

**राजा**–तुझी आंगठी कशी होती बरें ?

**पार्वती**–महाराजांच्या हातांत आहे तशीच होती साधारण.

**राजा**–ही आंगठी आहे तुझ्या ओळखीची ? ही नुक्ती त्यांजवळच होती.

**पार्वती**–आणि हीच रात्रीं त्यांना दिली ती.

**राजा**–तर मग ही गोष्ट खोटी आहे. ही तूं सखीच्या हस्तें याच्या घरीं पाठविली.

**पार्वती**–नाहीं, मी खरें होतें तें सांगितलें.

[ वाचाल येतो. ]

**शूरसेन**–महाराज ! मी कबूल करितों कीं, ही आंगठी इचीच.

**राजा**–खरें तरी काय समजावें कोणाला ठाऊक ! आतां एक, मागून एक–बोलांत बोल नाहीं. असा चपापतोस काय ?––मघां ज्याविषयीं ह्मटलें तोच का हा ?

**पार्वती**–होय, महाराज, तोच हा.

**राजा**–काय रे. खरें सांग. आपल्या धन्याला भिऊं नकोस. खरें सांगशिल तर तुझ्या एका केसाला धक्का बसू देणार नाहीं. खरें सांग. या सरदाराविषयीं आणि या स्त्री विषयीं तुला काय माहिती आहे ?

**वाचाल**–महाराज ! आमचे धनीसाहेब जसे दुसरे जहागीरदार तसे. थोडींबहुत व्यसनें सरदारांला असतात, तशीं आपलीं बेतापुरतीं यांनाही आहेत–होतीं.

**राजा**–हा द्राविडीप्राणायाम तूर्त राहूं दे. विचारतों त्या प्रश्नाचें बरोबर उत्तर दे–यांचें प्रेम या स्त्रीवर होतें का ?

**वाचाल**–होतें, पण कसें ह्मणाल ?

**राजा**–हं. सांग कसें होतें तें.

**वाचाल**–एखाद्या बड्या सरदाराचें एखाद्या साधारण स्त्रीवर असतें तसें.

**राजा**–ह्मणजे रे कसें ?

**वाचाल**–ह्मणजे–होतेंही आणि नव्हतेंही पण.

**राजा**–जसा तूं लबाड आहेसही आणि नाहींसही !– कसें दुटप्पी भाषण गुलामाचें पाहिलें का ? कशांत सांपडूं नये.

**वाचाल**–मी गरीब आपल्या पायांचा चाकर आहें.

**सुव्रत**–हा मृदंग आहे, याला दोहींकडून मार दिला तरी सोशील, आणि हवे ते बोल देईल !

**पार्वती**–त्यानें मजला गांधर्व विवाह करीन असें वचन दिलें हें नाहीं का तुला ठाऊक ?

**वाचाल**–खरेंच पुसशील, तर मी सांगतों त्यापेक्षां मला पुष्कळ माहीत आहे.

**राजा**–मग तें सारें कां नाहींस तर सांगत ?

**वाचाल**–असें का ? तर सांगतोंच आतां. मी या दोघांचे एकमेकांचे निरोप पोहोंचविणें वगैरेच्या कामांत मध्यस्थ होतों. यांचें इजवर फार मन जडलें–मग स्वारी अगदीं वेड्यासारखी झाली. मदनबाण, विरहाग्नि, चंद्रमरीचि,–असें कांहीं बाही बोलूं लागले. त्यावेळीं या दोघांचाही मजवर विश्वास होता, तेव्हां हें काय काय करीत हें सर्व कळे. एके रात्रीं या दोघांची गांठ एके ठिकाणीं पडली होती, हें आहे मला ठाऊक. पण विवाहाचें वचन आणि दुसऱ्या कांहीं गोष्टी या महाराजांनीं मला विचारू नयेत. आह्मी आपले

गरीब; खरी गोष्ट सांगितली, ह्मणजे नाहक मधल्या मधेंच चिरडणार. तेव्हां आपण सांगूंच नये कसें.

**राजा**–अरे पण, सांगायाचें तें तर सांगितलें, आतां काय उरलें आहे? लग्न लावलें येवढें काय तें सांगायाची बाकी राहिली आहे. पण तुजवर माझा भरंवसा नाहीं. तूं बरेंच तिखटमिखट लावतोस. एकीकडे हो पाहूं—ही तुझी आंगटी आहे, असें ह्मटलें नव्हे?

**पार्वती**–होय महाराज.

**राजा**–ही कोठें तूं विकत घेतली? किंवा कोणीं तुला दिली?

**पार्वती**—मला कोणीं दिली नाहीं, व मीं विकतही घेतली नाहीं.

**राजा**–तर ही कोणीं तुजजवळ ठेविली होती?

**पार्वती**–मजजवळ ठेविलीही नव्हती!

**राजा**–तर कोठें तरी ही तुला सांपडली?

**पार्वती**–मला सांपडलीही नाहीं.

**राजा**–कोणत्याही तऱ्हेनें तुजजवळ आली नाहीं, तर मग याला दिली कशी?

**पार्वती**–महाराज यांना नाहींच दिली.

**सुव्रत**–खरें तरी काय समजावें! लबाड दिसते ही महाराज! पहा कशी मन मानेल तशी बकते आहे.

**राजा**–ही आंगठी मुळची माझी, ती मीं यांच्या पहिल्या बायकोला दिली होती.

**पार्वती**–असेल आपली किंवा तिची. मला काय ठाऊक?

**राजा**–जा, इला घेऊन जा, कारागृहांत. इजवर नाहीं माझा विश्वास पटत. त्यालाही घेऊन जा. आतां या घटकेंत,

ही आंगठी तुजजवळ कशी आली, हें नाहींस सांगणार, तर तुला सुळीं दिलेंच समज.

**पार्वती**–मी नाहीं सांगायाची.

**राजा**–तर जाच इला घेऊन.

**पार्वती**–महाराज, असें करूं नका. मी जामीन देतें.

**राजा**–आतां मला वाटूं लागलें कीं तूं आहेस अशीच ह्मणून.

**पार्वती**–महाराज! पाहिजे त्याची शपथ घेईन मला पुरुष माहीत असेल तर.

**राजा**–तर मग उगींच कां यावर बालंट घेतलें?

**पार्वती**–उगींच नाहीं. हे सरदार दोषी आहेत आणि दोषी नाहींत. यांला वाटतें आहे कीं माझें कुमारीव्रत राहिलें नाहीं, आणि पाहिजे तर शपथही घेतील. पण मी पाहिजे ती शपथ घेईन कीं कुमारीव्रत माझें अझून कायम आहे. पण ह्यांना कोठें ठाऊक आहे हें? प्रभो! आपणाला संशय आला तो उगींच. मी तशी नाहीं बरें? मी अगदीं धुतल्या तांदुळासारखी आहे. माझें अझून लग्न झालें नाहीं. पुढें होईल.

**राजा**–फारच लबाड अं. जा घेऊन इला.

**पार्वती**–यांना नाहीं खरें वाटत! आई, जा, माझा जामीन घेऊन ये. (विधवा जाते.) थोडे दम धरा. ज्याची आंगठी आहे तो आतां येईल आणि मला सोडवील. पण या सरदारांना दोषापासून मुक्त करितें. त्यांना वाटतें आहे कीं इचें सत्व मी हारिलें ह्मणून, पण तसें कांहीं नाहींहो. मी पक्की होतें, मीं आपलें सत्व नाहीं हरूं दिलें. त्यांची माझी गांठ पडली असें त्यांना वाटतें आहे, पण तसा प्रकार नाहीं. त्यांच्या

त्रायकोची आणि त्यांचीच त्या वेळीं गांठ पडली आणि गर्भ राहिला ! ती मेली खरी पण तिचें पोटांतलें मूल अजून जिवंत आहे.—जिंका बरें माझा उखाणा. मेली ती जिवंत !—हें वघा उखाण्याचें उत्तर !

[ विधवा जानकीला घेऊन येते. ]

**राजा**—कोणी मंत्रवाद्यानें माझी दृष्टि तर नाहीं ना बांधली ? स्वप्न तर नव्हेना ? का खरोखरीच ही ती ?

**जानकी**—महाराज ! खरोखुरी कोठली ही ? नांवाची पत्नी !

**शूरसेन**—नांवाची नव्हे, खरोखर आहे ! माझी धर्मपत्नी सर्व संकटांतून पार पाडणारी हीच. सर्व अपराध पोटांत घालावे.

**जानकी**—प्राणनाथ ! मीं या कन्येचें सोंग घेतलें होतें, त्या वेळीं मजशीं किती पण गोड गोड बोललां ! ही आपली आंगठी, आणि हें पत्र ! हें वाचा यांतील वाक्य " जेव्हां माझ्या हातांतील आंगठी तुला मिळेल, आणि मजपासून तुझ्या पोटीं संतान होईल इ. " हें आलें घडून. आतां तर माझे झालांना ? एकदां नव्हे दोनदां आपणाला मिळविलें, झाला कीं नाहीं वल्लभानुनय ?

**शूरसेन**—महाराज, हें गूढ फोडून सांगितलें, ह्मणजे जि-
वांतजीव आहे तोंपर्यंत इला मी अंतर देणार नाहीं.

**जानकी**—हें जर सांगतां येणार नाहीं, किंवा यांत कांहीं
खोटें असेल, तर पुनः या दासीला आपलें दर्शनसुख न मिळो !—बाई ! मी आपणांला पाहिलेंच नाहीं. आपली जानकी नमस्कार करितें.

**सुव्रत**—आजचा केवढा हा सुदिन ! माझे नेत्र भरून आ-

ले, आतां अश्रुधारा वाहूं लागतील—भले मृदंगराज—नव्हे पट-हराज! तें फडकें घ्या पाहूं. शाबास. चल, रहा घरीं पडू-न. तुह्मी जवळ असलां ह्मणजे करमेल तरी. पण तोंड मात्र उघडूं नका अं. यांत कांहीं हंशील नाहीं.

**राजा**—अथ पासून इतिपर्यंत ही मनोहर कथा कानांनीं ऐकिली पाहिजे. अगे पार्वती! समजलें. तुझ्या साहाय्यानें आजचा हा सुदिन जानकीस प्राप्त झाला. तुला चांगला वर पाहून देऊं अं. अहो विनताबाई!

### श्लोक.

केला हा अनुनीत[१] वल्लभ[२] इणें दीर्घें प्रयत्नें अहा!
आलीं विघ्नशतें[३] तरी निरविलीं[४] धैर्यप्रभावें पहा!
झाली ईस सहाय ही प्रियसखी सख्या न जी हारवी
होतें जें परिणामिं गोड सगळें तें गोड बोले कवी॥

शूरसेना, आणखी कांहीं तुझें प्रिय होणें राहिलें आहे काय?

**शूरसेन**—महाराजांच्या चरणकृपेनें सर्व कांहीं प्रिय प्राप्त झालें आहे. आतां कांहीं मागितलेंच पाहिजे, तर हें असोः

### श्लोक.

सत्याचा नित्य होवो विजय,
अनृत तें सर्वदा ह्रास पावो।
खोटा[५] ताठा नुरो तो,
रत विनय[६] गुणीं हा सदा लोक होवो॥

---

१ प्रसन्न. २ पति. ३ शेंकडों विघ्नें. ४ निवारलीं. ५ खोटें. ६ नम्रता.

वृद्धांचा मान राखो तरुणजन सदा,
प्रेम निर्व्याज[1] वाढो।
ध्यावो चित्त प्रभूचे चरण निशिदिनीं,
मोह तो सर्व काढो ॥

राजा—तथास्तु.

[ जातात. ]

---

1 निष्कपट.

समाप्त.

नं.

सालांची,

र, सर्जन
याख्यान. ० ३ ६॥.
नामदार का०
... ... ० २॥ ६॥.
करण्यास को-
जेत ?--मि० के-
यान ... .. ० २॥ ६॥.
व वैदिक धर्म प्रो०
यांचें व्याख्यान. ० ४ ६॥.
जाराम रामकृ-
... ... ० १॥ ६॥.
आ० गुते क्युरेटर
यांचें व्याख्यान ... ... ... ० १ ६॥.
विरजंगमात्मक सृष्टीविषयीं माहिती.-डा०का०
वा०काणे एल. एम. ॲन्ड. एस्.यांचें व्याख्यान ० २ ६॥.
ची धर्मादाय पद्धति--रा० रा० जनार्दन दा-
मोदर कोल्हटकर यांचें व्याख्यान ... ० १॥ ६॥.
लोकांत ऐक्याची वृद्धि होण्यास हरकती व
त्या दूर होण्यास उपाय--रा० सा० वा० आ०
मोडक यांचें व्याख्यान .. ... ... ० १ ६॥.
ॲंटि-कार्न लॉलिग अथवा इं डांतील धान्यावरील
करा यदे रद्द करण्य विषयीं दीर्घ प्रयत्न-
रा०रा० कृष्ण भाटवडेकर बी.ए.एल.एल.
बी. वकील, यकोर्ट, मुं ई, यांचें व्याख्यान. ० १ ६॥.
प्रयागांतील राष्ट्री सभेची ह कीकत-डा० स० वा०
काणे एल. एम ॲन्ड एस. यांचें व्याख्यान. ० १। ६॥.
युरोपच्या इतिहास पन आपल्या लोकांनीं काय
शिकावें--रा०सा० आ० मोडक प्रिन्सिपाल
एलफिन्स्टन हायस्कूल मुंबई यांचें व्याख्यान. ० १॥ ६॥.
सोनें व रुपें यांचा हिंदुस्थानांत खप.--रा० रा०
वासुदेव गोपाळ भांडारकर, बी. ए. एल. एल
बी, वकील हायकोर्ट, मुंबई यांचें व्याख्यान. ० १ ६॥.
धर्मादाय--वे० शा० रा० रा० बाल धंशेश्वरशास्त्री
गुरजर यांचें व्याख्यान ... ... ... ० १। ६॥.